



# राजकारणातील लबाड नेते

रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २४ मार्च २०२४

आधुनिक केसरी

**भारतीय राजकारण व भ्रष्टाचार मुक्त करण्याची शपथ घेणारे अरविंद केजरीवाल राजकारणात आल्यानंतर सरड्या प्रमाणे रंग बदलत आहेत. ही खूर्चीची किमया आहे! भ्रष्टाचारी नेत्यांची चौकशी न करता त्यांना सरळ जेलमध्ये टाकले पाहिजे,असा म्हणणारा कट्टर इमानदार नेता केजरीवाल कट्टर बेमाईमान नेता निघाला आहे! नियतीचा खेळ बघा! केजरीवाल हे दारू घोटाळ्याचे मुख्य सुत्रधार असल्याने ईडीने त्यांना अटक केली. राजकारणात एकमेकाचे विरोधक असलेले विरोधी पक्षाचे नेते केजरीवालांच्या भ्रष्टाचाराचे समर्थन व अटकेचा संघटीतपणे विरोध करत आहेत! इंडी आघाडीत भ्रष्टाचारावरुन अटक झालेले केजरीवाल दुसरे मुख्यमंत्री आहेत. यावरुन देशाचे राजकारण चुकीच्या दिशेने जात आहे.**

देशापेक्षा आपण मोठे आहात, असे मानणारे काँग्रेसचे राहुल गांधी व आम आदमीचे केजरीवाल नेते आहेत! ते स्वतः इमानदार समजतात.ते आणि त्यांचा पक्ष म्हणजे खरी लोकशाही! देशातील संवैधानिक कोणत्याही तपास यंत्रणेने



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

त्यांची चौकशी करु नये,असे त्यांना वाटते! भारतीय राजकारणातील लबाड नेते आहेत!त्यांनी व पक्षाने केलेल्या काळे कारनामे असे आहेत.काँग्रेस पक्षाकडे त्यांच्या कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासाठी पैसा नाही.पक्षाच्या नेत्यांना प्रवासासाठी पैसा नाही.पक्ष लोकसभेचा प्रचार व जाहिरात करु शकत नाही.हे गांधीने सांगितले. म्हणजेच पक्ष 'दिवाळखोरी निघाला, कंगाल झाला आहे.या गांधीनी देशासमोर अर्धसत्य माहिती दिली आहे.खर ,तर !काँग्रेसचे बँक खाते सील झाले नाही.हे आयकर विभागाचे २०१८-१९ प्रकरण आहे.देशात राजकीय पक्षांना आयकरातमध्ये सुट आहे.पण प्रत्येक पक्षाला रिटर्न प्रस्ताव देणे,बंधनकारक आहे.काँग्रेस पक्षाने मुदतीत आयकर रिटर्न प्रस्ताव दाखल केला नाही.त्यामुळे आयकर विभागाने त्या पक्षाला ६५ कोटी रुपायांची आर्थिक दंडात्मक कारवाई केली.यानंतर पक्ष अपीलात न्याधीकारणात गेला,तेथे त्यांना मिळाला नाही. काँग्रेस पक्षाने उच्च न्यायालयात धाव घेतली न्यायालयाने अपील न्याधीकरणाकडे जाण्याचा निर्णय दिला.त्यानंतर प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्याचे सांगितले जाते. प्राप्तीकर विभागाच्या कारवाईवरुन राहुल गांधी यांनी आगपाखड केली.यात मोदी सरकार व गुन्हेगारी पध्दतीने कारवाई करत आहे, असा काँग्रेसचा आरोप आहे. देशातील तपास यंत्रणा व प्राप्तीकर विभाग आमच्यावर कारवाई कशी काय करु शकते? हा गांधी परिवाराचा व काँग्रेसचा मुजोरीपणा! प्राप्तीकर विभागाची कारवाई सामान्य प्रक्रिया आहे.यात सामान्य कर्मचारी सुटत नाही.पण गांधी परिवार आयकर प्रकरणाला राजकीय रंग दिला जात आहे.यावरुन या गांधीनी देशात लोकशाही नाही,असा पुनरूच्चार केला. गांधींना भारतीय लोकशाहीची आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनामी सवय जडलेली आहे. या प्रकरणात न्यायपालिका व निवडणूक आयोग चकार शब्द काढत नाही,असे म्हणाले आहे. गांधी परिवार पाच हजार कोटीरुयायाची नॅशनल हेराल्ड सपत्ती हडप्प केल्याच्या प्रकरणात जामीनावर आहेत! काँग्रेस पक्षाच्या घोटाळ्याचे किस्से भरपूर आहेत. याची त्यांना कधी लाज वाटत नाही.

दुसरे आम आदमी पक्षाचे नेते केजरीवाल यांना दिल्ली दारू घोटाळा प्रकरणी ईडीने नऊ वेळा समन्स बजावले!पण ते चौकशीला जाण्यास टाळत होते. डीचे समन्सला गैरकायदेशीर होते. ईडीने त्यांना अटक न ग्यारंटी दिली तरच चौकशीला जाऊ असा हेकेखोरपणा त्यांचा होता. त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली.पण न्यायालयाने दिलासा दिला नाही. केजरीवाल हे अटकेला भीत होते. कारण यात 'कहुँ तो माँ मर जाय! ना कहुँ तो बाप बाप कुत्ता खा जाय' अशी त्यांची व्दिधा अवस्था आहे.दारु घोटाळ्यात आपला सबंध नाही,असे म्हणण्याचे ते धाडस ते करू शकत नाहीत!कारण त्यांचे तीन साथीदार जेलची हवा खात आहेत. शेवटी ईडीने केजरीवाल यांना अटक झाली.

भ्रष्टाचार म्हणजे फसवे वर्तन,भ्रष्टाचारामुळे देशाच्या प्रगती खुंटते.तो राष्ट्रासाठी कलंक आहे.विरोधी पक्ष स्वतःचा भ्रष्टाचार लपविण्यासाठी भाजपाकडे बोट दाखवित आहे. राजकारणात भ्रष्टाचाराचे उदात्तीकरण करण्याचा प्रकार आहे.लोकशाहीत निर्दोषत्व सिध्द करावयाचे असेल तर न्यायपालिकेकडे जाणे हाच मार्ग आहे.यासाठी रस्त्यावर आंदोलन करणे हे लोकशाही तत्वात बसत नाही.घटनेनुसार राजकीय नेत्यांना वेगळा न्याय देता येत नाही,पण गांधी परिवार,काँग्रेस विरोधी पक्षाला भ्रष्टाचाराबाबत वेगळा कायदा,संरक्षण हवे आहे.त्यामुळे संस्थावर अविश्वास दाखविला जात आहे.केजरीवाल व गांधी परिवार हे स्वतः निर्दोष ठरवत असतात.न्याय रस्त्यावर मिळत नाही.पण राजकारणात गेली की,नेता निर्लज्ज होतो,तो सरड्याप्रमाणे रंग बदलतो,खोट बोलतो! त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे केजरीवाल! त्यांचेवर चांगली चित्रपट कथा तयार होवू शकते.केजरीवाल यांना अटक होताच गांधी परिवार व परिवारवादी पक्ष सहानुभूती दाखवित आहेत.म्हणजे 'चोर चोर मौसरे भाई' असे ना! विरोधी पक्ष भ्रष्टाचाराच्या विषयावरुन सहानुभूती मिळेल असेच प्रयत्न करत आहे.राजकीय क्षेत्रातील नेता आपल्यावरचा कलंक लागू नये!याची काळजी घेत असतो! जर भ्रष्टाचाराचा आरोप झाला तर लगेच नैतिकच्या आधारावरपदाचा राजीमाना देत असतो!जोपर्यंत निर्दोष सिध्द होत नाही,पद स्विकारत नाही.भाजपाचे नेते लालकृष्ण अडवाणी यांचेवर काँग्रसने आरोप करताच पदाचा राजीनामा दिला होता.देशात अनेक नेते होवून गेले! पण केजरीवाल निर्लज्ज निघाले! निघाले!त्यांनी राजीनामा दिला नाही.उलट जेलमधून दिल्लीचा कारभार करणार आहेत! या प्रमाणे राहुल गांधी व त्यांचा पक्ष स्वतः ची चूक झाकण्याच्या उद्देशाने दुसऱ्यांना नैतिकचे धडे देतात!


भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य टिळक यांनी डिसेंबर १९२० मध्ये "स्वराज्य फंडा' ची सुरुवात मुंबईहून केली.हे अभियान १९२१ पर्यंत चालले.यात भारतीयांनी एक कोटीची देणगी दिली. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस व इतर राजकीय पक्षांनी जनतेतून देणगी घेण्यास सुरुवात केली. देशात १९५१ मध्ये निवडणूक प्रचारासाठी केवळ २५ हजाराची मर्यादा होती. संसदेत१९५९ मध्ये राजकीय पक्षांचा खर्च व देणगीवर चर्चा झाली.तेंव्हा एका सदस्याने 'भारत गरीब देश असून राजकीय खर्चावर कमीत -कमी खर्च करण्याची सक्ती असली पाहिजे'अशी मागणी केली.काँग्रेस सरकारने प्रथम कंपनी कायद्यात सुधारणा करत राजकीय पक्षाला २५ हजार रुपये देणगी देण्याचे मर्यादा निश्चित केली.त्यावेळी याला विरोध झाला होता. काँग्रेस सरकारने तर कंपन्यांना पक्षाला सक्तीच केली होती.तेंव्हा विरोधी पक्षाने काँग्रेस सरकारवर 'व्यापारी केंद्र' झाल्याची टीका केली होती १९६० मध्ये राजकीय पक्षांना देणगीचे विधेयक संमत झाले. तेंव्हा काँग्रेसबरोबर व स्वतंत्र पार्टीला मोठ्या देणगी मिळत होती.हे बघता! माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी १९६९ मध्ये कंपनीकडून राजकीय देणगी घेण्यावर प्रतिबंध लागू केला.पण दुसरीकडे काँग्रेस पक्षात बॅगाभरुन देणगी घेण्याची पध्दत सुरु झाली. तसेच लायन्यस व परमीट राज सुरु झाले.या माध्यमातून पक्षाने पैसा गोळा केला.त्यासाठी कंपनीला विशेष सवलती दिल्या होत्या.नंतर १९८५ माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी राजकीय पक्षाच्या देणगीवर बंदी उठवली.महाराष्ट्रासह इतर राज्यात काँग्रेसचा नेता मुख्यमंत्री झाला की,त्यांना बँगाभरुन पैसा दिल्ली दरबारी द्यावे लागत असे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे म्हणणे,भारतात नेते राजकारणाची सुरुवातच खोटे बोलून सुरु करतात. खर्चाची चूक आकडेवाडी देतो.पंतप्रधान मोदींनी राज्यसभेत बोलतांना 'बाथरुममध्ये रेनकोट घालून स्नान करण्याची कला अवगत केली पाहिजे असा टोमणा काँग्रेसला मारला होता. राहुल गांधी १० वर्षापासून मोदी सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप करत आले! त्यांना मोदी सरकारची एकही "विकेट' घेता आलेली नाही. भाजपाकडे भ्रष्टाचार नेत्याची वशिंग मशीन आहे तर मग विरोधी पक्षाकडे 'भ्रष्टाचाराचे फ्रीज" आहे काय? कारण विरोधी पक्ष भ्रष्ट नेत्यांना संरक्षण देत आलेला आहे. देशात राजकीय नेत्यांनी घोटाळे केले.त्यांना लगेच सर्वोच्च न्याय मिळतो.तसा सामान्य माणसाला मिळतो काय?.या गांधीवादी पक्षाने ७० वर्षात किती पैसा घेतला,खर्च किती केला कोणी देणगी याचा हिशोबच दिला नाही.

काँग्रेसचा नगदी देणगीचा घाट.

एडीआरच्या अहवालानुसार अज्ञात स्त्रोत्राकडून राष्ट्रीय पक्षाला६६१२ कोटी ४२ लाख व प्रादेशिक पक्षाला १२२० कोटी ५० लाखाचा निधी मिळाला आहे. एकीकडे मोदी सरकार निवडणूक सुधारणाचा प्रयत्न करत असताना दुर्देवाने विरोधी पक्ष त्याला विरोध करत आहे. काँग्रेस पक्षाचा पूर्वीप्रमाणे नगदी देणगी घेण्याचा घाट आहे. देणगीबाबत पारदर्शकता असावी व काळापैश्याला लगाम बसावा या हेतूने २०१७ मध्ये मोदी सरकारने आणला.रोखे कायद्यानुसार कंपनी बँकेला चेक देऊन रोखे खरेदी करणे,स्वच्छेने राजकीय पक्षाला देणगी देऊ शकतात.यात कंपन्याचे नाव गोपनीय पध्दतीने ठेवण्याची तरतूद केली गेली.याचे कारण राजकीय सुडबुध्दीने कंपन्यांची लक्ष्य केले जाऊ नये. याबाबत संसदेत चर्चा झाली. हे काँग्रेस नेत्यांना माहित आहे. पण सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा असंवैधानिक ठरविला आहे. हा कायदा घटनेच्या अनुच्छेद १९ (१) (अ) माहिती अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे.तसेच कंपनी कायद्याची १८२ सुधारणा रद्द केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाचा आदरच आहे. लोकशाहीत न्यायपालिका आणि विधिमंडळ दोन्हीही सर्वोच्च आहेत. पण एखाद्या कायद्यातील त्रुटीवरुन या दोन्हीत संघर्ष होवू नये,यासाठी,याची दक्षता घेण्याची गरजचेचे आहे.यात स्टेट बँके ऑफ इंडियाची काय चूक?त्यांनी तर कायद्याचे पालन केले!न्यायालयाने बँकेला फटकारे मारण्यास सुरु केली बँकेने माहिती देण्यास नकार दिला नाही जूनपर्यंत मुदत वाढ मागितली होती.ती मुदतवाढ दिली गेली नाही.ते न्यायसंगत वाटत नाहीये!.या निकालावरुन सर्वोच्च न्यायालयाच्या बार कौन्सिलने घटनेच्या १४३ अनुच्छेदनुसार राष्ट्रपतींच्या हस्तक्षेपाची मागणी केली होती.यात सरकारला कंपनीला दिलेल्या वचनाचा भंग होईल. कंपन्याचा छळ व खच्चीकरण होईल. तसेच न्यायालयाचा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू केल्यास आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाच्या प्रतिमेला धक्का बसेल, याची चिंता व्यक्त केली.नेते संगीत रागी यांनी हा निर्णय विधिमंडळाच्या अधिकारावर अतिक्रमण असल्याचे मत व्यक्त केले.यात गोपनीयता कायद्याचा भंग होतो तर मग न्यायाशीशांच्या निवडीबाबत "कॉलेजियम' पध्दतीच्या बैठकीची माहिती देता येते काय?असा सवाल चर्चेत केला. रोखे कायदा घटनाबाह्य ठरविला गेला तेंव्हा सर्वच राजकीय पक्षांनी स्विकारलेली देणगी गैरकायदेशीर ठरते.त्या देणणीची रक्कम शासकीय तिजोरीत जमा करावयाला हवी.यात निवडणुकीच्या तोंडावर निकाल आल्याने काँग्रेससह विरोधी पक्ष आंनदोत्सव साजरा करत आहेत.ते या निकालाचे राजकीय भांडवल करत आहेत.रोखे कायदा म्हणजे मोदी सरकारचा महाघोटाळा प्रचार करत आहेत.काँग्रेस प्रवक्ते आलोक शर्मा यांनी तर मोदी सरकारने निकालानंतर न्यायाशीशांना लाभाची पदे दिली आताच्या निकालामुळे न्यायाधीशांच्या जीवाला धोका होवू शकतो,त्यांना संरक्षण देण्याची मागणी केली.सर्वोच्च न्यायालयाच्या रोखे निकालात अजून तरी घोटाळा झाल्याचे म्हंटले नाही.या रोखे कायदा घटनाबाह्य व भ्रष्टाचाराचा प्रकार वाटत असताना काँग्रेसने सहा वर्षे कंपन्याकडून देणगीसाठी हात धुवून का घेतले? या प्रकरणात काँग्रेसच्या नेत्या जया ठाकूर व माकप व एडीआर संघटनेने याचिका दाखल केली होती.हे पक्षाला ज्ञात होते! न्यायालयाच्या निकालानंतर पक्षाने कंपनीची नावे स्वतः जाहीर केली नाही.काँग्रेसची भ्रष्टाचाराबाबत भूमिका दुटप्पी आहे. बंगाल व काँग्रेसच्या नेत्याकडे तीनशे करोडो सापडतात,तेंव्हा विरोधी पक्ष मौन पाळतो.

काँग्रेसने 'देशासाठी दान' हे नाटक केले.देशात २००४-२००५ २०१८- १९ मध्ये राष्ट्रीय पक्षांना अज्ञात स्त्रोत्राकडून सुमारे ११ हजार २३४ हजार कोटीरुपायाठी देणगी मिळाली, असा दावा असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्सने (एडीआर) केला आहे.रोखे कायद्यानुसार भाजपा, तृणमूल काँग्रेस,काँग्रेसला बीआरएस ,कोटीची देणगी मिळाली आहे. यात भाजपा देणगी अधिक कशी काय मिळाली? विरोधी पक्षांची ही पोटदुखी आहे.भाजपाची १७ राज्यात सत्ता, ३०३ राज्यसभेचे खासदार अधिक आहेत. कंपनीची देणगी माहिती पक्षाच्या वार्षिक अहवालात दिली जाते.तसेच कंपनीच्या जमा व खर्चाची माहिती देणे बंधकारक आहे.मग कायद्यात गोपनीयता कोठे शिल्लक राहते?यात काँग्रेस व तृणमूल काँग्रेस व बी.आर एस.ची पक्षाची एक ते दोन राज्यात सत्ता व खासदाराची संख्या भाजपापेक्षा कमी असताना या पक्षाला जी देणगी मिळाली अधिक आहे? या पक्षांना कोण- कोणत्या कंपन्याने देणगी दिली व का ? याचाही शोध घ्यावा लागेल! राहुल गांधींनी मोदी सरकारने ईडी व सी.बी.आय.चा वापर करुन हप्ता व खंडणी वसुली केल्याचा आरोप केला.हा आरोप त्यांना सिध्द करावा लागेलभाजपाला ६ हजार कोटी रू.तर इंडी आघाडीला सुध्दा ६ हजार कोटी रु. देणगी मिळाली आहे,मग ही देणगी कशी मिळाली याचा गांधी खुलासा करणार करतील काय ?राहुल गांधीत परिपक्वता अजून तर आलेली नाही,ते बेताल आणि निराधार आरोप करतात!अडचणीत येतात! राजकीय देणगी बाबत कोणता दुसरा पर्याय आहे काय?.माजी निवडणूक आयुक्त वाय. एस.कुरेशी यांनी निवडणुकीसाठी राष्ट्रीष कोष स्थापन करावा,अशी सूचना केली आहे.माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींना १९ डिंसेबर १९७८ रोजी जनता दलाचे नेते व माजी पंतप्रधान अटक केली होती.त्या सात दिवस तिहार जेलमध्ये होत्या.नंतर श्रीमती गांधींना सार्वत्रिक निवडणुकीत मतदाराची सहानुभूती मिळाली.त्या पुन्हा केंद्रात सत्तेत आल्या.त्याप्रमाणे काँग्रेस व इंडी आघाडी भ्रष्टाचारी नेत्यांचे समर्थन करुन सहानूभुती मिळण्याचे राजकारण करत आहेत.यातून केंद्रात सत्ता येईल,असे "मुंगरीलालचे सपने' पहात आहेत.

**कट्टर इमानदाराला अटक** : केजरीवाल हे भ्रष्टाचाराच्याविरोधी आंदोलनातून राजकारणात क्रांती करण्यासाठी २०१२ मध्ये राजकारणात आले .ते आपण कट्टर इमानदार आहोत, असा दावा करत होते .राजकारण हा तर बेईमानदाराचा धंदा व अड्डा आहे .केजरीवाल यांचा भ्रष्टाचाराचा व न्यायाचा वेगळा पॅटर्न आहे . न्यायालयात ईडीने दारु घोटाळ्याची माहिती दिली . ते ऐकताना मन सून्न झाले .स्वराज्य जयघोषाकडून करणारा दारु नीतीकडे वळला .तो दारू घोटाळ्याचे मुख्य सुत्रधारच निघाला .हा घाटोळा ६०० कोटीचा आहे . यात १०० कोटी कट्टर इमानदाराने रोख घेतले,असे इडीने म्हंटले आहे . या पैश्याचा आमआदमी निवडणुकीसाठी वापर केला गेला .या मार्गाने हा राष्ट्रीय पक्ष बनला .ते कायद्याचा सन्मान नाहीत ! कट्टर इमानदाराला भ्रष्टाचारावरुन जेलमध्ये जाण्याची वेळ आली .राजकीय विटंबना पहा ! आदमी पक्ष भ्रष्टाचाराच्या समर्थनार्थ आंदोलन करत आहेत .ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राजकारण म्हणजे चिखल आहे .त्यात जाऊ नका !असा त्यांना सल्ला केजरीवाल यांन दिला होता !पण त्यांनी गुरुचा सल्ला मानला नाही .







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




## पुण्यातील आनंदाश्रम संस्था : एक दीपस्तंभ

आधुनिक केसरी

त्यात अत्यंत जुना असा टाईपरायटर, संस्थापक महादेव आपटे यांना प्रदान करण्यात आलेले आणि राणी व्हिक्टोरिया यांचा शिक्का असलेले एल एल बी चे प्रमाणपत्र, प्राचीन समया, भांडी आदी गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. संस्थेचा सिंहगडावर एक बंगला देखील आहे. तेथून सभोवतालचे मनोरम दृश्य दिसते. या बंगल्याच्या निगराणीचा खर्च दरवर्षी साधारण एक लाख रुपयांपर्यंत जातो. पर्यटकांना हा बंगला भाड्याने दिला जातो. संस्थेच्या इमारतीचे आणि वसतिगृहाचे वैशिष्ट्य म्हणजे या वास्तूतील फर्निचर ' बर्मा वुड ' या वैशिष्ट्यपूर्ण लाकडापासून बनवलेले आहे. दालनाच्या खिडक्यांना रंगीत इटालियन काचा लावलेल्या आहेत. दालनातील फरशी सुद्धा १३५ वर्षांपूर्वीची आहे. तिला अजून साधा ओरखडाही पडलेला नाही. आजकाल आपण भक्कम वास्तू होण्यासाठी निरनिराळ्या सिमेंटचा वापर करतो पण या प्राचीन काळातील इमारतीची बरोबरी ते करू शकत नाही. समर्पित वृत्तीने कार्य करणाऱ्या संस्थापक महादेवजी आपटे यांनी आपल्या आयुष्याची अखेरीस संन्यास घेतला. त्यांची तळमजल्यावर समाधी आहे. वर असणाऱ्या शंकराच्या मंदिराच्या अभिषेकाचे तीर्थ  या समाधीवर पडण्याची व्यवस्था आदरणीय आपटे यांच्या इच्छेनुसार करण्यात आली आहे. काळाची पावले ओळखून संस्थेने दिल्लीतील ' नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्ट ' या संस्थेची मदत घेऊन २०१२ मध्ये आपल्याकडील असलेल्या हस्तलिखितांच्या अनमोल ठेव्यातील ९०% हस्तलिखिते डिजिटाइज्ड केली आहेत आणि बाकी हस्तलिखिते स्वखर्चाने केली आहेत. अशा प्रकारे आता संस्थेचा सर्व दुर्मिळ संग्रह नवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुरक्षित करण्यात आला आहे. ' संस्कृतस्य उन्नत्यर्थमेव निर्मित : ' हे संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. त्यानुसार गेल्या १३५ वर्षात संस्थेने भारतीय संस्कृतीसंबंधातील विविध विषयांवरचे १४६ शास्त्र ग्रंथ संस्कृतमध्ये छापले आहेत. या ग्रंथाचे एकूण १९७ खंड आहेत. विविध विषयांवरील हस्तलिखितांचे संशोधन करून ते प्रकाशित केले आहेत. हे सोपे काम निश्चितच नाही.



## आनंदी पहाट

# सुप्तावस्थेत असणारे अंतर्मन अधिक महत्वाचे

आधुनिक केसरी

सर्वप्रथम बाह्यमन त्याचा विचार करायला लागतं आणि त्याच वेळी आपल्या सुप्त अंतर्मनावर प्रत्येक विषय प्रतिबिंबित होत राहतो. मग क्रिया आणि प्रतिक्रियांचा खेळ सुरु होतो. अंतर्मनावर प्रतिबिंबित झालेले प्रत्येक विचार आपल्या वर्तन आणि व्यवहारांमध्ये परिवर्तन करत राहतात. प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असते. खरं तर आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो ? ते अवलंबून असतं. आपल्यासाठी आपलं सुप्तावस्थेत असणारं अंतर्मन अधिक महत्वाचं असतं. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. विचार, वर्तन आणि व्यवहार सकारात्मक पातळीवर अंतर्मनावर कोरले गेले तर यशप्राप्ती सहज साध्य आणि शक्य होत असते. याउलट नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार या सर्वांमुळे अंतर्मनाला दुःख आणि अपयश आपल्या वाट्याला येतं. प्रत्येक विषयाकडे आपण कसं पाहतो त्यानुषंगाने आपलं वैचारिक मंथन सुरु होत असतं. अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. दिवसभरांत एकूण सत्तर हजार विचार आपल्या अंतर्मनांत निर्माण होत असल्याचं विज्ञानाच्या प्रयोगांतून स्पष्ट झालं आहे. त्या विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. असं म्हंटलं जातं कि आपल्या प्रत्येकाची दोन मनं कार्यरत असतात. एक अंतर्मन कि जे सुप्त स्वरुपात कार्यरत असतं आणि दुसरं बाह्यमन, ज्याचं कार्य जाणीवपूर्वक सुरु असतं.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी


## विठ्ठलाचे भेटी | सार जाणे ||

सोनियाची वाटी | विषाने भरली ||
ओठी तू धरली | मुर्ख वेड्या ||१||
मृत्तिकेचा घडा | अमृते भरला ||
परी तू टाळला | पापी एक ||२||
गाथा ज्ञानेश्वरी | अमृते रसाळ ||
अज्ञानी वाचाळ | काय जाणे ||३||
चूकता हिशोब | जन्म वाया जातो ||
प्रारब्धे भोगतो | भोग येथे ||४||
दया क्षमा शांती | आनंदे त्रिपुटी ||
विठ्ठलाचे भेटी | सार जाणे ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## आदिशक्ती, ब्रह्मशक्ती

भगवतीच्या एका हातात शाक-भाजी, दुसर्या हातात धनुष्य, तृतीय हातात बाण चतुर्थ हातात आशीर्वाद रूपाने कमल धारण केले आहे. दोन्ही नवरात्रात या तीन रूपांची एकत्रित उपासना घटस्थापनेच्या रूपाने केली जाते. घटस्थापनेच्या विधिनुसार सर्वतोभद्र मंडल रचना करून मध्यभागी नऊ त्रिभुजांचे श्रीचक्र बनवले जाते. श्रीचक्रामध्ये मंडलाकार मातीची रचना करून त्यात सप्तधान्ये पेरली जातात. या मातीवर पूर्ण कुंभ स्थापित केला जातो. कुंभावर हळदी-कुंकवाने स्वस्तिक काढले जाते. घटावर कळसाचे नारळ व निरंतर जळणारा दिवा असतो. नऊ दिवस पाणी सिंचन करून सप्तधान्ये तरारतात, हिरवीगार तृणांकुरे डोलू लागतात. चढत्या क्रमाने घटाला माळ चढत जाते. देवीचा फुलोरा सजतो. चंडीपाठ किंवा सप्तशतीचे पाठ सप्तमीपर्यंत होतात. दुर्गाष्टमीला होम-हवन होते. घराघरात लक्ष्मीचे अवतरण होते. पूर्ण कुंभ किंवा घट हा महालक्ष्मीचे प्रतीक आहे. श्रीचक्र आदिशक्ती, ब्रह्मशक्तीचे प्रतीक आहे. अशा तर्हेने ही उर्वरता, समृद्धी, मांगल्याची आध्यात्मिक उपासना आहे. भारतीयांप्रमाणेच ग्रीक, रोमन, ट्यूटानिक, केल्टिक या देशांतील प्राचीन संस्कृतींमध्ये देवीची उपासना रूढ असल्याचे पुरावे सापडले आहेत. देवीचे तत्त्वज्ञानात्मक आध्यात्मिक स्वरूप देवी अथर्वशीर्षात वर्णिले आहे. 'देवी सप्तशती' मार्कंडेय पुराणाचा एक भाग आहे. देवी भागवतात देवीच्या अनेकविध अवतारांचे वर्णन केलेले आहे. 'सौंदर्यलहरी' ग्रंथात बत्तीस लक्षणांनी युक्त त्रिपुरसुंदरीचे विग्रहरूप वर्णिले आहे. 'सौंदर्यलहरी' हा ग्रंथ दक्षिणाचाराचा, श्री विद्येचा शास्त्रग्रंथ मानला जातो. दुर्गा सप्तशतीप्रमाणेच या ग्रंथाचा प्रत्येक श्लोक मंत्रशक्ती संपन्न मानलेला आहे.देवी अन्नदात्री आहे तसेच महाविद्या, ब्रह्मविद्या ही आहे. देवीरूप ऋग्वेदातील सूत्रांबरोबर लोककथांच्या द्वारे ही विकसित झाले आहे. 'सिंहवाहिनी दुर्गा' हा शब्द मूलतः द्रविड भाषेतून आला आहे. या शब्दाचा अर्थ 'महीमाता' किंवा 'पृथ्वी' असा आहे.


संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

पञ्च विषय पच इन्द्रिया, होय यथारथ ज्ञान ।
जाग्रित ताको जानिये, प्रथम अवस्था मान
।।२६।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/२६

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पाच ज्ञानेंद्रियांच्या विषयांचे ज्ञान ज्या काळी होते, तीला जागृत अवस्था म्हणतात.


संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

# प्रपंचात भगवंताची नड आहे असे वाटले पाहिजे

आधुनिक केसरी

प्रत्येक माणसाला आपण सुखी असावे असे वाटते; भगवंताची कृपा आपल्यावर असावी, नामाचे प्रेम आपल्याला यावे असे वाटते. पण हा अनुभव आपल्याला का बरे येत नाही ? जगामध्ये पाहताना कुणी मनुष्य सुखी आहे, समाधानी आहे, असे आपल्याला का बरे दिसत नाही ? अशी अवस्था असायला काय कारण असावे ? आपण सर्वजण सदाचाराने वागतो असे आपल्याला वाटते. भगवंताचे भजन-पूजन आपण सर्वजण करतो, पण तरी ते समाधान आपल्याला का बरे मिळत नाही ? ते समाधान न मिळायला खरे कारण कोणते असेल तर, आम्हांला अजून भगवंताची नड आहे असे वाटत नाही. भगवंत नसेल तर माझे चालणार नाही, माझ्या समाधानाला त्याची अत्यंत गरज आहे, असे आपल्याला मनापासून वाटतच नाही. प्रपंचात पैसा-अडका असावा, बायको-मुले असावीत, शेतीवाडी, नोकरी-धंदा, इतर वैभव असावे आणि त्याचबरोबर भगवंतही असावा असे आपल्याला वाटते. प्रपंचाची स्थिती कशीही असो, मला भगवंत हवाच, असे आम्हांला



तळमळीने मनापासून वाटत नाही. आज, प्रपंचात आम्हांला समाधान मिळेल या आशेने आम्ही प्रपंच करतो, पण इतका प्रपंच करूनही आम्हांला समाधान किती मिळाले याचा तुम्ही विचार करा. अगदी दूर, एका डोंगरावर जाऊन बसा आणि लहानपणापासून आतापर्यंत केलेल्या खटाटोपात समाधान किती मिळाले याचा आढावा घ्या आणि निश्चयाने ठरवा की प्रपंचात मला किती सुख मिळाले. आज इतकी वर्षे प्रपंच करूनही तो आम्हांला सुख देत नाही, हे अनुभवाला येऊनसुद्धा तो टाकावा असे आम्हांला वाटत नाही. प्रपंचात आम्हांला सुख मिळेल ही आमची कल्पनाच नाहीशी व्हायला पाहिजे. प्रपंच आम्हांला शाश्वत समाधान देऊ शकत नाही हे एकदा निश्चयाने ठरले, आणि हा निश्चय एकदा दृढ झाला, म्हणजे मग भगवंताची गरज आम्हांला भासू लागेल आणि मग त्याच्या प्राप्तीसाठी आम्ही केलेल्या प्रयत्नाच्या आड जग, परिस्थिती वगैरे काहीही येऊ शकणार नाही. भगवंत मला पाहिजेच हे विचाराने ठरल्यावर, त्याचे प्रेम आम्हांला यावे असे आपल्याला वाटू लागेल, आणि त्याचीच आपल्याला आज खरी गरज आहे. हे भगवंताचे प्रेम कशाने बरे निर्माण करता येईल ? भगवंताचे प्रेम यायला एकंदर तीन मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे संतांची संगती करणे; दुसरा मार्ग म्हणजे सद्विचाराची जोपासना करणे; आणि तिसरा मार्ग म्हणजे अखंड नामस्मरण करणे. त्यांपैकी ज्याला जो जुळेल तो त्याने करावा.

**८३. भगवंत हवासा वाटणे यामध्ये सर्व मर्म आहे.**

## मुमुक्षुलक्षण

आधुनिक केसरी


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मानवीजीवनात दोन अंगे आहेत. 1) पशुपण 2) देवपण पशुपणाचें अंग अज्ञानाच्या अंमलाखाली वावरते. देवपणाचे अंग आत्मज्ञानाच्या अंमलाखाली असते. बद्ध माणसाचे जीवन पशुपणाचे जीवन असते त्याच्या आशा आकांक्षा भावन, वासना, हव्यास देहसुखा भोवती घुटमळत असतात. द्रव्य,साधनसंपत्ती, प्रपंचाचा अतिरिक्त साठा याच्या भोवती त्याची बुद्धी अगदीच घट्ट पणे चिकटलेली असते. या देहबुद्धीची पकड एवढी घट्ट असते की तिच्यावर आघात होउन ती तेथून स्थान भ्रष्ट झाल्या शिवाय देवपणाकडे किंवा शाश्वत आत्मज्ञानाकडे जाण्याच मार्ग मोकळ होत नाही.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २४ मार्च २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २११
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 24 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-211 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# महापालिकेत कमिशनर नव्हे 'कमिशन-नर' बसले

## रामाळा तलावाचे काम संशयाच्या भोवऱ्यात; मनपा दिवाळखोरीच्या मार्गावर : पप्पू देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आचारसंहितेचा भंग करून मनपाचे आयुक्त विपिन पालीवाल यांनी रामाळा तलावाच्या पुनर्जीवनाचे 24 कोटीचे कंत्राट देण्यासाठी 18 मार्च रोजी निविदा प्रक्रिया सुरू केली. या प्रकरणात एकीकडे आचारसंहितेचा भंग झालेला असताना दुसरीकडे 6 दिवसात निविदा प्रक्रिया आटोपती घेऊन मर्जीतील कंत्राटदाराला काम देण्यासाठी नियम डावलल्याचा आरोप जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक पप्पू देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्राद्वारे केला.महानगरपालिकेत खुलेआम करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होत असून या भ्रष्टाचारामुळे चंद्रपूर महानगरपालिका दिवाळखोरीच्या मार्गावर असल्याचा इशाराही त्यांनी दिला. विपिन पालीवाल हे 'कमिशनर' नव्हे तर 'कमिशन-नर' म्हणजेच फक्त 'कमिशन खाणारा माणूस' आहे अशी टिप्पणी देशमुख यांनी केली.

**भ्रष्टाचारामुळे मनपा दिवाळखोरीच्या मार्गावर :** महानगरपालिकेत करोडो रुपयाचे काम देताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. सर्वांच्या समोर खुलेआम




मनपाच्या तिजोरीची लूट होत आहे. वारंवार तक्रारी करूनही मनपाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही कारवाई होत नाही. अदृश्य अघोरी शक्तींचे भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठबळ मिळत असल्याने मनपाची आर्थिक स्थिती खालावली आहे. भविष्यात कर्मचाऱ्यांचे वेतन देणे ही मुश्किल होईल अशी मनपाची स्थिती झालेली असून लवकरच आकडेवारी सह याबाबत गौप्यस्फोट करणार असल्याची माहिती पप्पू देशमुख यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे दिली.

**24 कोटी रुपयांचे कंत्राट देण्यासाठी घाई करण्याचे कारण काय ?**

24 कोटी रुपये किमतीच्या रामाळा तलावाच्या पुनर्जीवनाच्या कामासाठी निविदा भरण्यासाठी 22 मार्च ते 27 मार्च पर्यंत फक्त 6 दिवसांचा कालावधी देण्यात आला . मनपाला हे काम करण्याची कोणतीही घाई नाही . या कामाचा कालावधी 540 दिवसाचा म्हणजे सुमारे दीड वर्षाचा आहे . तरीही निविदा भरण्यासाठी फक्त 6 दिवसांचा वेळ देणे संशयास्पद आहे . कमिशन घेऊन विशिष्ट काम देण्याच्या हेतूने लगबगीने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असा आरोप देशमुख यांनी केला . करोडो रुपये किंमत असलेल्या मोठ्या कामांमध्ये अशा पद्धतीने घाई करण्याची नवीन पद्धत आयुक्त पालीवाल यांनी सुरू केल्याचा आरोपही त्यांनी केला . याच दरम्यान कंपोस्ट डेपो वरील दोन छोट्या कामांसाठी कंत्राटदार नेमण्याच्या हेतूने 15 ते 26 मार्च पर्यंत म्हणजे 12 दिवस एवढा पर्याप्त वेळ निविदा भरण्यासाठी देण्यात आला . शहरात प्रस्तावित ई-बस डेपो बांधण्यासाठी 10 कोटी रुपये अंदाजपत्रकीय किंमत असलेल्या कामासाठी निविदा भरायला 15 मार्च ते 1 एप्रिल पर्यंत म्हणजे 18 दिवस वेळ देण्यात आला . महानगरपालिकेतर्फे भूमी अधिग्रहण करण्याचे हेतूने एजन्सी नेमण्यासाठी 11 मार्च ते 26 मार्च पर्यंत 16 दिवस वेळ निविदा भरण्यासाठी घेण्यात आला . मात्र 540 दिवस कामाचा कालावधी असलेल्या 24 कोटी रुपये किमतीच्या रामाळा पुनर्जीवनाच्या कामासाठी 6 दिवसांत निविदा प्रक्रिया आटोपती घेतली .




आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** होळी हा सण फाल्गुन महिन्यात पौर्णिमेला असतो. देशात हा सण साजरा करण्याची परंपरा, पद्धत वेगळी असली, तरी उत्साह मात्र शिगेला पोहोचलेला असतो. पहिल्या दिवशी होलिका दहन होते. तर दुसऱ्या दिवशी असते धुळवड, ज्याला आपण रंगपंचमी म्हणतो. या वर्षी चंद्रग्रहणासोबतच होलिका दहनावरही भद्रकालची सावली असेल. तब्बल 100 वर्षांनंतर होळीच्या दिवशी चंद्रग्रहण होणार आहे. अशा परिस्थितीत होलिका दहनाचा शुभ मुहूर्त किती काळ कधी आहे हे जाणून घेऊया.

24 मार्च रोजी पौर्णिमा तिथी सकाळी 9 वाजून 56 मिनिटांनी सुरू होईल आणि 25 तारखेला पौर्णिमा तिथी साडे बारा वाजता समाप्त होईल. धार्मिक मान्यतेनुसार, होलिका दहन हे भाद्र तिथीला पौर्णिमा तिथीला केले जाते. यावेळी 24 मार्चला होळी तर 25 मार्चला रंगोत्सव साजरा केला जाणार आहे. 24 मार्चपासून पौर्णिमा तिथी सुरू होईल तेव्हापासूनच सुरु होणारा भद्रा काळ रात्री 11 वाजून 13 मिनिटांपर्यंत राहील. अशा स्थितीत भद्रा काळ संपल्यानंतरच होलिका दहन करणे शुभ ठरेल. होलिका दहनाचा शुभ मुहुर्त 24 मार्च रोजी रात्री 11 वाजून 13 मिनिटे ते 12 वाजून 27 मिनिटांपर्यंत.

होळीच्या दिवशी चंद्रग्रहणाचा सूतककाळ नाही

होळीवर चंद्रग्रहणाचा प्रभाव असे म्हटले जाते आहे पण या सगळ्या अफवा आहेत. २५ मार्चचे चंद्रग्रहण भारतातून दिसणार नाही. त्यामुळे वेधाचे नियम पाळण्याची गरज नाही. होळी साजरी करण्यावर काहीही बंधने नाहीत. ज्या चंद्रग्रहणाबद्दल बोलले जाते आहे ते उपछाया चंद्रग्रहण असून त्यातील सुतक काळ वैध नाही. तेव्हा मनात कोणत्याही शंका ठेवू नका आणि जोशो उत्साहाता होळी-रंगपंचमीचा आनंद घ्या.

आपल्याकडे होलिका दहन करण्यापूर्वी तिचे पूजन करण्यात येते. होलिकेजवळ जाऊन पूर्व किंवा उत्तरेकडे मुख करून बसून पूजा करण्यात येते. होलिकेस चारही बाजूने तीन किंवा सात फेर धरून कच्च्या धाग्याने बांधण्यात येते. शुद्ध पाणी व अन्य पूजा साहित्य एक एक करून होलिकेस समर्पित करण्यात येते. पूजेनंतर पाण्याने अर्घ्य देण्यात येते. एक कलश पाणी, अक्षता, गंध, पुष्प, गूळ, साबुदाणा, हळद, मूग, बत्तासे, गुलाल, नारळ, पुरणपोळी इत्यादींची आहुती देण्यात येते. नवीन धान्याचा अंश जसे, गहू, चणे इत्यादींच्या लोंबी यांचीही आहुती देण्यात येते.

होलिकेची पूजा केल्यानंतर ‘होलिकायै नमः’ असे म्हणून होळी पेटवली जाते. होळीला प्रदक्षिणा घालून पालथ्या हाताने बोंब मारली जाते. होळी पूर्ण जळल्यानंतर ती दूध अन् तूप शिंपडून शांत करतता. श्री होलिका देवतेला पुरणपोळीचा नैवेद्य, तसेच नारळ अर्पण केला जातो. होलिका दहन नेहमी भद्रे नंतरच करावे. सूर्यास्तापूर्वी सुद्धा होलिका दहन करू नये. होलिकेच्या अग्नीत भाजले गेलेले पदार्थ खाल्ल्याने व्यक्ती निरोगी राहते. होळीतून निर्माण झालेली राख दुसऱ्या दिवशी सकाळी घरी आणल्यास घरातील नकारात्मक शक्तींचा नायनाट होतो, अशी मान्यता आहे.

# प्रकाश आंबेडकरांचा अल्टिमेटम

## 'मविआ'चे भांडण मिटत नसेल तर पुढील भूमिका स्पष्ट करणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडी महाविकास आघाडीबरोबर जाणार असल्याची चर्चा मागील काही दिवसांपासून सुरू आहे. याबाबत काही बैठकादेखील पार पडल्या. मात्र, जागावाटपासंदर्भात अद्याप कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीने अधिकृतपणे महाविकास आघाडीबरोबर जाण्यासंदर्भात भाष्य केले नाही. यातच आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीला २६ मार्चपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. २६ मार्चनंतर वंचित बहुजन आघाडी आपली पुढील भूमिका स्पष्ट करणार असल्याचे सांगितले आहे.**

महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी नवीन पक्ष काढला असून एक यादी आमच्याकडे दिली आहे. त्यांना आम्ही सांगितले की, आमचे महाविकास आघाडीबरोबर भिजत घोंगडे कायम आहे. त्यामुळे आम्ही तुम्हाला आता काही सांगू शकत नाहीत. प्रकाश शेंडगे आणि आमच्यामध्ये दीड तास चर्चा झाली. त्यामध्ये ते कोणते मतदारसंघ मागतात, हे आम्ही ऐकूण घेतले, असे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

महाविकास आघाडीचे भांडण जर मिटत नसेल, तर आम्ही त्यांच्यामध्ये कुठे शिरायचे? आजही महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटामध्ये रस्सीखेच सुरू असून तिढा कायम आहे. त्यांचा तिढा सुटला की नाही? याबाबत आम्हाला माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांचा तिढा मिटणार नसेल तर आम्ही त्यांच्यामध्ये जाऊन तरी काय उपयोग? आम्ही फक्त २६ मार्चपर्यंत थांबणार आहोत. २६ तारखेला वंचित बहुजन आघाडीची जी काही भूमिका असेल ती आम्ही स्पष्ट करणार आहोत, असा अल्टिमेटम प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीला दिला.

‘वंचित’चा शाहू महाराजांना पाठिंबा

कोल्हापूर लोकसभेसाठी काँग्रेसने शाहू महाराज छत्रपती यांना उमेदवारी जाहीर केली आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शाहू महाराज छत्रपती यांना पाठिंबा जाहीर केला आहे. शाहू महाराज छत्रपती यांना आमच्या पक्षाच्या वतीने संपूर्ण पाठिंबा असून त्यांना निवडून आणण्यासाठी जे काय प्रयत्न असतील ते पक्षाच्यावतीने केले जातील, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

वंचित बहुजन आघाडीच्यावतीने काँग्रेसला एक पत्र पाठवण्यात आले होते. यामध्ये वंचित बहुजन आघाडी काँग्रेसल सात जागांवर पाठिंबा देण्यास तयार असल्याचा प्रस्ताव होता. मात्र, या प्रस्तावावर अद्याप काँग्रेसच्या हायकमांडकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. याबाबत प्रकाश आंबेडकर म्हणाले, सात जागांसाठी आम्ही काँग्रेसला पाठिंबा देण्यास तयार आहोत. त्या सात जागा काँग्रेसने आम्हाला सांगाव्यात. त्यांनी सांगितल्यावर आम्ही त्यांना पाठिंबा देण्यास तयार आहोत. येत्या २६ तारखेला आम्ही आमची भूमिका जाहीर करणार आहोत, असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.



# हदगाव शहरात पथनाट्य, प्रभातफेरी काढून मतदार जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

सिध्दार्थ वाठोरे

हदगाव : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ला मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी ८४,हदगाव विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गावात शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.या रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती संदर्भात घोषणा देऊन सर्व परिसर दुमदुमून गेला. २६ एप्रिल रोजी मतदान करण्याचे आवाहन या रॅलीच्या माध्यमातून सर्व नागरिकांना करण्यात आले. यामध्ये प्राधान्याने विवेकानंद माध्यमिक विद्यालयाने सादर केलेले पथनाट्य हे विशेष आकर्षण होते. तर पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने प्रभाफेरी,बॅनर्स व घोषणेच्या मदतीने जनजागृती करण्यात आली.हदगाव तालुक्यातील ज्या खेडेगावांमध्ये मतदानाचे प्रमाण कमी होते अशा गावामध्ये मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.रॅली ची सांगता मतदानाचे पावित्र्य राखण्याची शपथ घेऊन करण्यात आली.रॅली यशस्वी करण्यासाठी स्वीप कक्षप्रमुख तथा गटशिक्षणाधिकारी श्री. किशन फोले,शिक्षण विस्तार अधिकारी सूर्यकांत बाच्छे, डूमणे,पंचशील विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश गोरे व सर्व शिक्षक तसेच विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक बंडोपंत भोसले व सर्व शिक्षकांनी तसेच केंद्रप्रमुख चोंढेकर,उदय देवकांबळे,दत्तात्रय पवळे यांनी परिश्रम घेतले स्वीप कक्षा मार्फत सुरू असलेल्या मतदार जनजागृती कार्यक्रमाचे कौतुक सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे आणि तहसीलदार विनोद गुंडमवार, ना.तहसिलदार हाराळे, मिडीयाकक्ष प्रमुख तथा ना. तहसिलदार अनिल तामसकर आदिनी केले.




# मतप्रक्रिया, मतदान आणि राजकरण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४


आधुनिक केसरी

**एखाद्या विशिष्ट वेळी विशिष्ट प्रकारचे आपले तयार झालेले मत हे आपल्या सबंध मनाचे द्योतक असते, असे जर कोणी मानत असेल तर ते राजकारण होय असे म्हणावे लागेल. कारण वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे आपले मत असू शकते. लोकशाही अंतर्गत मतदानाच्या प्रक्रियेतून लोकसत्ताक राज्याची स्थापना ही आपल्या मतप्रक्रियेचा एक आदर्श भाग तर हेच मतदान करण्यासाठी विविध प्रलोभनांची देवाणघेवाण हा आपल्या निम्नस्तरीय मानसिकतेचा एक भाग म्हणून पुढे येतो. राजकारणात सर्व क्षम्य असते, या गृहीतकावर ही सर्व प्रक्रिया चालत असते.**



## क्षितिजापल्याड

परंतु आदर्श समाज व्यवस्थेसाठी आणि राजकारणातील सुधारणेसाठी या सर्व बाबींचा अव्हेर आपण करणार नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने राजकीय सुधारणा आपण करू शकणार नाहीत. समाजामध्ये विविध मतमतांतरांचा गलबला असतो. आपलं तेच खरं आणि बाकीच्यांचं खोटं हे दाखविण्यात बहुतेकांना स्वारस्य असतं. मानवी स्वभावाची ही सहज प्रवृत्ती असली तरी राजकारणात मात्र याच प्रवृत्तीतून विशिष्ट गट जन्माला येतो. ही प्रवृत्ती मग सत्ताधाऱ्यांची, विरोधकांची किंवा त्यांना केंद्रस्थानी ठेवून मतदान करणाऱ्या मतदारांची देखील असू शकते. यातून कधी वर्णश्रेष्ठत्व, धर्मश्रेष्ठत्व, जातश्रेष्ठत्व, प्रांतश्रेष्ठत्व, भाषाश्रेष्ठत्व तर कधी वंशश्रेष्ठत्व बिंबविण्याचा प्रकार एकीकडे होत असताना त्यास विरोध म्हणून विविध प्रकारचे लढे, मोर्चे, आंदोलने आणि सर्वधर्म समावेशक मांडणी, समाजसत्तावादाचा पुरस्कार, बहुजनांना एकसंघ करण्याचा प्रयत्न तर कधी राष्ट्रवादाची गुंफण करण्यात येते. सर्वच राष्ट्रीय, प्रांतिक राजकीय पक्ष तसेच अपक्ष उमेदवार यांचे ध्येय देशाला सर्वतोपरी पुढे नेण्याचे असले तरी प्रत्येकाचे मार्ग भिन्न असल्याचे राजकीय पटलावर दिसून येते. या सर्व प्रक्रियेत सामान्य मतदाराला गृहीत धरण्यात येऊन त्याचे मत परिवर्तन करण्याचा प्रयत्न हर तऱ्हेने केला जातो. यात नेहमीच राजकीय तत्त्वज्ञानाची भाषा वापरण्यात येते असे नाही, तर बहुतांश वेळेला प्रलोभनाच्या माध्यमातून आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जातो. जगात जिथे कुठे माणूस आहे तिथे त्याला समस्या असणारच. या समस्यांचे भांडवल करून कधी सहानुभूतीने तर कधी अन्य मार्गाने तो मतदार आपल्याकडे कसा वळविता येईल याकडे लक्ष दिले जाते. आज दूरचित्रवाणी, वर्तमानपत्रे आणि अन्य समाजमाध्यमांच्या मदतीने आपल्या बाजूने वातावरण कसे निर्माण होईल आणि त्याचा फायदा मतदानाच्या रूपाने आपणास कसा करून घेता येईल हे नेहमीच पाहिले जाते. या सर्व बाबींसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असते. हा पैसा मग देशातील अनेक वर्गाकडून वेगवेगळ्या सबबीखाली जमा करण्यात येतो. खरे तर आदर्श लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये धनिकांचे उच्चाटन झाल्याशिवाय शेवटच्या माणसापर्यंत लोकशाहीची फळे पोहोचणार नाहीत हे आपण लक्षात घेत नाही. कारण विविध प्रकारच्या संधी आणि सत्ता या अर्थसत्तेशी निगडित असल्यामुळे काही बोटावर मोजण्या इतपत लोकांकडे देशातील बहुतांश संपत्तीचे केंद्रीकरण झाल्यास सामाजिक असंतुलनास वाव मिळतो. पुढे चालून उद्भवणाऱ्या अनेक अनिष्ट गोष्टीचे मध्यवर्ती केंद्र म्हणून आपणास अर्थसत्तेच्या केंद्रीकरणाकडे पाहता येईल. राज्यकर्त्यांनी किंबहुना राजकारण करणाऱ्या सर्वच घटकांनी या बाबीकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. याउलट आज अशी परिस्थिती आहे की धनिकांकडून कोण किती प्रमाणात अर्थप्राप्ती करून घेण्यात यशस्वी होईल, तोच राजकारणात यश मिळवू शकेल अशी असणारी परिस्थिती आहे. बहुमताच्या रेट्यापुढे झुकणे, पैशाच्या प्रलोभनास बळी पडणे आणि निवडून न येण्याच्या भीतीने गैर मार्गाचा अवलंब करणे हे आदर्श लोकशाहीसाठी घातक गोष्ट म्हणावी लागेल. तसेच आपले मत प्रदर्शित करण्याचे, प्रचार करण्याचे आणि निवडून येण्यासाठी एकत्र येण्याचे स्वातंत्र्य जेवढे आपणास आहे, तेवढेच स्वातंत्र्य विरोधकांनाही असावे याकडे देखील लक्ष दिले पाहिजे. अन्यथा विविध प्रकारच्या क्लृप्त्या योजून, विरोधकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण करणे, सर्वच माध्यमांमधून फक्त सत्ताधारी वर्गाचे महिमा मंडन चालू असणे यातून केवळ आपण विरोधकांवर जरब बसवत नाही, तर त्या अनुषंगाने देशांतर्गत लोकांमध्ये देखील अपसमज पसरविण्यात आणि आपल्या विरोधी मत तयार होण्यास अप्रत्यक्षपणे मोठा हातभार आपण लावत असतो. समाजांतर्गत असलेली न्यायनीतीची कल्पना आणि आर्थिक व्यवहारावर असलेले सामाजिक बंधन यास तडा जाऊ लागल्यास निश्चितच आपल्या विरोधी मत तयार होत आहे हे लक्षात घ्यावे. कारण व्यक्तिवादी अर्थशास्त्र आणि



भांडवलदारी आर्थिक घटनांना महात्मा गांधींनी सैतानी प्रकार संबोधून तो दूर करण्याचा आपल्या आचरणातून प्रयत्न केला. कारण ज्या रस्किनच्या ग्रंथाचा महात्मा गांधींवर प्रभाव होता त्या अनटू धिस लास्ट यामध्ये आधुनिक भांडवलदार कसे अनर्थकारी आहेत हे पटवून दिलेले आहे. आज भारतातील सर्वच राजकीय पक्ष आणि राजकारणी मंडळींच्या तोंडी महात्मा गांधींचे नाव सदोदित असते. त्याच महात्मा गांधींच्या शिकवणीकडे मात्र हेतूतः दुर्लक्ष केले जात आहे. प्रत्यक्ष निवडणुकीच्या धामधुमीत ह्या कोणत्याच गोष्टीकडे कोणाचे लक्ष जात नसले तरी आणि इथला बहुतांश वर्ग प्रलोभनाला बळी पडत असला तरी समाजातील सुजाण आणि सजग नागरिकांनी मात्र याविषयी सातत्याने प्रबोधन करत राहिले पाहिजे. केवळ निवडणुकीवर डोळा ठेऊन कृती करणे हे राजकारण्यांचे काम असेल तर तीच निवडणूक प्रक्रिया समजावून सांगणे हे कोणत्याही सुशिक्षित नागरिकाचे कर्तव्य होय. कोणी कोणाला मतदान करावे हा सर्वस्वी त्या मतदाराचा अधिकार असला तरी हे मतदान कशासाठी करायचे आणि कसे करायचे हे मात्र समजून सांगणे आपले कर्तव्य ठरते. मानवी इतिहासाच्या लाखो वर्षात लोकशाही व्यवस्था तशी म्हणावी तर फारच लहान, बाल्यावस्थेत म्हणावी लागेल. या अवस्थेतच तिचे भरण पोषण योग्य झाले, योग्य संस्कार घडले तर भविष्यात कमी अडचणी निर्माण होतील. अन्यथा या मानव जातीने कोणालाही नकोशी असलेली व अजूनही सुप्तावस्थेत असलेली व्यवस्था अनुभवलेली आहे. त्यामुळे मताचे दान देताना ते सत्पात्री व्हावे, ही खबरदारी तर आपण नक्कीच घेऊ शकतो.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# नवचैतन्य निर्माण करण्याचा उत्सव शिमगा



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपल्या धर्म शास्त्रानुसार आपण अनेक सण उत्सव साजरे करतो.प्रत्येक सण उत्सवाच महत्व वेगवेगळ आहे.होळी हा परिवर्तनाचा उत्सव आहे. अंहकार दुर्गुणांची होळी करून सद्गुण चा स्वीकार गरजेचं आहे. निसर्ग सुद्धा हे परिवर्तन स्वीकारून पानगळीच्या नंतर नवचैतन्य पालवी निर्माण करत सुखद धक्का देतो तो हाच कालावधी आहे. आपल्या संस्कृती नुसार देशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होणारा शिमगा हा उत्सव पौराणिक परंपरेनुसार होलिका दहन करण्याचा उत्सव असला तरी त्यातली मुळ मुख्य भाव हाच आहे. कि आपल्या जीवनातील आळस, नकारात्मकता चिंता, निरूत्साह, दुःख, तणाव, द्वेष, राग, अंहकार याची होळी करा.**

दुःख मुक्त व्हा चिंता मुक्त व्हा एक नवीन सुरुवात म्हणून स्वतः मध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात सकारात्मक उर्जा निर्माण करा म्हणजे रंग उधळत चैतन्य निर्माण करा. सर्व दुर्गुण  होलिकेत अर्पण करा आणि ह्या बाबी आपल्या जीवतातुन दुःख काढुन टाका आपोआप नवचैतन्य निर्माण होऊन आपल्या जीवनात एक वेगळं परिवर्तन होईल याच परिवर्तनाचे साक्षीदार होण्याचा हा भव्य उत्सव म्हणजे होळी. निसर्गाच परिवर्तन या नियमानुसार कडाक्याची थंडी संपुष्टात येऊन जीवाची लाही करणा-या उन्हाळ्याची चाहूल देत निसर्ग आपलं रूपड बदलतो. बदलत्या निसर्गाच्या रूपाचे मानवी जीवनाच्या अनुषंगाने अनेक दृष्ट्या महत्व आहे.निसर्ग ज्या पद्धतीने स्वतः उन्हाळा हिवाळा पावसाळा याचा सुयोग्य मेळ घालतो आणि आपलं कार्य पुर्ण करतो त्याच पद्धतीच्या मानवाने देखील आपल्या जीवनातील सुख दुःखांचा मेळ घालत आयुष्य पुढे नेताना निसर्गाकडून काही तरी शिकण्याची गरज आहे. आयुष्यातील दुःखांचा ओझ किती काळ डोक्यावर घेऊन मनुष्य फिरू शकतो त्याला पण एक मर्यादा असते. म्हणून निसर्गाने आपल्या सुंदर रचनेत अनेक आकर्षक बाबी निर्माण केल्या आहेत.त्याच वेळोवेळी आपल्या रूप दर्शन घडतं. जसं जसं उन्हाचा तडाखा निर्माण होऊन सगळीकडे लाहीलाही होण्याची सुरुवात होते. निसर्गातील सगळी हिरवळ संपुष्टात येऊन सगळीकडे फक्त मनात उदासीनताच निर्माण होईल असं रूक्ष वातावरण दिसत.आणि याच भायनाक वातावरणात सगळ्याच झाडांची पानगळ सुरुवात होऊन नवं पालवी फुटु लागते.आणि नेमकं याच वेळी पळस या झाडाला एकही पान शिल्लक नसताना देखील पळस स्वतः नवचैतन्याच प्रतिक होत परिवर्तनाचा शिलेदार होतो. अगदी निसर्गाला आव्हान देत उभा असतो. तुझ्या दहकतेमुळे माझी पान जरी नष्ट झाली तरी माझी इच्छा शक्ती नष्ट झाली नाही. मी पुन्हा उभा राहतोय पान नसताना देखील फुलांना जन्म घालतोय हा नवा संकल्प घेऊन पळस निसर्गाच्या कुशीत प्रचंड प्रमाणात



लाल रंगाच्या फुलांनसह सगळ्यांचं लक्ष आपल्या कडे आकर्षित करतो. या फुलांच्या घडामुळे हा डोंगर माथा सपाटा प्रदेश अगदी सगळीकडे एक चैतन्य निर्माण होते आणि कड कड अशा उन्हाळ्याची चाहूल लागली असताना देखिल एकटा पळस निसर्गाच्या सौंदर्यात भर घालत नवचैतन्य निर्माण करतो.दहक अशा उन्हाळ्याची जाणीव होऊ देत नाही.त्याच पद्धतीने आपल्या जीवनातील आळस , दुःख,चिंता,तणाव याच दहन करून नवचैतन्याची होळी साजरी करण्याच पर्व म्हणजे शिमगा. निसर्गातील बहुतांश झाडांची पानगळ झालेली असताना देखिल नवीन पालवी फुटते म्हणजे नवचैतन्य निर्माण होतं.तसंच मानवी जीवन आहे अनेक वेगवेगळ्या पद्धतीचे दुःख कुठेतरी नष्ट करून पुन्हा नव्या उमेदीने कामाला सुरुवात करण्याच पर्व म्हणजे शिमगा होळी उत्सव असून कडकडीत उन्हात सुद्धा झाड जीवन जगण्याची गोडी अजिबात कमी होऊ देत नाहीत.हिच बाब मनुष्याला निसर्गा कडुन शिकणं आवश्यक आहे. आणि आपल्या जीवनात आत्मसात करत सुख दुःखांचा मेळ घालत नवचैतन्य निर्माण करण्याची आवश्यकता आहे.आणि हाच शुभारंभ उत्सव महोत्सव म्हणजे होळी.निसर्गातील परिवर्तनाचे माध्यम असणारा पळस त्याचा तो बहर आणि त्याच पळसाची फुले त्या फुलांचा प्रेरणादायी रंग लेवुन आपण आनंदी जीवनाची सुरुवात करतो.महणून दुःख संपुष्टात आणल पाहिजे ते विसरलं पाहिजे व नवचैतन्य निर्माण असा आनंद जीवनात कसा निर्माण होईल यासाठी प्रयत्न केला आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अमेरिकेत टिकटॉकवर बंदी : ड्रॅगनच्या नाकात दोऱ्या



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**आंतरराष्ट्रीय राजकारणात डावपेज फार महत्त्वाचे असतात. कुठलाही छोटा किंवा मोठा निर्णय घेताना विचारपूर्वक पावले टाकावी लागतात. त्याच्या दूरगामी परिणामांचा विचार करावा लागतो. चिनी ॲप टिकटॉकवर तीन वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी प्रशासनाने बंदी घातली. त्या पावलावर पाऊल टाकून अमेरिकेने त्या निर्णयाचे शिक्कामोर्तब केले आहे. त्याचे दूरगामी परिणाम चिनी ड्रॅगनच्या आर्थिक प्रकृतीवर होण्याची शक्यता दिसत आहे. मागील आठवड्यात अमेरिकेतील प्रतिनिधी गृहात बहुमताने ठराव करून चिनी ॲप टिकटॉकच्या वापरावर निर्बंध लादले आहेत. जगातील सुमारे २० पेक्षा अधिक राष्ट्रांमध्ये या ॲपवर बंदी आहे. त्यामुळे चिनी ड्रॅगनच्या नाकात जणू दोऱ्याच बांधल्या गेल्या आहेत असे म्हणावे लागेल. अमेरिकेने घेतलेला चिनी ॲपवरील निर्बंधाचा हा निर्णय अनेक दृष्टीने महत्त्वाचा आहे. अमेरिकेमध्ये १७० दशलक्ष लोक टिकटॉक वापरत होते. दर १३ मिनिटांनी एक अमेरिकन टिकटॉकचा वापर करत होता.**

विशेषतः तरुण वर्गामध्ये टिकटॉक हे लोकप्रिय ॲप होते. त्याचा उपयोग त्यांना कलात्मक क्रियाकल्प करण्यासाठी होत असे. शिवाय टिकटॉकमुळे त्यांचे मनोरंजनही होत होते. परंतु टिकटॉकवर निर्बंध लादण्याचे खरे कारण म्हणजे, अमेरिकेतील लोकांच्या खाजगी जीवनावर व सुरक्षेवर होणारा संभाव्य परिणाम. तसेच पुढील नोव्हेंबर मध्ये होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीत या ॲपचा उपयोग करून चीन काही प्रभाव टाकू शकतो, असा धोकाही बायडेन प्रशासनाला वाटला. अमेरिकेची गोपनीय माहिती चीन टिकटॉकच्या माध्यमातून आपल्याकडे घेईल आणि अमेरिकेच्या सुरक्षेला चीन धोका निर्माण करेल अशी भिती निर्माण झाली. त्यामुळे अमेरिकेला हा निर्णय घ्यावा लागला. हा निर्णय सहा महिन्याच्या कालावधीनंतर कायम होण्याची शक्यता आहे. पुढील बंदीचा हा निर्णय सहा महिन्यांकरता ऑक्सिजनवर का ठेवण्यात आला आहे, असाही प्रश्न विचारण्यात येत आहे. त्याचे कारण म्हणजे, एकदम बंदी आणली तर अमेरिकेतील व्यक्तीस्वातंत्र्यवादी लोक नाराज होतील याची भिती अमेरिकेला वाटते. त्यामुळे ठंडा करके खाओ या न्यायाने प्रथम सहा महिन्यांचा निर्बंध, नंतर बंदी अशी भूमिका बायडेन प्रशासनाने घेतली आहे. एक गोष्ट महत्त्वाची आहे की, अनेक लोकांनी या बंदीस विरोध केला आहे. तरुणांचा तर विरोध आहेच शिवाय माजी राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनीही या बंदीबाबत वेगळा सूर लावला आहे. सत्ताधारी डेमोक्रॅटिक पक्ष जे करतो त्याला विरोधी पक्षाने विरोध करावा हे लोकशाहीमध्ये ओघानेच येते. परंतु अमेरिकेने घातलेली बंदी ही एक प्रतिक्रिया स्वरूपात महत्त्वाची आहे.

फेसबुकवर चीनमध्ये बंदीः

काही वर्षांपूर्वी चीनमध्ये अमेरिकेतील फेसबुक व ट्विटर या कंपन्यांवर बंदी घालण्यात आली आहे. याचे कारण असे की, चीनला असे वाटते की, विचार स्वातंत्र्याची मोकळीक देऊन तेथे टेरर किंवा दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न अमेरिकन लोक करू शकतील. लोकशाहीच्या नावाखाली चीनमध्ये अस्थिरता आणण्याचा प्रयत्न फेसबुकद्वारे होईल. त्यामुळे फेसबुक व ट्विटरवर चीनने बंदी आणली आहे. चीनच्या या बंदीला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने सुद्धा त्याच्या टिकटॉक या लोकप्रिय ॲपवर बंदी आणली आहे. त्यामुळे चीनचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. हे नुकसान १७० दशलक्ष डॉलर्सचे होईल असा अंदाज आहे. त्यामुळे चीनमधील टिकटॉक या ॲपचा जगामध्ये सर्वात मोठा उपभोक्ता वर्ग अमेरिकेत आहे. परिणामी, अशा बंदीमुळे चीनच्या आर्थिक व्यवहारामध्ये अनेक अडचणी येतील. मुळातच चीनमधील अर्थव्यवस्था डबघाईला आली आहे. तेथील २-३ बांधकाम करणाऱ्या अभियांत्रिकी कंपन्या सध्या संकटात सापडल्या आहेत. अनेक सेमी कंडक्टर कंपन्या चीन सोडून इतर देशाकडे वळल्या आहेत. चीनमधील चार मोठ्या बँकाही गतवर्षी बुडाल्या. संकटात संकट, एक संकट आले की त्याला जोडूनच अनेक संकटे येतात त्या पद्धतीने आता टिकटॉक या ॲपवरील बंदी म्हणजे चीनपुढे वाढून ठेवलेले एक नवे संकट आहे असे म्हणावे लागेल. चिनने अमेरिकन कंपन्यांवर बंदी घातली. त्यावर प्रतिक्रिया म्हणून अमेरिकेने टिकटॉकवर बंदी घातली आहे. आत त्यामुळे चीन कोणता नवा डाव टाकेल याकडे जगातील निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. कॅनडा पाठोपाठ अमेरिकेने टिकटॉकवर बंदीचा निर्णय घेतला त्याचा चिनला धक्का बसला आहे.

भारताने २०२० मध्येच टिकटॉकसह ५९ ॲपवर बंदी घातली आहे. भारतामध्ये सुद्धा चीनचे वाढते उपद्व्याप आणि वाढत्या कारवाया यामुळे भारतीय प्रशासनाने प्रक्षुब्ध जनमत लक्षात घेऊन ॲपबंदीचा रास्त निर्णय घेतला. आपल्या देशात भारताची गोपनीय माहिती वळविण्याचा प्रयत्न चीन अशा ॲपद्वारे करतो आहे आणि भारत विरोधी प्रचार करण्यात त्या ॲपचा उपयोग करत आहे, हे चीनचे दुष्ट षड्यंत्र भारतीय प्रशासकांच्या लक्षात आले आणि भारताने बंदी घातली. त्या पाठोपाठ आता २ - ३ वर्षांनी खुद्द अमेरिकेने तो प्रयोग केला. यावरून असे लक्षात येते की, भारताने तीन वर्षांपूर्वी घेतलेला शहाणपणाचा निर्णय अमेरिकेला २०२४ मध्ये घ्यावा लागला. याचा अर्थ असा होतो की, भारताने घेतलेला दूरदृष्टीचा निर्णय तीन वर्षांनी अमेरिकेला सुद्धा पुन्हा घ्यावा लागला. यात भारताचे शहाणपण व दूरदृष्टीचे धोरण लक्षात येते.

महत्त्वाचे अनेकविध पैलूः

अमेरिकेने टिकटॉक या ॲपवर बंदी घातली त्याचे अनेकविध पैलू आहेत. हे ॲप माहिती, मनोरंजन व शिक्षणाचे काम करते आहे, असे टिकटॉकच्या संचालकाचे म्हणणे आहे. टिकटॉकचे कार्यालय चीनमध्ये नसून ते सिंगापूरमध्ये आहे. टिकटॉकचे संचालक हे मूळचे चिनी वंशाचे एक सद्गृहस्थ असून त्यांचे नाव च्यू शॉ जी असे आहे. २०२१ पासून ते टिकटॉकचे अमेरिकेतील प्रशासन सिंगापूरमधून चालवतात. परंतु चीनचे हे प्रशासकीय गौडबंगाल अमेरिकेला चांगलेच ज्ञात आहे. आपल्या एखाद्या प्याद्याला पुढे करावे व त्यांच्या मार्फत अमेरिकेवर शरसंधान साधावे अशा प्रकारचे चिनी ड्रॅगनचे धोरण असते, हे लक्षात घेतल्यामुळे जरी चिनची कारवाई सिंगापूरमध्ये चालू असली तरी देखील ही कारवाई खुद्द चिनला बळ देणारी आहे हे अमेरिकेच्या लक्षात आले आहे. सध्या चीन आणि अमेरिका दरम्यानचे संबंध बिघडलेले आहेत, ताणलेले आहेत. या पार्श्वभूमीवर हा टिकटॉकवरील निर्बंध आता तेवढाच धक्कादायक वाटत असला तरी अमेरिकेच्या सेल्फचा म्हणजे अस्मितेचा रक्षण करणारा निर्णय आहे असे म्हणावे लागेल. सिंगापूरमध्ये बसून कारभार करणाऱ्या टिकटॉक कंपनीला अमेरिकेने चांगलेच वेसण घातले आहे. हा लगाम बसल्यामुळे आता टिकटॉकचा अमेरिकेतील व्यापार व उद्योग थंडावेल व सगळ्यात मोठा टिकटॉकचा उद्योग करणारी कंपनी आता अडचणीत येईल. इकडे चिनने फेसबुक आणि ट्विटरवर बंदी घातल्यानंतर आता अमेरिकेने सुद्धा प्रतिकारवाई म्हणून ही कारवाई केली आहे असे तज्ज्ञांचे मत आहे. खुद्द अमेरिकेतील तज्ज्ञ असा काही संबंध लाव नाहीत पण एक गोष्ट खरी आहे की, त्या त्या देशातील कायदे परदेशातून येणाऱ्या उद्योगांनी पाळावेच लागतात. टिकटॉक ही जरी सिंगापूरची चिनी कंपनी असली तरी देखील या कंपनीला अमेरिकेत कारभार करावयाचा असेल तर अमेरिकेतील कायद्याचे नियम पाळावेच पाहिजेत. परंतु अमेरिकन कायद्याचा भंग करून तेथील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपयोग करून पुन्हा अमेरिकेच्या विरुद्धच गोंधळ घालावयाचा असे चिनचे नेहमीचेच धोरण आहे. मधे चिनने




स्थापन केलेले पोलिस ठाण्याचे प्रकरण बरेच गाजले. आता हा ॲपवरील बंदीचा निर्णय यासाठी घेण्यात आला आहे की, चिनचे वाढते उपद्व्याप हे हेरगिरीच्यादृष्टीने आणि लष्करी हालचालीच्यादृष्टीने अमेरिकेला धोकादायक वाटतात. त्यामुळे अमेरिकेने हा निर्णय घेतला आहे असे म्हणावे लागेल. सिंगापूरमधून अमेरिकेत बसून गुप्त कारवाया करणाऱ्या चिनच्या डोकेबाज धोरणांना अमेरिकेने दिलेला हा प्रतिशह आहे असे म्हणावे लागेल.

अनेक देशातील निर्बंधः

भारतासह अशिया खंडातील बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका, जॉर्डन इत्यादी देशांनी चिनी ॲपवर बंदी घातली आहे. शिवाय आफ्रिकेतील ३-४ प्रमुख देशांनीही ॲपवर बंदी घातली आहे. युरोपातील काही देश सुद्धा चिनच्या या आक्रमणाचा धोका लक्षात घेऊन बंदिस सज्ज झाले आहेत व काहींनी तर बंदी आधीच टाकली आहे. सध्या भूराजनैतिकदृष्टीने अशिया खंडातील छोट्या मोठ्या देशांचे महत्त्व चिनने ओळखले आहे. त्यामुळे नेपाळ, मालदीव यासारख्या छोट्या शेजारी राष्ट्रांमधील राज्यकर्त्यांना आपल्याकडे वश करून घेऊन त्यांच्या वतीने भारताला विरोध करावयाचा असे चिनचे धोरण आहे. त्यामुळे भारताने आणि अमेरिकेने चिनी ॲपवर बंदी घालण्याचा जो निर्णय घेतला आहे तो तेवढाच महत्त्वाचा आणि तेवढाच क्रांतीकारक आहे असे वाटते. दुसरी बाजूही महत्त्वाची. या बाबतीत दुसरी बाजू सांगताना असे म्हटले जाते की, अमेरिकेतील तरुणाईची टिकटॉक ही गरज होती, ते एक मनोरंजनाचे साधन होते. परंतु आता टिकटॉकवरील बंदिमुळे अमेरिकेतील किशोरावस्थेतील तरुण वर्ग नाराज झाला आहे. शिवाय विरोधी पक्षनेते डोनाल्ड ट्रम्प यांनीही सरकारच्या या निर्णयाला विरोध केला आहे. पण एक गोष्ट मात्र खरी आहे की, चिनच्या ॲपमुळे अमेरिकेतील लोकांचे प्रायव्हसी धोरण अडचणीत येत होते. शिवाय अनेक पोर्नोग्राफी साईट त्याद्वारे दाखवून तरुणांना आपल्याकडे ओढण्याचा चिनचा डाव होता. अशा पद्धतीच्या पोर्नोग्राफीचासुद्धा अमेरिकन तरुणांवर विपरीत परिणाम होण्याचा धोका लक्षात घेऊन, अमेरिकेने या ॲपवर बंदी घातली आहे असे म्हणता येईल. आता उरलासुरला प्रश्न पडतो तो अमेरिकेतील चिनी कंपन्यांच्या कारवायांचा. ही टिकटॉक कंपनी आता अमेरिकेच्या फेडरल कोर्टात धाव घेईल आणि आमच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर सरकारने गदा आणली आहे असे सांगून तेथे चोराच्या उलट्या बोंबा करेल. त्यामुळे त्यांचा तो युक्तिवाद किती टिकेल याबद्दल शंका वाटते. शेवटी बायडेन या प्रशासनाने प्रतिनिधीक गृहामध्ये घेतलेला निर्णय आणि सिनेटमध्ये होणारा संभाव्य निर्णय आणि नंतर दोन्ही सभागृहातील निर्णय याच्या आधारे न्यायालयामध्ये गेल्यानंतर न्यायालय असे म्हणेल कायदा करण्याचा हा अधिकार प्रतिनिधी गृहाला आणि सिनेटला म्हणजेच दोन्ही मिळून काँग्रेसला आहे. त्यात न्यायालय काही हस्तक्षेप करू इच्छित नाही. म्हणजे चिनचा कायदेशीर लढाईचा मार्गही बोथट होईल असे वाटते. त्यामुळे खुद्द अमेरिकेला आपल्या विजयाची चांगलीच खात्री असल्यामुळे अमेरिकेने हा निर्णय योग्य वेळी घेतला आहे असे वाटते. कारण पुढील नोव्हेंबरमध्ये तेथे अध्यक्षीय निवडणुका आहेत. भारतामध्ये सुद्धा निवडणुका आहेत. अनेक लोकशाही राष्ट्रांमध्ये निवडणुकांचे पडघम वाजत आहेत. त्यापूर्वी ॲपवर घातलेली ही बंदी खरोखरच स्वागतार्ह आणि योग्य म्हटली पाहिजे कारण त्यामुळे लोकशाही प्रक्रियेला भेडसावणारा संभाव्य धोका टाळता येईल असे अमेरिकेला वाटते.

या सर्व चर्चेचे सार असे की, अमेरिकेच्या प्रतिनिधी गृहाने घेतलेला टिकटॉक चिनी अँपवरील बंदिचा निर्णय हा महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा आहे यात शंका नाही... चिनच्या उद्योगधंद्यामधील वाढती घसरण, बांधकाम उद्योगाला बसलेला फटका, २-३ महत्त्वाच्या बँकांचे बुडणे त्यामुळे चिनची अर्थव्यवस्था विकलांग झालेली असताना अमेरिकेने घेतलेला हा टिकटॉकवरील बंदिचा निर्णय आणखी चिनी अर्थव्यवस्थेला संकटात टाकणारा आहे. जरी शी जिनपिंग यांनी वॉशिंग्टनचा दौरा केला आणि आपले आता काही शीत किंवा उष्ण भांडण नाही असा कांगावा ते करत असले तरी देखील त्यांची ही चाल अमेरिकेने ओळखली आहे आणि चिनचे हे उपद्व्याप व कारवाया याला प्रतिशह देण्यासाठी तोडीस तोड म्हणून अमेरिकेने घेतलेला हा निर्णय योग्य आहे असे वाटते. त्यामुळे अमेरिकेचे हित राखले जाईल आणि अमेरिकेचे सत्व आणि स्वत्व टिकविण्यास मदत होईल असे वाटते. थोडक्यात, टिकटॉक ॲपवर घातलेली बंदी खुद्द अमेरिकेसाठीच नव्हे तर अन्य जगातील लोकशाही राष्ट्रांसाठीसुद्धा तेवढीच महत्त्वाची आणि स्वागतार्ह आहे. त्यामुळे चिनी ड्रॅगनचा थयथयाट होईल पण अमेरिकेने या चिनी ड्रॅगनला आपल्या कायदेशीर लढाईत गुंतवून ठेवले आहे आणि जरी त्याला असे वाटत असले की आपण काहीतरी कायदेशीर कारवाई करून हा निर्णय हाणून पाडू परंतु अमेरिकेतील संसदेने घेतलेला हा निर्णय सर्वोच्च न्यायालय फिरवेल असे वाटत नाही. संसद व राष्ट्राध्यक्षांनी घेतलेल्या ठाम निर्णयाला सर्वोच्च न्यायालय विरोध करेल असे आज तरी वाटत नाही. त्यामुळे टिकटॉकवर घातलेली बंदी ही न्याय, योग्य आणि स्वागतार्ह आहे असेच म्हणावे लागेल किंबहुना लोकशाही वाचवण्यासाठी व तिसऱ्या महायुद्धापासून जगाला सुरक्षि ठेवण्यासाठी या प्रकारचे निर्णय घेणे आवश्यक आहेत व तसा निर्णय बायडेन प्रशासनाने घेतला आहे हेही महत्त्वाचे आहे. त्यातच अमेरिकेचे व मानवजातीचे हित आहे यात शंका नाही.

काळ बदलला आहे, तंत्रज्ञानही बदलत आहे. भविष्यकाळामध्ये या प्रकारच्या अनेक समस्यांना सामोरे जाण्यासाठी अमेरिकेने टिकटॉकवर घातलेली बंदी ही खरोखरच इतिहासाला कलाटणी देणारी आहे. चिनने ज्या पद्धतीने अमेरिकेच्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर बंदी घातली त्याप्रमाणे ठोशास ठोसा म्हणून अमेरिकेने आता टिकटॉकवर बंदी घातली आहे हा निर्णय प्रत्युत्तर म्हणून महत्त्वाचा आहे असे म्हणावे लागेल. अमेरिका आणि जगातील प्रमुख लोकशाही राष्ट्रांनी टिकटॉकवर बंदी घालून ड्रॅगनच्या नाकात दोऱ्या बांधल्या आहेत. त्यामुळे चिनला शिंका येऊन राजकीय सर्दी होण्याची शक्यता आहे.

# अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट लागते



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळी मनुष्याला मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावी अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात.**

होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो. धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मारले मारतात. त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून अंडी मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करूननृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.



# हंपी – ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा वेगळ्या दृष्टिकोनातून



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**कर्नाटकातील हंपी हे पर्यटन स्थळ म्हणजे भारताचा ऐतिहासिक, सांस्कृतिक समृद्ध, श्रीमंत वारसा आहे. याचा संबंध रामायणातील किष्किंधा प्रकरणाशी तर आहेच. पण अलीकडील विजयनगर साम्राज्य याशी देखील इथल्या वास्तूचे नाते जुळले आहे. किष्किंधा चा अर्थ वानर भूमी. इथे वाली सुग्रीव यांच्या युध्दा च्या पाऊल खुणा आहेत. विजय नगर साम्राज्यातील शिवाचे विरूपाक्ष मंदिर, हेमकुटा पर्वतावरील गणेश मंदिर, अंजिणाद्री टेकडी वरील हनुमान जन्मस्थान, लोटस महाल, लक्ष्मी नरसिंह मंदिर, त्या काळातील राण्याचे स्नानगृह, हट्टी चा तबेला, पुष्करणी, तीन मित्र उंचीचे बदवी शिवलिंग..अशी अनेक स्थळे बघताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते..**

ती म्हणजे आपल्याकडे प्राचीन काळा पासून वास्तुशिल्प, मूर्ती कला,स्थापत्य शास्त्र, नगर रचना व्यवस्थापन किती तरी प्रगत होते! या शिल्प, मंदिरातील भव्य दिव्य कोरीव काम, त्यातील लय, आकार, सिमित्री, भूमिती, हे अद्‌भुत, चमत्कारिक असेच आहे.शेकडो, हजारो वर्षापूर्वी निर्मित ही मंदिरे सिव्हिल इंजिनियरिंग, आर्किटेक्चर, मेक्यानिकल, फिजिक्स, धर्म शास्त्र, ज्योतिष शास्त्र अशा सर्व विषयांचा कौशल्याने उपयोग करून निर्माण केल्या गेली आहेत. जल शुध्दी करण, व्यवस्थापन, संरक्षण, पर्यावरण, नैसर्गिक समतोल,असा सर्वांगीण विचार, अभ्यास या निर्मितीत जाणवतो.एवढं प्रगत, समृद्ध,श्रीमंत असा हा आपला देश तेव्हा सुध्धा जगासाठी प्रगतीचा,नैतिक मूल्याचा आदर्श होता असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

पण ही कला, संस्कृती, हे ज्ञान नष्ट करण्यात,या शिल्प, मूर्ती कलेचा विध्वंस करण्यात मुस्लिम मोंगल राज्य कर्त्यानी,अरब देशांनी,ब्रिटिश ख्रिश्चन शासन कर्त्यानी जी भूमिका बजावली ती विषण्ण करणारी आहे. आज या भंगलेल्या मूर्ती,तोडफोड झालेली मंदिरे, उद्‌ध्वस्त झालेला ऐतिहासिक शहराचा परिसर बघताना मन व्यथित होते.

आपण यामागच्या इतिहासाचे अध्ययन केले तर यामागे आपली निष्क्रियता, आपल्यातील जाती भेद, सत्तेच्या लालसेपोटी होणारी आपसातील भांडणे, एकीचा अभाव हेच सगळे कारणीभूत आहे या जाणिवेने आधिक दुःख होते.आपली मंडळी, आपली राज्ये,आपली संस्थाने एकसंघ राहिली असती, एकजुटीने राहिली असती तर कोणीही माईचा लाल आपले वाकडे करण्याची हिम्मत करण्यास धजावला नसता हेही तितकेच खरे..त्या काळी आपल्यात नैतिक, धार्मिक,वैज्ञानिक अशा सर्व प्रकारचे सामर्थ्य असूनही, आपसातील मतभेद, राज्य सत्तेची लालसा,अंतर्गत दुहीचे राजकारण याचा फायदा बाहेरून आलेल्या मुस्लिम, अरब, पोर्तुगीज, ख्रिश्चन मंडळींनी घेतला. आपली लूट केली.आपले नैसर्गिक धन लुटले.आपले वैज्ञानिक,गणिती शोध चोरून नेले. त्यात फेरफार करून ते स्वतःचे म्हणून खपवले..आपण मूग गिळून बघत बसलो. त्याची फळं आजही आपण भोगतो आहोत. आपण कधीही देश म्हणून एकत्र नव्हतो. आजही एकच देशातील दहा राज्याची तोंडे दहा दिशेला आहेत. देशाची एक भाषा आपल्याला मान्य नाही.एक शैक्षणिक धोरण मान्य नाही. एक समान कायदा मान्य नाही.

खरे तर शेतकरी म्हणून सर्व शेतकऱ्याच्या समस्या सारख्या असायला हव्यात. पण एकाच राज्यात शेतकरी आंदोलन होते. एकच भागात आरक्षण विषयक मागणीचा जोर दिसतो. खरे पाहिले तर या अशा समस्या साऱ्या देशाच्या समस्या ठरल्या तर निर्णय सोपा ठरेल. पण असे घडण्यासाठी आवश्यक असलेला एकोपा आपल्यात नाही. आधीही नव्हता.. आताही नाही. यामुळे आपले किती प्रचंड नुकसान झाले हे हम्पीचे भग्न अवशेष बघताना जाणवते.एकीकडे या शिल्प कलेचे, मूर्ती कलेचे, स्थापत्य विज्ञानाचे कौतुक करायचे अन् दुसरीकडे ती लुटालूट, ती तोडफोड पाहून विषण्ण व्हायचे असा ऊन पावसाचा श्रावण बघायला, अनुभवायला मिळतो हंपीला भेट दिल्यावर!

आता तरी आपण आपल्या सनातन हिंदू संस्कृतीचा अभिमान बाळगायला शिकले पाहिजे.त्या दृष्टीने ३७० कलम,समान नागरी कायदा, राम मंदिर निर्माण, काशी मथुरा वृंदावन येथील मंदिराचे पुनर्वसन, शहराची मुस्लिम नावे बदलण्याचे निर्णय.. याकडे सर्वांनीच सकारात्मक दृष्टीने बघण्याची गरज आहे.केवळ व्होट बँक डोळ्यापुढे ठेवून चांगल्या निर्णयांना विरोध करणे थांबले पाहिजे. आपल्या कडे सर्वच धर्मांचा आदर केला जातो.पण त्यासाठी आपली संस्कृती,आपली नैतिकता, आपली धर्म निष्ठा गुंडाळून ठेवण्याची, उगाच कुणाचे लाड करण्याची मुळीच गरज नाही. कारण त्याचे विपरीत परिणाम आपण भोगले आहेत. आपल्या आया बहिणीवर अत्याचार झालेले, आपले ज्ञान, आपले खजिने लुटले गेलेले आपण अनुभवले आहे. त्याची पुनरावृत्ती व्हायला नको.आपणच आपल्या राष्ट्राचे,धर्माचे सत्व जपले पाहिजे.एरवी पुन्हा इतिहासाची पूनरवृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. निवडणुका जवळ आल्या आहेत. सरकारने घेतलेल्या चांगल्या निर्णयाला काही जण विरोधासाठी विरोध करतील. अर्थाचा अनर्थ करून लोकांची दिशाभूल करतील. तेव्हा सुजाण नागरिकांनी जागरूक राहणे गरजेचे आहे. हंपी ला भेट दिल्यावर नेहमी सारखा प्रवास वर्णनाचा लेख लिहिण्या ऐवजी या वेगळ्या मुद्द्याला स्पर्श करणे मला गरजेचे वाटले. जागा तीच असते.दृष्टी तीच असते. फरक असतो दृष्टिकोनात!



# कोचिंग क्लासेसवाले मालेमाल!



सचिन गोविंद कोरडे
9021920903

आधुनिक केसरी

**नेटक्याच दहावी व बारावीच्या परीक्षा संपल्या आहेत. नववीचे विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण होऊन पुढील वर्षी दहावी प्रवेश करणार आहेत. तर अकरावीचे विद्यार्थीही परीक्षा पास झाल्यानंतर बारावी मध्ये बसणार आहेत. तोवर तर अनेक संधी साधू कोचिंग क्लासेस वाल्यांनी जाहिरातींची रणधुमाळी सुरू केली आहे. आज वर्तमानपत्रातील पोम्प्लेट पासून त्यानंतर फेसबुक इंस्टाग्राम या सोशल मीडिया सोबतच टीव्ही चॅनल तसेच शहरात विविध ठिकाणी बॅनरबाजी या क्लासेस वाल्याकडून होत आहे. दुष्काळाच्या गडद छायेत अडकलेल्या या जिल्ह्यातील शेतकरी पालकांची अवस्था खूपच दयनीय झाली आहे. शासनाकडून दुष्काळी भागातील शाळेतील विद्यार्थ्यांचे फीस माफ केले आहेत. याउलट दरवर्षी पेक्षा यावर्षी कोचिंग क्लासेस चे रेट आलेख हा चढत्या क्रमाने आहे.**

क्लासेस मधील विद्यार्थी मिरिट संख्या वाढले की, त्याच विद्यार्थ्यांचे फोटो झळकोट दुसऱ्या वर्षी क्लासेस फिस वाढते आहे. त्यामुळे आज ग्रामीण शहरातही शिक्षण अतिशय खर्चिक झालेले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्या वर जो कर्जाचा डोंगर वाढत जातो, त्याचे फक्त नापिकी हे एक कारण नसून शैक्षणिक खर्च हेही महत्त्वाचे कारण होऊन बसल आहे. शेती पिकत नाही, परवडत नाही. शेतीचा खर्चाचा ताळेबंद हमीभाव यामुळे पार्किंग मुलांना शेती न करता शिक्षण घेऊन एखादी नोकरी करण्या वर भर देत आहेत. त्यामुळे शिकायला जरी तू गावातील शाळेत असला तरी, कोचिंग क्लासेसला मात्र शहराच्या ठिकाणी रहा अशीच पालकांची विद्यार्थ्यांकडून अपेक्षा केली जात आहे. पालकांच्या या अनठाई अपेक्षा मागे मात्र, या अभ्यासाच्या ओझ्या खाली विद्यार्थ्यांचे पुरते हाल होऊन कोचिंग क्लासेस वाले मात्र भरपूर मालेमाल झाल्याचे दिसून येत आहे.

नियमांनुसार खासगी कोचिंग क्लास सुरू करण्यासाठी सर्वप्रथम नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. 16 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना कोचिंग क्लासमध्ये प्रवेश देता येणार नाही. विद्यार्थ्यांकडून मनमानी पद्धतीने फी वसूल करता येणार नाही. नियमावलीतील व्याख्येनुसार, 50 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना जिथे शिक्षण दिले जाते, त्या जागेला कोचिंग क्लास समजले जाणार आहे.

आज फर्स्ट केजी ते सेकंड केजी पासून म्हणजे अगदी पहिले दुसरे पासूनच विद्यार्थ्यांना कोचिंग क्लास लावले जात आहेत. मुलांचा खेळण्याचा वेळही कोचिंग क्लासेस मध्ये गुंतवला जात आहे. सध्याच्या परिस्थितीवरून असेच चित्रं दिसत आहे. असेच चित्र जर संपूर्ण महाराष्ट्रभर असेल तर मग शाळा कशासाठी भरवल्या जातात एवढी शिक्षण भरती कशासाठी होते? राज्यातील शिक्षकांसाठी त्यांच्या पगारीवर शासनाकडून एवढा खर्च का केला जातो? प्राथमिक प्रेम शिकवणाऱ्या शिक्षकांना अर्धा लाख पर्यंत पगार, माध्यमिक शिक्षकांना लाखापर्यंत पगार, तसेच उच्च माध्यमिक म्हणजेच कॉलेज प्राध्यापकांना लाखाच्या पुढे वरिष्ठ प्राध्यापकांना दोन लाखाच्या पुढे असं मासिक पगारीचा गणित असतानाही शाळेपासून कॉलेजपर्यंत शिक्षण व्यवस्था का बिघडलेले आहे. याचाच प्रश्न आज पालक वर्गाला भेडसावत आहे.

आज शाळा असो वा कॉलेज असून नसल्यासारखे आहे.

कारण बहुतांश विद्यार्थ्यांचे प्रवेश येथीलच ग्रामीण भागातील शाळेत कॉलेजमध्ये राहतात.

कोचिंग क्लासेस वर भर देत पालक वर्ग त्यात आपल्या आपल्या शेजारील लातूर किंवा शहराच्या ठिकाणी कशासाठी ठेवत आहेत.

त्यासाठी हॉस्टेल खर्च आला विद्यार्थ्यांचं दोन वेळेस जेवण खर्च क्लासेस खर्च सुट्टीला येणे जाणे खर्च यामुळे या भागातील शेतकऱ्यासह इतर सर्व सामान्य व्यापारी व मध्यमवर्ग यांचा खर्च वाढतं आहे.


दर महिन्याला शासनाकडून पगाराची हमी घेणाऱ्या शिक्षक वर्गाकडून पालकांना विद्यार्थ्यांना शिकवण्याची हमी देणे गरजेचे आहे.

तसा गावातील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतने तेथील शाळा कॉलेज यांच्याकडून ठराव घेतला जावा असेही काही जाणकारांचे मत आहे.

कारण मुलांकडून पालकांच्या अधिकच्या शैक्षणिक वाढत्या अपेक्षा त्यात आयआयटी, जेईई, नीट यांसारख्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. त्याशिवाय खासगी कोचिंग क्लासमध्ये प्रचंड फी आकारली जाते.

खरंच आपल्या मुलाला पुढच शिक्षण झेपेल का? पालक वर्गणीही हे जाणणे गरजेचे आहे.

खरा तर शाळा व कॉलेजकडून याविषयी दर वर्षाला पालक मेळावा घेणे गरजेचे आहे.



कारण "मुलाकडून बापाला काय अपेक्षा आहे,त्यापेक्षा मुलगा काय शिकायचं म्हणतोय." हे ज्यांनी खूपच गरजेचे वाटतं आहे.

खऱ्या अर्थाने मुलांना शिकते करण्याऐवजी आणि दर्जेदार शिक्षण देण्याऐवजी गेल्या चार दशकांत आपण त्यांना केवळ परीक्षार्थी बनवले आणि सततच्या जीवघेण्या स्पर्धेत ढकलतआहोत. ही खरी समस्या आहे.

हे नक्कीच कुठेतरी थांबायला हवं,

थ्री इडियट सारखे प्रेरणादायी चित्रपट पाहण्यासाठी नाहीतर काहीतरी शिकण्यासाठी सुद्धा आहेत हे जाणणेपालकांनी गरजेचे आहे.

मुले विचार खरंच करू शकतात का, त्यांची समज वाढत आहे का, मिळालेल्या ज्ञानाचे ती उपयोजन करू शकतात का, शिकत असताना आजूबाजूच्या जगाशी त्यांची नाळ जोडली जात आहे का,स्वयंअध्ययनाचे कौशल्य त्यांनी मिळविले आहे का, अशा,मुलांच्या विकासासाठी अत्यावश्यक असणाऱ्या अनेकबाबींकडे आपण पूर्णपणे दुर्लक्ष केले. गुणवत्ता यादीत झळकावण्यासाठी आणि ठरावीक महाविद्यालयात प्रवेश क्विझ मिळवण्यासाठी केवळ अधिकाधिक गुण मिळवणे, इतकेच मर्यादित उद्दिष्ट आपण त्यांच्यासाठी ठरवून दिले आणि केवळ त्यासाठीच आग्रह धरला. त्यामुळे कोचिंग क्लास संस्कृती फोफावत जात आहे.

शालेय शिक्षणाची सुस्पष्ट व सुस्थितीत व्यवस्था अस्तित्वात असताना भरमसाट फी भरून आणि मुलांची ओढाताण वाढवून कोचिंग क्लासला पाठविण्याची गरज भासते, याचा अर्थ शालेय शिक्षण व्यवस्थेत काही गंभीर त्रुटी वाढतं आहेत. त्या दूर करण्यासाठी सरकार, शिक्षक आणि पालकांना विशेष प्रयत्न करावे लागतील...

# आहे तैसा असो आतां । चिंतें चिंता वाढते ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**सामान्य माणसं माणसांसोबत संवाद करतात, परंतु द्दष्टे महापुरुष निसर्ग, नद्या, वृक्ष, सूर्य किंवा देवाशी संवाद साधतात. आज आपल्याला वाटते आपण फार विकसित झालो आहोत. होय. आज माणसांनी नवनवे शोध लावून माहिती तंत्रज्ञानात अमुलाग्र क्रांती घडवून आणली आहे. निश्चितच ही गौरवपूर्ण बाब आहे. याच्या उलट आपण काही काळ मागे वळून पाहूयात. अगदी इसवीसनाच्या पूर्वीची माणसे अत्यंत तीक्ष्ण, बुद्धिमान होती. केवळ बुद्धिमानच नाही तर प्रचंड शक्तिशाली आणि अंगी द्दष्टेपणा असणारी होती. सहजच आपण वेरूळ किंवा अजंता येथील लेण्यांना भेट दिली किंवा हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथील महान शिल्प असलेले श्री नागेश्वर म्हणजेच नागनाथाच्या मंदिराला भेट दिल्यानंतर, आज आपण काय आहोत(?) याचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही.**

एवढेच काय क्षणात आपले गर्वहरण होते. ही सगळी शिल्पे एका अखंड दगडात सलग कोरलेली आहेत. ती शिल्पे अथवा मंदिर बांधताना कुठेही चुना अथवा एखाद्या मिश्रणाचा उपयोग केलेला दिसत नाही. ही अखंड शिल्प कोरतांना त्यात किती सूक्ष्म नक्षीकाम केले आहे? सर्वच कोरलेल्या प्राण्यांचे अवयव अगदी जिवंत प्राणाच्या प्रमाणात प्रमाणबद्ध आहेत. स्त्रीयांची शिल्पे तर केवळ बघतच रहावीत अशी आहेत! सौंदर्याने नखशिखांत ओतप्रोत असा अप्रतिम कलाकृतीचा उत्तम नमुना! या महान माणसांनी एकाग्रता, कला, निरीक्षण शक्ती, संशोधक वृत्ती, प्रचंड शारीरिक बल इत्यादीच्या जोरावर ही शिल्पे उभारली आहेत. याच्या जोडीने इसवीसनाच्या पूर्वीच अनेक महाकाव्य, विविध क्षेत्रातील ज्ञान असणारी अनेक ग्रंथ निर्माण झाले. जगभर आरोग्य, विज्ञान, नीती, वाङ्मय, औषधे, कला, क्रीडा इत्यादीच्या दृष्टीने अनेक महान तत्वचिंतकांनी आपले अनमोल योगदान दिले आहे. अगदी इसवीसनाच्या अगोदर अनेक दुर्मिळ ग्रंथ निर्माण झाले आहेत. शिवाय सत्य बोलल्यामुळे अनेक महान लोकांना आपले घर, राज्य सोडून पळून जावे लागले आहेत. अनेकांना आपला अनमोल जीव गमवावा लागला आहे. अनेकांनी हसत हसत आपल्याला दिलेली शिक्षा मान्य करून विषाचा प्याला ओठांना लावला आहे तर अनेक शुरांनी आपल्या प्रमुखाने सांगितले तसा स्वतःचा शेवट करून घेतल्याच्या कहाण्या आजही वाचल्या की अंगावर अनंत शहारे उठतात! मन व्यथित होतं. त्यांच्या तुलनेत आज आपले योगदान काय? आज एवढी शिकलेली आणि सर्व सोयी सुविधा पायी लोळण घेत असतांना आपण काय करत आहोत? आपण नेमका कोणता नवीन ग्रंथ लिहित आहोत किंवा एखादा नवीन शोध लावत आहोत? याचा विचार केला की; आपली आपल्यालाच लाज वाटायला लागते!

आज आपण २१ व्या शतकाचा रौप्य कालखंड संपवून अमृता कडे वाटचाल करत आहोत. एवढेच काय जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश म्हणून मोठी शेखी मारत असलेलो आम्ही, स्वातंत्र्याच्या शंभरीकडे जाताहोत. पण आज आपण नेमके कुठे आहोत? आपले काय सुरु आहे? भूतकाळापेक्षा आपण सुधारत आहोत की बिघडत आहोत? प्रगती की अधोगती? असे एक ना अनेक प्रश्न सतावून सोडतात. तेंव्हा तुकोबा सोबत घेऊन बसायचे!




आत्तापर्यंत आपण कुठपर्यंत गाथा वाचत आलो? त्यांचे विविध अन्वयार्थ काय होते याचा अल्पमतीने मी विचार करतो आणि लगेच लिहित जातो. क्रमाने पुढे जातांना एकेक अभंग विचार करायला भाग पडतो. त्यात एकांती तुकोबा

**आम्ही याची केली सांडी । कोठें तोंडीं लागावें ॥१॥**
**आहे तैसा असो आतां । चिंतें चिंता वाढते ॥ध्रु.॥**
**बोलिल्याचा मानी सीण । भिन्न भिन्न राहावें ॥२॥**
**तुका म्हणे आम्हां पाशीं । धीरा ऐसी जतन ॥३॥** (१२७३)

असे अभंग बोलून जातात. तुकोबांचे अभंग म्हणजे सर्व काही स्वसंवाद! एवढा उत्तम स्वसंवाद अन्यत्र कुठेही सापडत नाही. विल्यम शेक्सपिअरच्या नाटकातील सर्व स्वगते यापुढे एकदम फिकी आहेत! माणसाने काय विचार करावा? कसे बोलावे? काय लिहावे? याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे तुकोबांची गाथा! अगदी पहाटे पहाटे उठून भामनाथ किंवा भंडारा डोंगर किंवा आपल्या शेतातील श्री विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर गाठायचे आणि बोलत राहायचे, गात राहायचे! काल दिवसभर सोसलेले, कुण्या माणसांना सांगून आपली नाचक्की करून घेण्यापेक्षा सरळ निसर्ग किंवा देवालाच सांगून मोकळे व्हायचे! त्याच्या समोर आपले गाऱ्हाणे मांडायचे. हसायचे. रडायचे. जे काही होईल ते होऊ द्यायचे. आपल्या भोवतालच्या लोकांना सांगून काही उपयोग नाही हे तुकोबांना उमगले होते. आपल्या भोवतालच्या लोकांना त्यांनी अनेकवेळा अनेक गोष्टी सांगून पाहिल्या. लोक बदलायला तयार नव्हते. लोकांना आपलीच दुःखे भरपूर होती आणि त्यात तुकोबांचे दुःख ऐकायला कोण तयार असणार? त्यामुळे त्यांचा संवाद साधण्याचा पवित्रा आणि ठिकाण त्यांनी बदलून घेतले होते. त्यातूनच तुकोबांचा हा एक प्रत्यक्ष संवादाचा अभंग! हा अभंग केंव्हा लिहिला असावा? त्यांच्यावर काय परिस्थिती असेल? याचा आपल्या परीने विचार केला असता, तुकोबा सर्वांना सांगून थकले असावेत. त्यानंतर त्यांनी देवाला बोलून आपले मन शांत करण्याचा प्रयत्न केला असेल. एवढे करूनही त्यांच्या मनाचे समाधान झाले नसावे. त्यानंतर मग तुकोबा थोडे आत्मकेंद्रित झाले असावेत. त्यावेळी मग ते असा संवाद साधतांना दिसतात. तुकोबांच्या गाथ्यातील अभंग त्यांच्या चरित्र आणि जीवनातील प्रसंगानुरूप जोडणे ही सुद्धा मोठी कसोटी आहे. त्यावर मोठे काम होणे बाकी आहे. असों. प्रस्तुत अभंगात तुकोबा स्वसंवाद साधतांना म्हणतात, आम्ही आता सर्वकाही सोडून दिले आहे. आता आम्हाला कुणाकडून काहीही अपेक्षा उरली नाही. आम्ही कुणाशीही वाद घालत नाहीत. एवढेच काय, देवाशी पण अबोला धरण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला दिसून येतो. लोकांना सांगायला गेले तर लोक तुकोबांना मारू लागले. त्यांचे हित-अहित कशात आहे? हेच त्यांना कळत नाही. असे करा आणि असे करू नका, असे लिहिणारे आणि बोलणारे तुकोबा समाजाचे शत्रू झाले. भोवताल सुरु असलेले अवडंबर, थोतांड, खोटेपणा, फसवेगिरी, धर्माच्या नावाखाली गोर गरीब, सामान्य लोकांची लुबाडणूक इत्यादी बाबी तुकोबांना त्रास देत होत्या. त्याचा परिपाक म्हणजे तुकोबा लोकांना जागे करायचे. खरे भजन-कीर्तन म्हणजे काय? खरी भक्ती म्हणजे काय? खरे खरे केले नाही तर काय होते( ?) हे तुकोबा आपल्या भजन-कीर्तनातून लोकांना सांगायचे. सामान्य लोकांना ते पटायचे. त्यातून ते शिकायचेही. परंतु जो धर्माच्या नावाखाली लोकांना लुटणारा वर्ग होता, तुकोबा त्यांचे शत्रू झाले होते, ते सगळे तुकोबांना पाण्यात पहायचे. त्यामुळे तुकोबा शांत बसायचे. जाऊ द्या. त्यांना कळत नाही. हे सगळे लोक पोटार्थी आहेत. त्यामुळे आपण जसे आहोत तसे ठीक आहे. कुठवर लोकांची चिंता करायची? जसे आहोत तसे आपण राहू आणि लोकांना पण तसेच राहू द्या. जेवढी चिंता केली तेव्हढी वाढत जाते. या अभंगावेळी तुकोबा देवासमोर बसलेले असावेत. शेवटी देवासोबतही तुकोबा अबोला धरल्याचे सांगतात. बोलून बोलून आता मी थकलो आहे. देवही ऐकून ऐकून थकला आहे. देवा, जाऊ दे. फार काही मनावर घेऊ नको. आजपासून आपण वेगवेगळे राहू. भांडणांपेक्षा अबोला बरा! परंतु अभंग संपवतांना तुकोबा देवाशी किंवा निसर्गासी संपूर्ण ताटातूट करून घेत नाहीत. संवाद कधीही पुन्हा सुरु करता यावा अशी शब्द रचना करून तुकोबा आपला अभंग आत्मसंवाद थांबवतात. तुकोबा म्हणतात, आमच्याकडे धीर आहे. धीर आम्ही जतन केला आहे. आमच्याकडे संयम आहे. आम्हाला जेंव्हा वाटेल तेंव्हा आम्ही पुन्हा तुमच्याशी बोलायला येवू. तूर्तास मी आपल्याला त्रास देवू इच्छित नाही. असा संवाद करून तुकोबा चालायला लागतात. तो पर्यंत सूर्य उगवलेला असेल. लोक आपल्या कामाला लागलेले असतील.

तुकाराम हा मोठा विलक्षण माणूस! त्यांच्या अभंगांचे वाचन करणे मोठे दिव्य कार्य! त्याच्या अर्थ आणि अन्वयार्थ लावणे हे तर माझ्यासारख्या पामराचे कामच नाही. तरीही सेवकाने आपले काम करत रहावे. आज आपण सर्व गोष्टींनी संपन्न आहोत, परंतु तुकोबांच्या अभंगांचे विश्लेषण करायला किंवा वाचायला वेळ नाही. एवढेच काय? आज जवळपास कुणाकडे वेळच नाही. काय करताहेत? ते ही माहित नाही. असे सैरभैर झालेले, स्वतःला उच्च शिक्षित म्हणणारे तज्ञ केवळ बाष्कळ गप्पा मारून आपला अनमोल वेळ वाया घालवत आहेत. जगात अनमोल विचारांचे भांडार खुले आहे. शेकडो ग्रंथालयात लाखो पुस्तके आपली चातकासारखी वाट पहात आहेत. ग्रंथालयातील अनेक पुस्तकांना अजून स्पर्श व्हायचा बाकी आहे! स्वतःला शिकलेल्या समजणाऱ्या लोकांनी ग्रंथ वाचून आपल्या जीवनातील अनमोल क्षणांचा सदुपयोग करावा. चिंता सोडून स्वतःला तुकोबांच्या धीरासोबत जोडून घ्यावे. मी घेतोय तुम्हीही घ्याल हीच एक माफक अपेक्षा! जय तुकोबाराय!

# उद्धव ठाकरेंना बहादुरकी पचनी का पडेना ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**लोकसभा निवडणुकीच्या रणांगणात उतरू पहाणारे उबाठा नेते उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या भाषणाचा वैचारिक स्तर आता खऱ्या अर्थाने घसरत असुन केवळ सत्ताधाऱ्यांवर काहीतरी बरळायचं म्हणुन ते बोलुन जाताना दिसतात. हिंदुत्वाचा मुळ विचार त्यांनी शेजार लगत असलेल्या समुद्रात बुडवुन टाकल्यानंतर ते आता धर्मनिरपेक्षवाद्यांच्या पंक्तीला जावुन बसले. स्वातंत्र्यवीर सावरकरांना शिव्या घालणाऱ्या राहुल बाबाच्या मांडीला मांडी लावुन बसल्यानंतर काय आणि कसं बोलावं? ही वैचारिक द्दष्टीच त्यांच्याकडे शिल्लक राहिली नसल्याने सत्ताधाऱ्यांची बहादुरकी देखील त्यांना पचनी पडेना?**

उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी मी पुन्हा येणार ही केलेली घोषणा प्रत्यक्षात उतरून दाखवली. राजकिय उलथापालथी करताना दोन पक्ष फोडणं ही कसब तर खऱ्या अर्थाने राजकियदृष्ट्या बहादुरकीच म्हणावी लागेल. कारण राजकारण त्यालाच म्हणतात जो बेरजेचे राजकारण समाजकल्याणासाठी करतो. ते पुन्हा आले पण दोन पक्ष फोडुन आले असं जर उद्धवजी जाहिर भाषणात म्हणत असतील तर किती हा बालिशपणा म्हणावा? यापेक्षा दुसरं असुच शकत नाही.

एका राजकिय घडामोडीनंतर मुख्यमंत्री पदाची शपथ घेतलेले देवेंद्रजी फडणवीसांना काही काळातच पायउतार व्हावं लागलं होतं. मात्र त्यांच्यातला आत्मविश्वास किती दृढ संकल्पाचा होता? कारण त्यांनी मी पुन्हा येईन ही घोषणा जाहिरपणे दिली. तदनंतर विश्व प्रवक्त्यासह अगदीच म्हटलं तर शरद पवारांनी देखील पुन्हा येण्याच्या घोषणेची जाहिर थट्टा उडवली. देवेंद्र फडणवीस यांचं कर्तृत्व नाद करायचा नाय असंच होय. राज्याच्या राजकारणात त्यांनी एका शब्दात सांगायचं म्हटलं तर शरदचंद्र पवारांना जे जमलं नाही ते फडणवीसांनी करून दाखवलेले आहेच. पुन्हा येणारे पुन्हा आलेच. तेही कर्तबगारी गाजवुन आले. गंमत बघा, 2019 निवडणुकीतच तत्कालीन काळातल्या भाजप-शिवसेना युतीला जनादेश मिळाला होता. 167 पेक्षा जास्त महायुतीचे आमदार निवडुन आले. असं असताना केवळ मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरेंनी भाजपची साथ सोडली. थेट बारामती गाठुन काँग्रेस पक्षाच्या मदतीनं मुख्यमंत्री पद मिळवलं. वास्तविक पहाता स्व.बाळासाहेब ठाकरेंनी हिंदुत्वाच्या मुद्यावर पन्नास वर्षापेक्षा जास्त राजकारण करताना मुळ शिवसेना खडतर परिश्रमातुन उभा केली. पण सोन्याचा चमचा तोंडात घेवुन आलेल्या लेकरांना पित्याच्या कष्टाची जाणिव रहात नसते. तेच इथे घडलं. वारसदार म्हणुन शिवसेना चालवताना स्वार्थासाठी आडमुठी भुमिका घेत हिंदुत्वाचा मुळ अजिंडा मातोश्रीहुन उचलला आणि समुद्रात फेकुन दिला. त्याच वेळी शिवसेनेच्या अनेक आमदारांना ही गोष्ट सहन झाली नव्हती. पण गुमाण गुपचुप बसुन नेतृत्व निष्ठेपोटी सारं काही सहन केलं. पण जेव्हा स्व.बाळासाहेब





ठाकरेंच्या हिंदुत्ववादी भुमिकेची सुपुत्राकडून फेटाळणी झाली. नव्हे तर स्वातंत्र्यवीर सावरकरांना ज्या राहुल गांधींनी खालच्या पातळीवर जावुन टिका केली त्याच राहुलसोबत उद्धवजी मांडीला मांडी लावुन बसु लागले तेव्हा निष्ठावान सहकाऱ्यांना सहन झालं नाही. सद्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदेंनी हिंदुत्वाच्या मुद्यावरून बंड पुकारलं. तब्बल 40 आमदार घेवुन ते बाहेर पडले. इकडे पुन्हा येईन ही फडणवीसांची घोषणा दृढ आत्मविश्वासाचा संकल्प गाठुन केलेली होती. महाराष्ट्र अस्थिर होता कामा नये, हिंदुत्वाचे रक्षण करण्यासाठी जर आमच्याकडे कुणी येत असेल तर त्यांना सोबत घेवुन सत्तेत जाण्याची भुमिका अर्थात बेरजेचे राजकारण भाजपाने केलं आणि शिंदे-फडणवीस सरकार स्थिर झालं. यात पुन्हा येईल असं म्हणणारे पुन्हा आलेच. पण थट्टा करणारे जयंतराव पाटलासह जितेंद्र आवाड यांच्या घशातले दात गळुन पडले. अर्थात सत्यवादी भुमिकेतुन चालणाऱ्याला नियतीची साथ कुठेही मिळु शकते. शरद पवारांच्या राष्ट्रवादीत अजितदादांनी बंड केलं. 40 आमदार घेवुन ते देखील बाहेर पडले आणि शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाले. खरं तर केवढी मोठी राजकिय कसब आणि चतुराई या साऱ्या घडामोडीत देवेंद्र फडणवीसांची म्हणावी लागेल. महाराष्ट्राच्या राजकारणात एवढी उलथापालथ मोठ्या पवार साहेबांना देखील कधी जमली नाही. फडणवीसांनी हे सारं शक्य करून दाखवलं. खरं तर विरोधकांनी फडणवीसांच्या कर्तृत्वाला सलाम करायला हवा. पण नेहमी तिरस्काराचं बाळकडूच प्याला असेल त्यांना द्वेषाच्या राजकारणाशिवाय दुसऱ्याची बहादुरकी कळणार तरी कशी? हे तितकंच खरं आहे की, मुळ शिवसेना फुटली, शिल्लक राहिलेली शिवसेना वाचवण्यासाठी उबाठा नेत्यांची सुरू असलेली धडपड खुपच कठोर परिश्रमाची म्हणावी लागेल. हातानं पायावर धोंडा पाडून घेतला तर नुसती जखमच नव्हे तर गँगरीन झाल्याशिवाय रहात नाही. कारण उद्धव ठाकरे यांचा राजकिय प्रवास ज्या संकटातुन सुरू आहे त्याला तेच जबाबदार म्हणावे लागतील ज्यांनी 2019 ला जनादेशाचा अपमान करत केवळ मुख्यमंत्री पदावर जावुन बसण्यासाठी भाजपाची साथ सोडली. कदाचित आत्मस्वरूपाची जाणिव त्यांना होत असेल म्हणुन की काय अलीकडे उद्धवजींच्या भाषणाला कुठलाही वैचारिक आधार राहिलेला दिसत नाही. स्व.बाळासाहेब ठाकरेंचं आयुष्य काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी, आडवे, डावे, उजवे या साऱ्यांच्या विरोधात लढण्यात गेलं. पण दुर्दैवाने सुपुत्र उद्धवजी हिंदुत्व बाजुला ठेवुन उल्लेख केलेल्या साऱ्यांच्याच मांडीला मांडी लावुन बसताना दिसतात. केवळ दिसतच नाहीत तर कृती करताना देखील त्यांना आयोध्येत विराजमान झालेल्या प्रभु रामचंद्राचं दर्शन घेण्यासाठी राजकिय सुतक म्हणुन नकार द्यावा लागला त्यापेक्षा दुर्दैव कोणतं नाही. बुलढाण्याच्या जाहिर सभेत त्यांचं भाषण ऐकलं. तलवार बोथट झाल्याप्रमाणे कुठलाही वैचारिक आधार भाषणाला नव्हता. काय तर म्हणे पुन्हा येईन म्हणणारे पुन्हा आले पण दोन पक्ष फोडुन आले. हे त्यांचं बोलणं लहानपणी ग्रामीण भागात शिवणा पाणी खेळ करणाऱ्या मुलाप्रमाणेच म्हणावे लागेल. कारण फडणवीस पुन्हा येईल म्हणाले, ते तर आलेच त्यांच्या बहादुरकीला सलाम करायला हवा. ज्यांनी केलेली भीष्मप्रतिज्ञा प्रत्यक्षात उतरून दाखवली. महाभारतात भीमानं दुशासनाची मांडी गदानं फोडून टाकण्याची प्रतिज्ञा केली होती. बोलण्याप्रमाणे खरीच करून दाखवली. पण उद्धवजींना ते देखील मान्य नसावे. कारण भीमानं मांडी फोडलीच नाही असं म्हणायला मागे रहाणार नाहीत. महाराष्ट्राच्या राजकारणात एवढी मोठी उलथापालथ केल्यानंतर फडणवीसांनी मी पुन्हा येणार ही केलेली प्रतिज्ञा पुर्ण करून दाखवली. ते पुन्हा आले पण त्यांची बहादुरकीच ज्यांना पचनी पडत नाही ते ठाकरे आता म्हणतात की, दोन दोन पक्ष फोडुन आले. लक्षात घ्या, दोन पक्ष फोडुन आले किंवा अजुन काही तरी उलथापालथी करून आले. पण ते पुन्हा आले. हे तुम्हाला पटतच नाही तर यापेक्षा बालिश बुद्धी कोणती असु शकत नाही. लोकसभा निवडणुकीत 45 पेक्षा जास्त जागा जिंकण्याचाही संकल्प महायुतीने केलेला आहेच. तो पुन्हा खरा ठरणार आणि उबाठाचा एकही खासदार नाही निवडुन येणार. याचि देहि, याचि डोळा तुम्हीच पहाणार. मग तुम्ही इटालीलाच रहायला जाणार का?

# महाराष्ट्रातील साखरेचे उत्पादन १०० लाख टन पार



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**काल दि. २२ मार्च रोजी केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने अध्यादेश काढत ३१ मार्च नंतरही पुढील आदेश निघेपर्यंत कांद्यावरील निर्यातबंदी कायम राहणार असल्याचे स्पष्ट केले. उन्हाळ कांद्याचे उत्पादन कमी राहण्याचे अंदाज वर्तवण्यात आल्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेतील कांद्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने हा निर्णय घेतला. आता मार्चनंतर कांद्याच्या भावात वाढ होण्याची शक्यता मावळली.**

दि.१५ मार्च पर्यंत महाराष्ट्रातील साखरेच्या उत्पादनाने १०० लाख टनापर्यंतचा टप्पा पार केला. महाराष्ट्रातील ऊस हंगाम आता अंतिम टप्प्यात असून जवळपास ४३ साखर कारखान्यांनी आपला हंगाम पूर्ण केला. मागील वर्षापेक्षाही यावर्षी ०.१९ टक्के नी साखरेची रिकव्हरी जास्त आहे. या हंगामात साखर उपलब्धता अधिक असल्यामुळे भाव कमीच राहतील असे वाटते. साखर कारखाने आता बगॅस पासून वीज निर्मितीवर भर देत आहेत आणि सरकार हि त्याला प्रोत्साहन देत आहे. साखर उत्पादन व निर्यातीत ब्राझील अग्रस्थानी असून फेब्रुवारीमध्ये तब्बल ३० लाख टन साखरेची निर्यात विविध देशांना केली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही निर्यात तिप्पट आहे.

फेब्रुवारी २०२३ च्या तुलनेत यंदा फेब्रुवारीत निर्यात १६२ टक्क्यांनी वाढली आहे. ब्राझीलने गेल्या हंगामात ४०० लाख टनांचा साखर उत्पादनाचा टप्पा ओलांडला. एकूण निर्यातही ३०० लाख टनांच्या आसपास झाली आहे. ब्राझीलने साखर उत्पादन व निर्यातीत जगातील सर्वच देशांना मागे टाकत अग्रस्थान पटकावले आहे. देशातील २०२३-२४ या हंगामातील ऊस गाळप अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने दिलेल्या माहितीनुसार चालू २०२३-२४ या हंगामात १५ मार्च पर्यंत साखरेचे उत्पादन २८०.७९ लाख टनावर पोहोचले होते जे मागील वर्षी २८२.६० लाख टन होते. महाराष्ट्रातील साखरेचे उत्पादन १०१.९२ लाख टनावरून १००.५० लाख टन इतके कमी झाले. तांदळाचे भाव १० टक्केने घटले :- देशात बिगर बासमती तांदळाचे भाव १० टक्के ने कमी झाले. निर्यातीवर घातलेले निर्बंध, वाढलेली मुबलक उपलबद्धता हे भाव घटण्यामागे प्रमुख कारण आहे. या सोबतच केंद्र सरकार २९ रु. प्रति क्विंटल या दराने बाजारात तांदूळ विकत असल्यामुळे खुल्या बाजारपेठेतून मागणी घटली आहे. सध्या उपलब्दता अधिक राहावा यासाठी तांदळाचा साठा करणाऱ्यांच्यावर सरकार लक्ष ठेऊन आहे. घाऊक बाजार पेठेत तांदळाचे भाव कमी झाले तरीही रिटेल भागात मात्र तांदळाचे भाव कमी झालेले नाहीत.

भारताची संरक्षित बासमतीचे नाव बदलून पाकिस्तानात विक्री :- भारताची संशोधित आणि संरक्षित बासमतीचे नाव बदलून पाकिस्तानात विक्री आणि प्रसार होत आहे. भारताने संशोधित केलेल्या पुसा ११२१ आणि १५०९ हे बासमती वाण पाकिस्तानमध्ये "११२१ कैनात" आणि "किसान बासमती" या नावाने विक्री केले जात आहे. पाकिस्तानातून याच दोन वाणांची सर्वात जास्त निर्यात केली जात आहे. यासाठी इंडीयन ॲग्रीकल्चरल रिसर्च इन्स्टिट्युट हे कायदेशीर कारवाई करणार आहे. एल-निनोचा निर्देशांक ०.९२ अंश वर :- एल-निनोची तीव्रता सातत्याने घटत आहे. सध्या निनो ३.४ निर्देशांक ०.९२ अंश वर आहे. पुढील एका महिन्यात हा निर्देशांक शुन्यावर पोहचेल. जुलैच्या मध्यापासुन ला-निनो मध्ये प्रवेश करू शकतो. मोसमी पावसाच्या काळात इंडियन ओसिएन डायपोल ही पॉझिटीव्ह फेजमध्ये राहण्याची शक्यता असुन या वर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये चांगला पाऊस होऊ शकतो.

दि.२५ मार्च २०२५ पर्यंत युरिया आयातीस अनुमती :- देशात दरवर्षी ३६० लाख टन युरियाची खपत होते. यातील जवळपास ८० ते ९० लाख टन युरिया आयात केला जातो. तूट भरुन काढण्यासाठी आणि कमतरता भासू नये यासाठी दि २५ मार्च २०२५ पर्यंत युरिया आयातीस अनुमती देण्यात आली आहे. ही युरियाची आयात इंडियन पोटॅश लिमिटेड राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर लिमिटेड आणि नॅशनल फर्टिलायझर लिमिटेडच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

सन २०२५ पर्यंत ११.२० लाख टन पामतेलाचे उत्पादन लक्ष्य :- भारत आपल्या गरजेच्या ५७ टक्के खाद्यतेलाची आयात करतो. जागतिक स्तरावर खाद्यतेलाचे भाव वाढत असल्यामुळे आयात खर्चिक बनू शकते. भारत सरकार खाद्यतेलामध्ये आत्मनिर्भर होण्यासाठी तेलबिया आणि पामचे उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहे. सन २०२५ पर्यंत ११.२० लाख टन कच्या पामतेलाचे उत्पादन करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

दुध अनुदान :- मंत्रिमंडळाच्या बैठकीतील चर्चेनंतर कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने आदेश काढला आहे. मात्र या आधी २७ रुपये दर मिळाला नसल्याने अनेक शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित राहावे लागले आहे. आता २७ ऐवजी २५ रुपये प्रतिलिटर दर मिळालेल्या गाईच्या दुधाला शेतकऱ्यांना ५ रुपये अनुदान मिळणार आहे. मात्र अनेक शेतकऱ्यांच्या



दुधाला ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ या गुणप्रत लागत नसल्याने अपेक्षित दर मिळाला नाही.

चिकनची खपत वाढली :- पोल्ट्री विभाग दरवर्षी ७ ते ८ टक्के ने वाढत आहे. देशातील मागील २० वर्षात चिकनची खपत १० टनावरून ५० लाख टनावर पोहचले आहे. शहरी भागामध्ये खाण्याच्या सवयी बदलत असल्यामुळे चिकनची मागणी वाढत आहे. विविध कारणामुळे मागील दोन वर्षापासून चिकनची निर्यात मात्र कमी होताना दिसून येत आहे. भारत जागतिक स्तरावर अंडी उत्पादनामध्ये दुसरे तर मांस उत्पदनाध्ये पाचव्या स्थानावर आहे.

देशातील तुरीचे उत्पादन ३३.३९ लाख :- केंद्रीय कृषी मंत्रालयाने प्रसारित केलेल्या माहितीच्या अनुसार देशातील तुरीचे उत्पादन ३३.३९ लाख टनावर पोहचण्याची शक्यता आहे. जे मागील वर्षी ३३.१२ लाख टन उत्पादन झाले होते. देशांतर्गत बाजारपेठेतील तुरीची खपत ४५ लाख टनावर राहण्याची शक्यता आहे. जवळपास १२ लाख टन तुर कमी पडू शकते. ही तुर म्यानमार आणि आफ्रिकेतील देशांमधुन पुर्ण केली जाऊ शकते. १५ एप्रिलपर्यंत नाफेड ४ लाख टन तुर बफर साठयासाठी खरेदी करेल. आफ्रिकेतुन आयात कमी होत असल्यामुळे तुरीच्या भावात हलकिसी वाढ पाहवयास मिळाली. ज्वारीच्या भावात ५० टक्के ची घसरण :- नव्या ज्वारीची आवक बाजारपेठेत सुरु झाली. मागील १५ दिवसापासून आवक हळूहळू जोर धरत आहे. नवीन आवक जसजसे जोर धरत आहे तसतसे भाव मात्र घटत आहेत. १५ दिवसापूर्वी ५०००-५५०० रुपये प्रति क्विंटल असणारे भाव आता २५००-२६०० रुपयांपर्यंत खाली घसरले आहेत. हळद उच्चांकी स्थरावर :- मागील ५-६ वर्षांपासून हळदीला कमी भाव मिळत असल्यामुळे लागण क्षेत्र घटले, त्यातच कमी पावसामुळे उत्पादकता हि घटले. हळदीच्या कमी आवकेमुळे भाव मात्र हळूहळू वाढतच आहेत. हळदीची सर्वात मोठी बाजारपेठ इरोड येथे काल उच्चांकी २०५०० रुपये प्रति क्विंटल इतका भाव मिळाला जो मागील १४ वर्षातील सर्वाधिक भाव आहे.

मिरचीच्या भावात वाढ होण्याची शक्यताः- देशभरात लाल मिरचीची आवक वाढल्याने भाव जोरदार घसरले. आता बहुतांश शेतकरी मिरची कडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. मागील १ आठवड्यापासून हिरव्या मिरचीचे भाव वाढताना दिसत आहेत. सध्या सरासरी ५५ ते ६० रुपये प्रतिकिलो या दराने हिरव्या मिरचीला भाव मिळत आहेत. गव्हाचे भाव चढेच राहणार :- केंद्र सरकार देशात भारत आटा विक्रीवर जोर देत असल्यामुळे खुल्या बाजारपेठेत थेट गहू विक्री बंद केली आहे. परिणामी आता खाजगी मिलकडून गहूची खरेदी वाढत असून साठाही चांगला तयार केला जात आहे. नजीकच्या काळात गव्हाचे भाव किमान आधारातून किमतीपेक्षाही अधिकच राहतील असे अंदाज आहेत. सध्या गव्हाची आवक उशिरा सुरु होत आहे. या वर्षी केंद्र सरकार ३२० लाख टन गहूची खरेदी करू शकते. सोयाबीन :- जगभरात सोयाबीनच्या व्यवहारामध्ये उदासीनता पाहवयास मिळत आहे. अर्जेंटिना आणि ब्राझीलमधुन सोयाबीनची विक्री मंदावली आहे. ब्राझीलमधुन मागील वर्षी दि.१ मार्चपर्यंत ५४१ लाख टन सोयाबीनची विक्री झाली होती. जी यावर्षी ५२ लाख टनाने कमी होत ४८९ लाख टनावर पोहचली आहे. यावर्षी सोयाबीन लागवडीतून शेतकऱ्याच्या पदरात पडलेली निराशा बघता या खरीप हंगामात २० ते २५ टक्के सोयाबीनचा पेरा कमी होणार आहे. मक्याचे भाव वर्षभर टिकून असल्याने आता बहुसंख्य शेतकरी मका पिकाकडे वळण्याची शक्यता आहे. पाकिस्तानातही कांदा निर्यात बंदी :- भारताने कांदा निर्यातीवर प्रतिबंध लावल्यामुळे पाकिस्तानातुन कांद्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. पाकिस्तानमधील कांद्याचे भाव जोरदार वाढले. अंतिम टप्प्यात पाकिस्तानने किमान निर्यात मुल्य १२०० डॉलर प्रतिटन इतके केले. आता रमजान महिन्यात कांद्याच्या भावावर नियंत्रण मिळवण्यासाठी ९ मार्च रोजी कांदा निर्यात बंदीचा निर्णय घेतला. परिणामी कांद्याच्या भावात ३० टक्के ची घसरण झाली.

# चला, वळूया वाचनाकडे



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

आधुनिक केसरी

**महाविद्यालयीन अध्यापन प्रक्रियेत असतानाच क्रमिक आणि संदर्भ अभ्यासक्रमाचे पुस्तक सुद्धा न वाचता केवळ विद्यापीठाच्या तीन तासाच्या जुन्या काही वर्षांच्या प्रश्नपत्रिका पाहून त्या प्रश्नांच्या अवलोकनातून येणारा प्रश्नांचा अंदाज घेऊन तेवढाच भाग अभ्यासणारा विद्यार्थ्यांचा एक वर्ग आणि 70 टक्के 80 टक्के 90% मार्क घेणारा विद्यार्थ्यांचा दुसरा वर्ग आपल्याला दिसतो.तर , आपण ज्या विषयाचे प्राध्यापक आहोत त्या विषयांमध्ये आपण तज्ञ असलो तरी त्या विषयाच्या व्यतिरिक्त इतर विषयांचं किंवा आजूबाजूच्या परिसरात सुरू असलेल्या विविध घडामोडींबाबत विद्यार्थ्यांना चकार शब्दही न सांगता येणारे प्राध्यापकांची एक पिढी एका बाजूला असं आजचं एक शैक्षणिक वातावरण पाहायला मिळतं .**

या पार्श्वभूमीवर अवांतर वाचन ही आज काळाची गरज आहे आणि या अवांतर वाचनातून विचारांना एक वेगळी दिशा मिळते, दृष्टिकोन व्यापक आणि विशाल होतो, आत्मविश्वास वाढतो , जगण्याचं उद्दिष्ट सापडतं आणि जीवन कशासाठी जगावं ? आणि ते कसं जगावं ? याचे निरनिराळे पैलू उलगडत जातात ,ज्या वाचनाच्या माध्यमातून आपल्याला सापडतात त्या वाचनापासून आजची पिढी विशेषतः युवा वर्ग अगदी दूर झालेला आहे . स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणारे विद्यार्थी सुद्धा अभ्यासक्रम डोळ्यासमोर ठेवून त्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने स्वतःच्या टीपणांची वही तयार करणे आणि परीक्षा पास होण्यावर भर देतात . तर ,वादविवाद स्पर्धा , वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून जेव्हा विद्यार्थी बोलायला उभा राहतो तेव्हा त्या विषयाची खोली त्या विषयाच्या अनेक बाजू परीघ आजचा वादविवाद पटू मांडताना दिसत नाही हेही तेवढेच खर आहे.

खरंतर वाचन हे जीवन जगणं समृद्ध करण्याचं सगळ्यात चांगलं साधन आहे. परंतु, दुर्दैवाने आज आभासी विश्वात वावरणारा सगळा समाज जेव्हा आम्ही बघतो. तेव्हा, या आभासी विश्वातल्या माध्यमात गुंतत जाण्याच्या प्रवृत्तीमुळे आजचा तरुण वर्ग हा बरेचदा निराशेच्या गर्तेत सापडताना दिसतो , आपल्या ध्येयापासून दूर जाताना दिसतो , आणि बरेचदा निराशेच्या गर्तेतुन आपलं जीवन संपविण्याच्या मार्गावर सुद्धा जाताना दिसतो . अविचाराची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे हे आपण दररोजचं वर्तमानपत्र उघडून वाचायला हातात घेतलं की सहज कळतं . हा अविचार टाळायचा असेल आणि आपणच आपलं जगणं समृद्ध करायचा असेल तर, अवांतर वाचन मग ते पुस्तक असो , मासिक असो , वर्तमानपत्र असो , वर्तमानपत्रांच्या विविध पुरवण्या असो किंवा काही आत्मचरित्र असो हे आयुष्यात फार मोलाच योगदान बजावत असतात . परंतु हातात पुस्तक घेऊन वाचणारी पिढी आता दुर्मिळ होत चालली हे मात्र तेवढेच खरे . नेमकं होतं असं आहे की , आपल्याला आपले प्रश्न , आपल्या अडचणी , आपल्या समस्या , आपल्या कटकटी याच आपल्याला सगळ्यात जास्त वाटतात , मोठ्या वाटतात आणि आपल्याच वाटायला हे आयुष्य का यावं ? आपणच दुर्दैवी , आपणच ग्रामीण भागात जन्माला आलो हेच आपलं नशीब,आपण शहरात राहिलो असतो तर कुठल्या कुठे पोहचलो असतो हा सगळा विचार अनेकदा आजची तरुणाई करताना दिसते . जोपर्यंत आपण अवांतर वाचनातून यशस्वी लोकांच्या अपयशाच्या गाथा वाचत नाहीत , जोपर्यंत आपण अनेकांच्या जीवन चरित्रांमधून त्यांचं जीवन त्यांनी कसं घालवलं आणि यश कसं संपादन केलं हे आपण जाणून घेत नाही तोपर्यंत असे प्रश्न आपल्यासमोर नेहमीच पडत असतात . परंतु जेव्हा आपण पुस्तक वाचायला हातात घेतो आणि त्यातून वेगवेगळ्या गोष्टी आपल्याला कळायला लागतात तेव्हा लक्षात येतं की आपल्यापेक्षाही अतिशय हलाखीच्या परिस्थितीमध्ये राहणाऱ्या लोकांनी सुद्धा त्या परिस्थितीचे रडगाणं न गाता त्या परिस्थितीवर स्वार होत त्यांनी स्वतःचं गाणं गात आपलं आयुष्य समृद्ध केलय . आणि आज ते यशाच्या शिखरावर पोहोचलेले आपल्याला दिसतात . हे सगळं आपल्याला त्या वाचनातून कळतं .

या पृथ्वीतलावर आलेल्या जवळपास 80 ते 90 टक्के लोकांच्या वाट्याला त्यांच्या आयुष्यात प्रश्न , समस्या , अडचणी , कटकटी , त्रास , काळजी , चिंता हे आलेलं असतं . परंतु यातील बोटावर मोजण्या इतक्या काही लोकांनाच मात्र या सर्व समस्यांच्या बाबतीत त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो आणि तो दृष्टिकोन त्यांना परिस्थितीतून , वाचनातून आणि त्या वाचनातून आलेल्या अनुभवातून आलेला असतो हे आपल्याला प्रकर्षाने जाणवत आणि म्हणूनच जर वाचनातून आपल्याला विचारांची समृद्धता मिळत असेल, जगण्याची समृद्धता मिळत असेल तर आपण या वाचनाकडे का न वळावे ? अगदी जाणीवपूर्वक वळावे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांची 'माझी जन्मठेप' वाचल्यावर आपल्याला कळतं की सावरकर नेमके कोण होते ? कसे होते ? त्यांच्या वाट्याला कोणते जीवन आलेलं होत ? आणि आज राजकीय लोक आपल्या राजकीय फायद्यासाठी त्यांच्या नावाचा कसा वापर करत आहेत ? स्वामी विवेकानंदांचे



जीवन चरित्र वाचल्यानंतर लक्षात येतं की उनपुर 39 वर्षाच आयुष्य लाभलेले नरेंद्र विश्वनाथ दत्त हे संपूर्ण जगामध्ये स्वामी विवेकानंद म्हणून ओळखले जातात. आणि तब्बल दीडशे वर्षानंतरही त्यांचा जयंती समारोह न केवळ भारतात तर जगातील विविध राष्ट्रांमध्ये अतिशय उत्साहाने आणि आनंदाने साजरा केला जातो. एकनाथजी रानडे यांनी लिहिलेलं 'कथा विवेकानंद शिला स्मारकाची' हे पुस्तक जेव्हा आपण वाचू तेव्हा आपल्याला लक्षात येतं की एखादं विशाल असं भव्यदिव्य कार्य उभ करायचं असेल तर त्यासाठी आयुष्यात किती अडचणी येतात ? त्या कार्यात किती अडचणी येतात ? आणि त्या अडचणी आपण कशा सोडवायला हव्यात ? कन्याकुमारी येथे उभे असलेले शीला स्मारक हे आज जगातल्या लोकांसाठी एक प्रेरणास्थान आहे . पण ते निर्माण करण्यासाठी काय अडचणींचा सामना करावा लागला हे जोवर आपण एकनाथजी रानडे यांनी लिहिलेलं पुस्तक वाचणार नाही तोवर आपल्याला कळणार नाही . विठ्ठल व्यंकटेश कामत यांचं इडली ऑर्किड आणि आत्मबल हे पुस्तक जेव्हा आपण वाचू तेव्हाच आपल्याला असं लक्षात येईल की एक यशस्वी उद्योजक व्हायसाठी आपल्याला काय काय करावं लागतं . छोट्या छोट्या गोष्टींमध्ये नावीन्यपूर्ण संकल्पना निर्माण करत एक यशस्वी उद्योजक म्हणून वाटचाल कशी करता येईल ? विश्वास नांगरे पाटील यांचं 'मन मे है विश्वास' हे पुस्तक जेव्हा आपण वाचू तेव्हाच आपल्याला कळेल की स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून उंच ध्येय गाठायचं असेल तर आयुष्यात कुठल्या कुठल्या गोष्टींचा त्याग करावा लागतो ? संघर्ष वाट्याला आल्यानंतर सुद्धा हार न मानता समोर आलेल्या परिस्थितीवर मात करत आपण आपलं ध्येय कसं साध्य करायचं ? हे विश्वास नांगरे पाटिल यांना वाचल्यानंतरच आपल्याला कळेल. असे अनेक दाखले, असे अनेक उदाहरणं तुम्हाला देता येतील मित्रांनो, परंतु जागे अभावी ते शक्य नाही. फक्त एवढे मात्र निश्चित सांगू इच्छितो की, पुस्तक हा माणसाचा सगळ्यात चांगला मित्र आहे. आयुष्यात कुठल्याही समस्या आल्या, आयुष्यात कुठलेही प्रश्न निर्माण झालेत, आयुष्यात कितीही संकट आलेत तरी जर पुस्तक जर तुमचा मित्र असेल तर या सर्व संकटांवर अडचणींवर तुम्ही धैर्याने मात करू शकता. आणि म्हणून स्वतःचा सर्वांगीण विकास करायचा असेल स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर आपण आभासी विश्वातून बाहेर पडून वाचनाकडे वळायलाच हवं असं मला प्रामाणिकपणे वाटतं आणि म्हणूनच आजच्या या विषयाचं प्रयोजन आपल्यापुढे ठेवतो आहे. 'वाचाल तर वाचाल...!'



# आत्मज्ञान

आधुनिक केसरी

एक संत वनात कुटी बांधून राहत होते. कंदमुळे खाऊन ते गुजराण करत असत आणि परमेश्वराचे चिंतन करत. वनातून जाणारा कोणी त्यांची कुटी पाहून थांबत असे. तेव्हा ते त्याच्याशी प्रेमाने बोलत. जे काही जवळ असेल ते त्याला खाऊ घालत. एक दिवस एक तरुण त्यांना भेटायला आला. त्यांच्या बोलण्याने तो प्रभावित झाला आणि त्यांचा शिष्य बनून तेथेच राहू लागला. संताने त्याला तपश्चर्या कशी करतात याविषयी माहिती दिली. शिष्याने गुरुच्या शिकवणीप्रमाणे वाटचाल सुरु केली. गुरुशिष्य स्नेहभावनेने राहू लागले. एकदा संत त्याला म्हणाले," मन मोठे चंचल असते, त्याला नियंत्रणातच ठेवले पाहिजे. ' ही गोष्ट शिष्याच्या मनावर ठसली. त्या दिवसापासून त्याने स्वतःला एका खोलीत बंद करुन घेतले. संताने त्याला विचारले असता शिष्य म्हणाला की, तो त्याच्या मनावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. शिष्य रात्रंदिवस खोलीतच राहू लागला. आश्रमात येणा- या जाणा-याकडे तो अजिबात लक्ष देईनासा झाला. एकेदिवशी गुरुने शिष्याला खोलीचा दरवाजा उघडावयास सांगितले. गुरु आत आले ते हातात एक वीट घेऊनच. गुरुंनी शिष्याला काहीच न बोलता ती वीट एका दगडावर घासायला सुरुवात केली. शिष्याने विचारले की, गुरुजी हे काय करताय तुम्ही. गुरु म्हणाले, या विटेपासून आरसा बनवायचा आहे. शिष्य म्हणाला, गुरुजी असे कसे शक्य आहे. गुरुजी शांतपणे शिष्याला म्हणाले, ज्याप्रमाणे विटेचा आरसा बनू शकत नाही तसे मनाचा आरसा बनू शकत नाही. मन तर धूळ आहे जी आत्म्यावर पडलेली असते. ती धूळ विसरण्याचा प्रयत्न केला तरच खरेपणा दिसून येतो. शिष्याला गुरुची शिकवण समजून आली.

# माणसा तू माणूस बन

आधुनिक केसरी

**तुला मानवा या ठायी, जन्म पुन्हा पुन्हा नाही बहुमोलाचे हे लाभले जीवन,माणसा तू माणूस बन तुम्ही म्हणाल माणसाने भरलेल्या या जगात माणसा तू माणूस बन असे म्हणण्याची वेळ का बरे आली असेल. केवळ दिसण्याने माणूस असणे म्हणजे मानव जन्माची सार्थकता सिद्ध होत नाही. मनुष्य जन्म हा ईश्वरनिर्मित सर्व रचनेमध्ये श्रेष्ठ मानला जातो कारण इतर जीवापेक्षा केवळ माणसाला काही बाबतीत श्रेष्ठत्व प्रदान केले गेले आहे. जगातील सर्वच जीव जगत असतात परंतु माणसाला स्वतःचे हित अहित जाणून घेण्याची विशेष समजबुद्धी मिळाली आहे.माणूस जन्माला येतो तेव्हा त्याला कोणत्याही प्रकारचा विकार नसतो कारण त्याचे अंतकरण शुद्ध असते.**

जन्माला आलेल्या कोऱ्या बाळाला जसे घडवले जाते तसा तो घडत जातो.जन्मतः त्याच्या माथी कसलाही ठप्पा घेऊन येत नाही म्हणून जात,धर्म,पंथ,वंश,चाली रीती यांचा त्याला कसलाही लवलेश नसतो. जसं



**पवन श्रीरंगसा कुसुंदल**
**९०७५५९५६९५**

जसे वय वाढत जाते तस तसे दुनियेत राहून तो दुनियादारी शिकत राहतो.व्यक्तीचा स्वभाव आणि संस्कार हे समाजाची देणं असते कारण शिकवण्या पेक्षा जास्त सभोवताली होणाऱ्या हालचालीतून मिळणारे अनुभव मनावर परिणाम करतात. समाजात राहून त्याच्या जीवनात बदल घडत राहतात.किशोर अवस्थेत आल्यानंतर त्याची समज विकसित होईपर्यंत त्याने खूप काही अनुभवलेल असतं.समाजात वावरत असताना मिळणाऱ्या चांगल्या वाईट अनुभवातून त्याच्या नजरेत निर्माण झालेले चित्र फारच विद्रूप असते.त्याने पाहिलेला माणूस इतरांच्या प्रगतीवर द्वेष करणारा,इतरांच्या सुखामध्ये विरजण घालणारा, आपापसात वाद करणारा,नाते संबंध तोडून एकटा राहण्यात सुख मानणारा,स्वार्थासाठी इतरांना त्रास देणारा आणि इतरांच्या झोळीत दुःख टाकून आनंदी होणारा असाच असतो. मानव जन्म बहुमोलाचा आहे कारण या जन्मात येऊनच सत्कर्म आणि सदाचार अंगी बाळगून जीवन व्यतीत करणे ईश्वरास अपेक्षित असते परंतु माणूस स्वतच्या विश्वात रमून हित अहित याचा विचार न करता आपल्याच धुंदीत मस्त राहतो. माणसाच्या वृत्ती मध्ये परोपकराची भावना असेल तर या हाताने इतरांना सुख वाटण्याचे पुण्य प्राप्त करता येते.हे सर्व सोडून आपण का असे वेड्या सारखे वागत आहोत?.एखाद्या व्यक्ती कडे इनोव्हा आहे आणि शेजाऱ्याने स्विफ्ट जरी घेतली तरी ईनोव्हा दारात असणारा माणूस दुःखी होतो.माझ्या कडे काय काय आहे याचा मला आनंद नाहीये कारण मी तर इतरांच्या प्रगतीवर उदास होऊन जातो. माणसातील माणुसकी हरवत चालल्याची किती उदाहरणे द्यावीत वैर इर्षेने एखाद्या व्यक्ती बद्दल आयुष्यभर कटुता निर्माण होते तर धन संपत्तीची वाटणी साठी कौटुंबिक नात्यात कायमचा दुरावा निर्माण होतो.जमिनीच्या छोट्याश्या तुकड्यासाठी एकमेकांच्या जीवावर उठणारी माणसं पण समाजात आहेत.लुटमार,खून,दरोडे,जातीय वाद,दंगली अश्या अनेक प्रकारची दुष्कृत्ये होण्या मागे एकच कारण आहे ते म्हणजे मानवमुल्यांचा दिवसेंदिवस होणारा ह्रास. माणसाच्या श्वासाचा क्षणाचा भरोसा नाही.अगदी चालता बोलता या देहातून प्राण निघून जातो.पाण्याचा बुडबुडा असणारा हा मानव जन्म पूर्णत्वास नेण्यासाठी मार्ग शोधण्याची गरज आहे.व्यक्ती हा समाजाचा अविभाज्य घटक आहे म्हणून प्रत्येक माणसाने स्वतःच्या जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करण्याला सुरुवात केली तर समृद्ध आणि सक्षम समाज निर्माण होणे सहज शक्य आहे.सभोवताली कुणावर अन्याय होत असेल तर त्या विरुद्ध आवाज उठवणे,निर्बल माणसाला निस्वार्थ आधार देणे,माणुसकीची जाण ठेवून इतरांच्या दुःखात सहभागी होणे यासाठी वेगळ काही करण्याची गरज नाही हे गुण आपल्या अंगी असतातच केवळ ह्या सद्गुंनाना चेतना प्रदान करून त्याद्वारे समाजहित जोपासण्याचे कार्य अगदी सहज करता येते. छोट्या छोट्या गोष्टीतून मिळणारा आनंद आपल्या पुरता सीमित न ठेवता त्यात इतरांना सहभागी करून त्यांच्या ओठावर हसू आणता येईल यापेक्षा मोठे पुण्य कशातही नाही. माणूस आयुष्यभर इतरांमधील दुर्गुण शोधून आपल्या मनात त्याला साठवत राहतो आणि असे करत करत त्याचे अंतर्मन सद्गुण पाहण्याची नजर गमावून बसतो.धन संपत्तीच्या जोरावर माणसाची श्रीमंती ठरवता येत नाही तर त्या श्रीमंतीच्या छायेत दिन दुबळ्याना मायेची सावली मिळाली तरच त्याची श्रेष्ठता.माणसाच्या जन्मात येऊन माणुसकी जोपासली तरच मानव जन्म सफल होऊ शकतो.माणसामधला माणूस जागा करण्यासाठी अनेक संत ,महात्मा,महापुरुष प्रयत्न करत राहिले. सत्संग, सुविचार,सन्मार्ग आणि सदाचार या शिवाय माणूस अपूर्ण आहे याची जाण करून देऊन प्रेम आणि नम्रता मनात भरून माणसाचे जीवन परिपूर्ण करता येते हे त्यांनी वेळोवेळी समजावून सांगितले.केवळ हाडा मासाचा पुतळा बनून जगात मिरवण्या पेक्षा या देहा द्वारे सत्कर्म करत मानवमुल्य जपता आले तरच खऱ्या अर्थाने माणूस आहोत आणि जिवंतही आहोत असे म्हणता येईल.हीच अमुची प्रार्थना, अन् हेच अमुचे मागणे माणसाने माणसाशी,माणसा सम वागणे.

# सेवा...

आधुनिक केसरी

सेवा केल्याने मेवा मिळतो असं म्हणतात. पण मनात काही हेतू ठेवून सेवा कराल तर मेवा अजिबात मिळणार नाही. ,"देवबाप्पा देवबाप्पा नवसाला पाव, खाऊचे झाड माझ्या अंगणात लाव".

**संस्कारधन**



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

**भाग ४१**

लहान मुलांसाठी हे गाणं ठीक आहे. पण मोठ्याने देवाकडे त्याची भक्ती करून काहीतरी मागावं म्हणजे अतिच आहे. देवा मला आता नातू हवा आहे. कसल्या धर्म संकटात आपण देवाला टाकतो. आधीच त्यांनी आपल्याला खूप सुंदर असा मानव जन्म दिलेला आहे. दु,ःखीतांची  सेवा करण्यासाठी त्यांनी माणूस म्हणून जन्माला घातला आहे .आता माणसाने आपल्या बुद्धीनुसार, कर्मानुसार, मेहनतीने, प्रेमाने सेवा करून मानव जन्म सार्थकी लावावा. आपण जी सेवा करू ही ईश्वराने आपल्याला दिलेल्या जन्मापेक्षा कितीतरी पट कमीच आहे. त्याने आपल्याला दिलेले हे शरीर कितीतरी गुंतागुंतीचे आणि किचकट आहे. ते फक्त त्यालाच आणि डॉक्टरांनाच माहीत कसे कसे बनले आहे ते. आपल्या शरीरातील अवयवांची आपल्याला पूर्ण ओळख पण होत नाही. आईच्या पोटात बाळ राहिल्यापासून तो किती सेवा करत असतो बाळाची. त्याला हवा अन्न पाणी औषधी सगळं तो वेळच्यावेळी पुरवतो. त्याचे सर्व अवयव त्याला जिथल्या तिथे देतो. थोडेही मागेपुढे करत नाही. झालं थोडं मागेपुढे तर डॉक्टरांना सूचना देतो .फारच खाली वर झालं असेल तर परत घेऊन जातो त्याच्याकडे. तो स्वतः दुरुस्ती करतो, चांगली परिपक्व. आपण पामर मात्र दुःख सागरात डुबतो गेला म्हणून. पण त्या व्यक्तीची दुःखातून मुक्तता होत असते." जो आवडे सर्वांना तोची आवडे देवांना ".आई वडील गुरु अंध अपंग अडाणी दीनदुबळ्यांची सात्विक सेवा आपल्या हातून घडावी एवढ्याच साठी हा लेख प्रपंच. तळे राखील तो पाणी चाखील अशी सेवा नको .त्या सेवेत भाव असावा. सेवाभावी संस्था असतात तिथे मोफत जेवण शिक्षण औषधोपचार मिळते. कुठल्याही मेव्याची अपेक्षा न करता.  अशा संस्थेला दान करणारे दाते असतात. ज्यांच्यात  दानत वृत्ती असते तेच सत्पात्री दान करू शकतात. डॉक्टर पोलीस शिक्षक आशा जवान हे सारे देशाची सेवाच करत आहेत. आपणही अशा सेवेचा एक हिस्सा बनायला काय हरकत आहे .??

# सुख पेरणारे रंग

आधुनिक केसरी

**रंगाचे आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. रोजच आयुष्य कितीही साध आणि कंटाळवाण असलं तरी त्यात रंगाचे आपले असे वेगळे स्थान आहेच. रोज जशा आपण इतर गोष्टी पाहतो त्याचप्रमाणे रंगही असतातच की आपल्या आजूबाजूला, अंगणात एखादे फूल उमलले की त्याला रंग मनाला आल्हाददायक वाटतो तसेच त्यातील उन्मत्त करणारा अवीट सुगंध जेव्हा दरवळू लागतो तेव्हा अंतःकरणातील गाभाऱ्यात चैतन्याची चमक उमटून जाते. आपल्या आयुष्यात रंग नसेल तर..? ही कल्पनाच मनाला व्याकूळ करणारी.**

असं विरस झालेलं जगणं कुणाला बरं आनंदाने जगता येईल. आयुष्य रोज



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

एकसारख मुळीच नसत. तारेवरची कसरत करतं. अनेक संकटाना रोज आपण पचवत असतो. अनेक घटना मनावर चांगले वाईट परिणाम करत असतात; पण एखादा क्षण किंवा प्रसंग असा घडतो की आपण त्यात मोहरून जातो. त्याचे वर्णन करण्यासाठी आपण एक रंग योजतो, जसा प्रेमासाठी गुलाबी, मैत्रीसाठी सफेद, शौर्यासाठी केशरी, क्रोधासाठी लाल, तेच मांगल्य आणि चैतन्य फुलविण्यासाठी पिवळा रंग असं काही काही आपण रंगातून पाहतो. सभोवतालची सृष्टी रंगातून परिपूर्ण होते आणि नकळत आपलं आयुष्य देखील. अनेक आनंदाचे आणि सुखाचे धडे हे रंगाच्या पाटीवरच गिरवले जातात. प्रत्येकाला रंगाचं आकर्षक हे असतचं आणि आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात रंग रोज आपआपली भूमिका बजावत असतात‌ाच. साध उदाहरण पहा, आपण आपल्या आवडत्या रंगाचे वस्त्र परिधान केले तर किती सुखदायक वाटतं. दिवसातील संपूर्ण क्षण हे हर्षाला भिजून गोड होतात. माणसाच्या आनंदाची व्याख्या ही फारच संक्षिप्त आहे पण त्याला ती उलगडत नाही. माणूस भौतिक गोष्टीत आपले सुख शोधतो मात्र त्याला सुख हे अशा लहानसहान गोष्टीतच मिळते हे तो विसरून जातो. बऱ्याचदा लहान गोष्टीच्या नोंदी आपण ठेवत नाही कारण त्या जितक्या सहजतेने घडता तितक्या सहजतेने आपण त्या लक्षात राहत नाही. पण सुख हे निराळ असं काही नसतं हेच असतं. कधी रंगात तर कधी गंधात. फाल्गुनात येणारा हा होळीचा सण हा आपले आयुष्य नव्याने सुरू करण्यासाठीच असतो. वर्षभरात आपण घालवलेल्या चांगल्या वाईट क्षणांनी आपली ओंजळ भरलेलीच असते मग होळीच्या दिवशी आपण काय करायचे असते तर आपल्याला मिळालेले चांगले क्षण हृदयात बंद करून ठेवायचे असतात, जे वाईट होतं त्यातून शिकवण घेऊन त्याचं दहन हे होलीका अग्नीत करायचे असते. आपल्यातील वाईट विकार, घटना, त्रास, व्यथा, वेदना सारं काही त्या होळीत  भस्म करूध टाकयचे म्हणजे आपल्याकडे राहते ते फक्त चांगलं आणि हेच चांगल पुढे घेऊन चालायचं असतं. एकदा वाईट दहन केलं की आपण गोडव्याचे रंग उधळण्यास मोकळे असतो.

आधुनिक केसरी



**लय भारी**
# सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424




हा खास गुजरात राज्यातील खाद्यपदार्थ असला तरीही सर्वांचा लाडका असल्यामुळे आता सर्वत्र बनवला जातो . त्यांची बनवण्याची मूळ पद्धत थोडीशी आपल्याकडे बरेच जणाना थोडीशी किचकट वाटल्यामुळे आवडत असल्या तरी बिघडण्याच्या भीतीमुळे बनवण्याचे धाडस करायला नको वाटते .जाड झाल्यातर, किंवा टेस्ट नाही जमली तर  असे वाटून टाळले जाते .पण आज मी ज्या पद्धतीने करणार आहे ती इतकी सोप्पी आहे की चुकूनही पहिल्यांदा करतानाही बिघडणार नाही हे लगेंच लक्षात येईलच, आणि इतक्या झटपट सुरेख बनतात की पार्टीसाठी सुद्धा बनवू शकाल..पहाच मग करून..

**साहित्य :** 1 वाटी बेसन ,पाव वाटी बारीक रवा, पाऊण वाटी आंबट दही, 1 चमचा साखर, 2 हिरव्या मिरच्या, अर्धा इंच आल्याचे तुकडे, पाव चमचा हिंग, अर्धा चमचा हळद, चवीनुसार मीठ, रोल बनवताना घालण्यासाठी आवडीनुसार कमी जास्त प्रमाणात नारळ, कोथिंबीर, फोडणीसाठी 2 चमचे तेल, कढीपत्ता, मोहरी, जिरे.

**कृती :** सर्वांत आधी मिक्सरच्या भांड्यात बेसन, रवा, हळद, दही, साखर, आले, मिरचीचे तुकडे, हिंग घालून मिक्सरच्या भांड्यात 1 वाटी पाणी घालून व्यवस्थित बारीक होईपर्यंत फिरवून घ्यावे .मग ते गाळणीतून दुसऱ्या भांड्यात गाळून घेऊन घट्ट झाकुन ठेवावे . साधारण  अर्धा तास झाल्यावर झाकण काढून पाहिल्यास रवा छान भिजल्यामुळे फुगतो त्यामुळे पीठ थोडेसे घट्टसर झाल्याचे दिसेल. गरज असेल तर थोडे पाणी घालून..साधारण अर्धी वाटी पाणी घालून धिरड्याच्या पिठाप्रमाणे बनवून घेऊन त्यात चवीनुसार मीठ घालावे व व्यवस्थित फेटून घ्यावे . आता गॅसवर मोठ्या कढईत किंवा मोदकपात्र किंवा कुकर मध्ये पाणी घालून मध्ये रिंग किंवा वाटी ठेवून वाफ येण्यासाठी ठेवावे .मग एका थाळीला तेल लावून त्यात एक.. दिड पळी पीठ घालून पातळ थर पसरून घ्यावा . 5..7 मिनिटे मोठ्या आचेवर छान वाफवून घ्यावे. झाकण काढून हाताला चिकटत नसल्याची खात्री झाल्यावर बाहेर काढून तशीच दुसरी थाळीही बनवावी . अशाप्रकारे सर्व बनवून झाल्या की थंड झाल्यावर हव्या त्या आकाराच्या वड्या पाडण्यासाठी  सुरीने उभ्या रेषा पाडाव्यात . मग त्यावर एकदम बारीक चिरलेली कोथिंबीर , खवलेलाओला नारळ घालून सर्व कडा सुरीने थोड्या उचलून घ्याव्यात म्हणजे वडीचा रोल बनवणे सोपे जाते .मग एकेक रोल बनवून घ्यावा. सर्व रोल बनवून झाले की गॅस वर छोट्या कढल्यात तेल घालून मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता घालून मस्त फोडणी बनवून सर्व वड्यांवर घालावी वरून सजावटीसाठी थोडा नारळ.. कोथिंबीर घालून छान डिशमध्ये सर्व्ह करावे .

**वैशिष्ट्य :** रवा घातल्यामुळे छान बाईंडिंग येते त्यामुळे वड्या बनवणे एकदम सोपे होते. आणि आंबट दह्यामुळे टेस्टी बनतात .एकदम पातळ बनल्या मुळे चवीला छान लागतात. पिठ पिठल्याप्रमाणे शिजवुन वड्या बनवण्याची मुळ पद्धत आहे. पण यात खुप कौशल्याची गरज असते. नाहितर वड्या जाडसर होतात व्यवस्थीत शिजले नाहीतर  तुटतात. या पद्धतीने वड्या  झटपट तर बनतातच पण बिघडण्याचा धोकाच राहत नाही. नक्की करून बघाच.

# आमराई राखणीचे ते रम्य दिवस!



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**द्वितीय सत्र परीक्षेचा शेवटचा पेपर संपल्यानंतर शाळेला उन्हाळ्याची दीर्घ सुट्टी लागली होती.सामाजिक शास्त्राचा शेवटचा पेपर देऊन आम्ही वर्गमित्र आनंदाने घराकडे निघालो होतो. चैत्राचे उन वरुन चटके देत होते आणि तापलेली जमीन खालून अनवाणी पायांना भाजून काढत होती.गरिबीमुळे पायांना चपला घेणे परवडणारे नव्हते आणि तेव्हाचे दिवस होते हालाकीचे.दोन वेळचे जेवण आणि दोन जोड कपडे मिळाले की आम्ही भावंडं जाम खूश व्हायचो.गाव जवळ आल्याने मित्रांचा निरोप घेतला.भर उन्हात घरी पोहचलो.घराचे दार उघडले आणि हातातला पॅड आणि पेन पुस्तकांच्या पिशवीत ठेवून दिला.गार पाण्याने हात पाय स्वच्छ धुतले.कडकडून भूक लागली होती.रानात रोजगारासाठी गेलेल्या आईने स्वयंपाक करुन ठेवला होता.**

रोजच्याप्रमाणे भाकर भाजी वाढून घेतली. सावकाश पणे मनसोक्त जेवण केले. डेऱ्यातले थंड पाणी पिऊन मन तृप्त झाले. घराचे दार बंद करून चुलतभाऊ बालाजी कडे आलो. तो माझीच वाट बघत होता. दोघांनी मिळून आमराईची वाट धरली. उमरगा कोर्ट हा आमचा गाव सृष्टी सौंदर्याने नटलेला. गावाच्या आजूबाजूला असणारा शेत शिवार वेगवेगळ्या नावांनी ओळखला जात होता. खंडोबाचा माळ,गादा, तेल्याचा माळ, जामदरा, दोडी, डागी, इनाम आणि आमराई अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखला जाणारा असा हा आमच्या गावाचा शेत शिवार होता. इकडच्या तिकडच्या गप्पा मारत, खाच व खळग्यांची वाट तुडवीत मी व बालाजी आमराईत पोहचलो. आमची आजी पारुबाई एका आंब्याच्या झाडाखाली बसून आमराईची राखण करत होती. आम्ही तिच्या जवळ गेलो. ती दरडावत आम्हाला म्हणाली, 'चांडाळांनो एवढ्या किर्र उन्हात आलाव की रं बोडक्या डोस्क्यांनी. एखादी कापड डोस्क्यावर ठेवावं का न्हाय?' आम्ही काहीच न बोलता विषय बदलण्यासाठी आम्ही तिला विचारलं,' मोठी माय जेवलीस का न्हाई?' यावर तिने सांगितले,' आत्ताच जेवले. पाणी संपलंय, डेऱ्यात पाणी आणा जा.' आम्ही लगेच जवळच्या विहीरीत उतरुन डेरा भरून पाणी वर आणलं. आम्हाला पाणी पाजून मग आजी पाणी प्यायली. आमची आजी माहितीचा खजिना होती.ती आम्हाला गोष्टी, भाकडकथा, कोडी, बोधकथा, इसापनीतीच्या कथा, भूतांच्या कथा सांगून आमचे मनोरंजन करायची. ती गोष्टी सांगायची, आम्ही फक्त ऐकायचो. दरवर्षी आजी आमराई राखायला घ्यायची आणि उन्हाळ्यात शाळेला सुट्टी लागली की पूर्णवेळ आमराई राखण्याची जबाबदारी आमच्यावर पडायची.अगदी पहाटेपासून ते सायंकाळी अंधार पडेपर्यंत आम्ही आमराईचे रक्षण करायचो. आमराईच्या मालकांचा आमच्या आजीवर विश्वास आणि आमच्या आजीचा आमच्यावर लई विश्वास होता. म्हणून दरवर्षी आमराईचे राखण करण्याचे काम आम्ही करायचो. आमराईतील आंब्यांच्या झाडांचे वैशिष्ट्ये निरनिराळे होते. नारळ्या आंबा हुबेहुब नारळासारखा आकाराने मोठा आणि चवीने सुध्दा गोड. गुठली आंबा अगदीच लहान आणि गोड भरपूर. केळ्या आंबा, कलमी आंबा, बेल्या आंबा त्यांचे वैशिष्ट्ये राखून होते. आंबे पाडाला आले की आमची मजा असायची.आंब्यांचे पाड खाऊन आम्ही तृप्त होत असू.

आमराईचे राखण करता करता आमचा आणि अनेक गावकऱ्यांचा संबंध आला. एखादा दांडगट माणूस यायचा आम्हाला दमदाटी करून आंबे तोडून न्यायचा. दुपारच्या वेळी आम्हाला डुलकी लागली की संधीचा फायदा घेऊन काही गुराखी आंबे तोडून न्यायचे. जळणफाटा गोळा करत आलेल्या बाया आम्हाला विचारुन एकेक आंबा घ्यायच्या.जे कोणी जबरदस्तीने किंवा दांडगाईने आंबे तोडून न्यायचे त्यांची नावे आम्ही आमच्या आजीला सांगायचो. मग आजी त्यांच्या घरी जाऊन जाब विचारायची. कधी कधी मी, बालाजी व आमचे सवंगडी आंब्याच्या झाडाखाली बैठे खेळ खेळत असू. कधी गाण्याच्या भेंड्या खेळताना खूप मज्जा येत असे. असे हे आमचे आमराईचे राखण करतानाचे दिवस होते. परंतु,काळ बदलला, माणसं बदलली. झाडांची बेसुमार कत्तल झाली. एकेकाळी एखादा वाटसरू आमराईत यायचा.थंड सावलीत बसायचा. कच्चा, आरदकच्चा किंवा पाडाचा आंबा खाऊन जायचा. आज ती आमराई नष्ट झाली आहे. तिचे अस्तित्व शिल्लक राहिलेले नाही. आता जेव्हा जेव्हा मी गावाकडे जातो तेव्हा तेव्हा माझी नजर एकेकाळच्या आंब्यांनी बहरलेल्या आमराईकडे जाते. ती आमराई मला कुठेच दिसत नाही. माझे मन उदास आणि दुःखी, कष्टी होते. आमराईच्या गोड आठवणी मनाला हूरहूर लावून जातात.



# आठवणींचा मागोवा !



डॉ.बलराज पांडवे
मो.नं. 9511885093

आधुनिक केसरी

**स्मृतीच्या पाऊलखुणा माणूस आयुष्यभर अगदी शिदोरी जपून ठेवावी तशी हृदयामध्ये जपून ठेवत असतो. जन्मापासूनच प्रत्येक व्यक्ती अशा आठवणींना अधून मधून उजाळा देत असतो. काही आठवणी आपण जिवापाड जपत असतो. आपल्या जवळचे आप्तेष्ट, आपले भाऊ, आपल्या बहीणी, आई, वडील, जवळचे मित्र यांचा प्रभाव आपल्या जीवनावर कळत नकळतपणे पडत असतो. फुलांच्या गंधाला चोरता येत नाही, सूर्याच्या किरणांना झाकता येत नाही, चांदण्याची शीतलता थांबवता येत नाही, तद्वतच आयुष्यातील आठवणीच्या वाटा विसरता येत नाहीत.**

अशा आठवणी मध्ये जणू काही मायेचा ओलावाच आहे असे आपणास जाणवते. पावसाचे पाणी मातीत जिरल्यानंतर जसे मातीला हायसे वाटते !तसेच आठवण काढणाऱ्या व्यक्तीस पण मायेचा ओलावा मिळाल्यासारखे वाटते! आठवणीच्या सागरामध्ये अनेक चांगल्या वाईट गोष्टींचा संचय झालेला असतो. सहसा चांगल्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न नेहमीच करावा .वाईट आठवणी नेहमीच वेदनादायक असतात .माणसाला दुखी करत असतात .यातना देत असतात. म्हणून अशा वाईट आठवणी नेहमीच डिलीट करण्याचा प्रयत्न करावा. असे करणे हे आपल्यासाठी दिलासादायक असते .चांगल्या आठवणी हृदयाच्या एका कोपऱ्यात जतन करून ठेवाव्यात. जीवनात दुःख आहे म्हणून सुखाची मोठी किंमत आहे ! कडाकाच्या उन्हाळ्यामध्ये जसे थंड सावलीचे महत्त्व आहे तद्वतच चांगल्या व सुखद आठवणीचे जीवनात मोठे महत्त्वाचे स्थान आहे .आणि दैनंदिन व्यवहारांमध्ये बरेच वेळा आपण आपल्या आठवणीच्या दुनियेमध्ये जाऊन येतो .चांगली आठवण असेल तर मन प्रसन्न होते. जर वाईट आठवण असेल तर मन दुखी होते .म्हणून चांगल्या आठवणींना उजाळा देणे हे कधीही जीवनामध्ये उत्साहवर्धक आहे .आपण उगवत्या सूर्याला नमस्कार करत असतो .म्हणून आठवणीच्या प्रांतामध्ये विहार करत असताना चांगले पाहण्याचा प्रयत्न करावा. परंतु बऱ्याच वेळा आपण हजारो चांगल्या गोष्टी आपल्या जीवनात घडून जातात पण त्या गोष्टींची आठवण करत नाही पण एखादी दुःखाची गोष्ट जर आपल्या जीवनात घडली असेल तर त्या गोष्टीची आठवण वारंवार करत रहातो. असे करणे किंवा त्या दुःखाच्या गोष्टी आठवणे यामुळे आपणास त्रास होतो व मनाला वेदना होतात...

मला माझ्या सोनेरी पंख या कविता संग्रहातील कवितेच्या चार

***"ओळी येथे आठवतात***

***"सुखाचा शोध घेतात सारे***
***दुःख मनाचे सगे -सोयरे***
***वास्तव सदा घरात असावे***
***या सुखांनो मिळून सारे"***

माणूस नेहमी सुखाचा शोध घेत असताना आपण पाहतो. प्रत्येकाच्या अवतीभवती अगदी घरातच सुख फिरत असते परंतु आपण त्या दृष्टीने पाहत नाही, आणि लक्षही देत नाही. या व्यतिरिक्त इतरत्र सुखाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. माणसाच्या जीवनात सुख आणि दुख हे तर " सगे -सोयरे "आहेत. याची जाणीव आपणास वेळोवेळी होत असते. कोणत्याही व्यक्तीला जेव्हा दुःख होते तेव्हा तो मागील दुःखाच्या गोष्टींची आठवण काढून स्वतःला त्रास करून घेत असतो.

**"सुख पाहता जवा पाढे**
**दुःख पर्वताएवढे!"**

या उक्ती प्रमाणे सुख दुःखाची अनुभूती आपणास येत असते. प्रसन्न चित्ताने राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस त्यांनी केलेल्या प्रत्येक कार्यात आनंद व सुख अनुभवास मिळते .अशा व्यक्तींच्या जीवनात नेहमी आनंदाचे व सुखाचे पर्व घरातच नांदत असते. म्हणून आठवणीच्या व आनंदाच्या पानात नेहमी सुखाची कल्पना करत राहावे . दुःख जरी आले असले तरी दुःखाला पर्वताएवढे न मानता जवा एवढे मानले पाहिजे! म्हणजे आपणास वेदना होणार नाहीत. थोर पुरुषांच्या केलेल्या कार्याचा गौरव व त्यांनी केलेले कार्य या बाबींची आठवणआपण नेहमी करत असतो. अशा आठवणी मधून आपण काहीतरी जीवनमूल्य शिकत असतो. जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहत असतो .जेव्हा प्रत्येक व्यक्ती स्वतःकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे सुरू करेल तेव्हा त्याची विचारसरणी पण सकारात्मक होताना दिसून येईल! आठवणीच्या वेगवेगळ्या क्षणाचा आपण अनुभव घेतला तर निश्चितच आनंदाचे क्षण अनुभवास मिळतात. आनंदाचे पान कसे चांगल्या गोष्टीने भरलेले आहे हे आपणास दिसून येईल! आठवणीचा पक्षी हा नेहमी आठवणीचे पंख लावून निरंतर आकाशी झेप घेत असतो परंतु तशा आठवणी मनाच्या पटलावर नेहमीच लिहिल्या जातात. एखाद्या व्यक्तीची आठवण काढणे, किंवा मागील घडलेल्या गोष्टींची आठवण येणे ही एक सहजासहजी घडणारी घटना आहे. कोणत्याही आठवणीमध्ये रमान होणे ही एक मनाची अवस्था आहे, ते चिंतन आहे, मनन आहे. त्यानुरूप आपण आठवणी काढून मनाचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करत असतो. एखाद्या घडलेल्या गोष्टींची आठवण होणे, जवळच्या मित्राची आठवण होणे, मित्रांनी अडीअडचणीमध्ये केलेल्या मदतीची आठवण होणे, दुःखाच्या प्रसंगी धावत पळत येणा-या व्यक्तींची आठवण होणे ह्या अशा गोष्टींचा अनुभव आपणास वारंवार होणे साहजिक आहे. आपल्यावर जीवापाड प्रेम करणारी व्यक्ती ,आपल्या भावना समजून घेणारी व्यक्ती, आपल्या चांगल्या वाईट क्षणाची साक्षीदार असणारी व्यक्ती अशा व्यक्तींची आठवण येणे हे साहजिकच आहे. आणि त्या गोष्टी नेहमीच आठवणीत राहतात. लहानपणी आपल्या छोट्या छोट्या गोष्टीकडे लक्ष देणारे आई-वडील, आपणास नेहमीच आठवतात. आपल्या हातून एखाद्या वस्तूचे नुकसान झाले तरी आपणास समजावून सांगणारी आई ,आपला आत्मविश्वास वाढवणारे वडील, आपल्याला नेहमीच आदर्श रूपाने आयुष्यामध्ये आठवत असतात .अचानक एखाद्याच्या घरी आपला होणारा आदर, आपल्याला दिला जाणारा मानसन्मान ,आपण कधीही विसरत नाही .तशा गोष्टीची आठवण येणे हे साहजिक मनाची वृत्ती आहे !

सुखी व समाधानी आयुष्य प्रत्येकालाच हवे असते. दुःखाची थोडीशी पण छाया पडली तर माणूस आकांड तांडव करत असतो .दुःखाची आठवण प्रत्येकालाच येत असते व त्या आठवणी काढून तो दुःखी होत असतो .परंतु जीवनात सुखाच्या व आनंदाच्या घटना घडून जातात परंतु माणसास त्या क्षणाचा विसर विसर पडत जातो.काही आठवणी काढल्यानंतर आपण मनस्वी आनंदी होतो .आपले मन प्रसन्न होते .चेहऱ्यावरती प्रफुल्लितपणा दिसून येतो. आणि अशा आठवणींमध्ये माणूस तल्लीन होउन प्रसन्न चित्ताने वावरत असतो..!



# जिल्हाधिकाऱ्यांकडून ईव्हीएम ठेवण्यासाठी स्ट्रॉंगरुम जागेची पहाणी

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्हयाचे जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्याकडून नेवासा येथील आय टी आय मधील ईव्हीएम ठेवण्यासाठी स्ट्रॉंगरुम जागेची पहाणी करण्यात आली. या प्रसंगी जिल्हाधिकारी सालीमठ यांनी महत्वपूर्ण सूचना प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या. नेवासाफाटा जवळील कडा कॉलनीजवळ असलेल्या आय टी आय मधील प्रांगणातील असलेल्या इमारतीमध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी ईव्हीएमसाठी स्ट्रॉंग रूम निश्चित केली आहे.येथे ईव्हीएम मशीन ठेवल्या जातात म्हणून येथील जागेची पहाणी नुकतीच जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केली यावेळी त्यांनी तहसीलदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांशी सुसंवाद साधून सुरक्षेच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या यंत्रणेबाबत त्यांनी महत्वपूर्ण अशा सूचना केल्या.

यावेळी झालेल्या पहाणीच्या प्रसंगी जिल्हयाच्या पुरवठा अधिकारी हेमलता बडे,नेवासा तालुक्याचे तहसीलदार डॉ.संजय बिरादार,निवडणूक निर्णय अधिकारी अरुण उंडे,निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार किशोर सानप,सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता सुरेश दुबाले,नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव,तलाठी कार्यालयाचे अशोक गाडेकर यांच्यासह प्रशासकीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



## अमरावतीत ३४८ कोटींचा जमीन लीज घोटाळा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** अमरावतीमधील ३४८ कोटी रुपयांच्या जमीन लीज घोटाळ्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासन, महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांना याप्रकरणी जबाब नोंदविण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात यथास्थिती ठेवण्याचा आदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली होती.
सर्वोच्च न्यायालयात याचिकेवर न्यायमूर्ती सूर्यकांत व के. व्ही. विश्वनाथन यांच्यासमक्ष सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांमध्ये माजी नगरसेवक महेंद्र ऊर्फ मुन्ना राठोड, रामकृष्ण सोलंके, प्रवीण डांगे व समीर जवंजाळ यांचा समावेश आहे.
उच्च न्यायालयाने त्यांची यासंदर्भातील याचिका २८ जुलै २०२३ रोजी फेटाळली होती. महानगरपालिकेने मल्टीप्लेक्स बांधण्यासाठी नांदेड येथील शंकर कन्स्ट्रक्शनला बडनेरा रोडवरील नवाथे चौकातील ७ हजार ४४२ चौरस मीटर जमीन केवळ १२ कोटी रुपयांमध्ये ३० वर्षांच्या लीजवर दिली आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे ३४८ कोटी रुपयांचे नुकसान झाले, असा आरोप याचिकाकर्त्यांने केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी आणि लीज करार रद्द करण्यात यावा, अशी मागणी याचिकाकर्त्यांने केली आहे.

## होळीच्या तोंडावर सोन्याचे दर घसरले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नागपूरसह राज्यात सोन्याचे दर सातत्याने वाढत होते. २१ मार्चला हे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम चक्क ६७ हजार ३०० रुपये नोंदवले गेले होते. या दरात मोठी घसरण झाली आहे. त्यामुळे होळीच्या तोंडावर शनिवारी नागपुरात सोन्याचे दर ६६ हजार ४०० रुपये प्रति दहा ग्राम नोंदवले गेले. २४ कॅरेट सोन्याचे दर नागपुरात २१ मार्च २०२४ रोजी प्रति दहा ग्रामसाठी ६७ हजार ३०० रुपयेपर्यंत पोहचले होते. सराफा बाजारात सोन्याचे दर २२ कॅरेटसाठी ६२ हजार ६००, १८ कॅरेटसाठी ५२ हजार ५०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४३ हजार ७०० रुपये होते. तर चांदीचा दर प्रति किलो ७६ हजार रुपये होते.

## राजेंद्र थोरात यांची तिसऱ्यांदा एमडीआरटी पुरस्कार विमा परिषदेसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज




**कर्जत :** कर्जत येथील विमा एजंट राजेंद्र थोरात यांना भारतीय जीवन विमा श्रीगोंदा शाखेत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल एमडीआरटी हा बहुमान तिसऱ्यांदा मिळाला असून त्यांना हा पुरस्कार पुणे येथे नुकताच पार पडलेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार राजेंद्र थोरात व पत्नी सौ जयश्री थोरात यांनी स्विकारला.

यावेळी पुणे विभागाचे वरिष्ठ मंडल प्रबंधक संदीप मोघे, विपणन प्रबंधक उदय सुंदर, ब्रेकर प्रबंधक केकर जवळेकर, शाखाधिकारी प्रवीण कुलकर्णी, विकास अधिकारी अशोक गदादे, प्रदीप चव्हाण उपस्थित होते. राजेंद्र थोरात हे अनेक वर्षांपासून विमा क्षेत्रात काम करीत असून विमा कंपनीच्या अनेक योजना सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचवून लोकांना विमा कंपनीत वेगवेगळ्या योजनेत जनतेचा सहभाग वाढवून चांगली व तत्पर सेवा देवून ठेवीदारांना त्याच्या पैशाची विश्वासार्हता ची हमी देवून विमा कंपनी च्या ठेवी वाढविण्याचे प्रमाणीक काम केल्यानेच राजेंद्र थोरात यांना तिसऱ्यांदा मानाचा एमडीआरटी हा पुरस्कार मिळाला असून विमा क्षेत्रात अतिशय उत्कृष्ट काम केल्यानेच विमा कंपनी ने अमेरिकेत होणाऱ्या विमा परिषदेसाठी त्यांची निवड केली आहे.

## शेकडो वर्षे गुलामीत जगणाऱ्यांसाठी शहाजीराजांनी स्वराज्याचे स्फुल्लिंग पेटवले : अनिता काळे



आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** भिस्तबाग येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या मातीत घडलेला भोसले कुटुंबातील पूर्वजांचा पराक्रम व स्वराज्य निर्मितीच्या इतिहास उलगडण्यात आला.
प्रारंभी शहाजीराजे भोसले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका अनिता काळे, सहशिक्षिका शितल आवारे, सुरेखा वाघ आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
अनिता काळे म्हणाले की, शेकडो वर्षे गुलामीत जगणाऱ्यांसाठी शहाजीराजे भोसले यांनी स्वराज्याचे स्फुल्लिंग पेटविले आणि ते अथक परिश्रमाने पुर्णत्वास आणले. जगातील सर्वश्रेष्ठ पिता म्हणून ज्यांचा उल्लेख करावा असे पराक्रमी पण इतिहासात दुर्लक्षित राहिलेले महापुरुष म्हणजे शहाजीराजे. स्वराज्यासाठी पिता म्हणून ते शिवरायांच्या मागे उभे राहिल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना इतिहासात देशभर व राज्यभरात पसरलेले भोसले घराण्याच्या पराक्रमाची माहिती व पूर्वजांचा इतिहास उलगडून सांगण्यात आला.

## नेवासा येथे हिंदू नाथपंथी डवरी गोसावी प्रीमियर लीगच्या क्रिकेट स्पर्धेला उत्साहात प्रारंभ

### युवा पिढीने मैदानी खेळाकडे वळावे : स्वामी श्री रमेशानंदगिरीजी महाराज

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** येथील कॉलेज जवळ असलेल्या प्रांगणात हिंदू नाथपंथी डवरी गोसावी प्रीमियर लीगच्या वतीने चषक क्रिकेट स्पर्धेला त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते प्रारंभ झाला भावी पिढी सक्षम होण्यासाठी व्यायामाला अंगिकारून युवा पिढीने मैदानी खेळाकडे वळावे, असे आवाहन स्वामी श्री रमेशानंदगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलताना केले.

स्पर्धेचे उदघाटन प्रसंगी त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज, पंचायत समितीचे माजी उपसभापती किशोर जोजार, मुकिंदपुरचे सरपंच सतीशदादा निपुंगे, आदर्शगाव सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ, उपसरपंच नाथा बाबर, राजेंद्र उंदरे, होमगार्ड समादेशक पत्रकार बाळासाहेब देवखिळे, प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष पत्रकार सुधीर चव्हाण, मधुकर सरगैय्ये, सामाजिक कार्यकर्ते शत्रुघ्न गव्हाणे,विठ्ठलराव पाषाण, भीमराव चव्हाण,शिवाजी वाळके,भागचंद पाडळे, जिजा उभेदळ,साहेबा सावंत,फरीद शेख, बाबा शिंदे, पिराजी शिंदे,दया सावंत,शिवराम सावंत, विजय बाबर, विजय उभेदळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

दोन दिवसांच्या कालावधीत या क्रिकेट स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी तीस हजाराचे पहिले बक्षीस ठेवण्यात आले असून द्वितीय बक्षीस पंधरा हजार रुपयांचे ठेवण्यात आले आहे. सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ, सामाजिक कार्यकर्ते शत्रुघ्न गव्हाणे, डॉ.प्राजक्ता अर्जुन बाबर, अभिषेक बाबर, सामाजिक कार्यकर्ते आकाश गव्हाणे, संग्राम बाबर यांच्या पुढाकाराने ही बक्षिसे ठेवण्यात आली आहे.
या स्पर्धेसाठी जिजा उभेदळ यांच्या वतीने सलग तीन षटकारासाठी ११००/-रुपये,तर भागचंद पाडळे यांच्याकडून सलग तीन विकेट हॅट्रिकसाठी ११०० रुपये बक्षिसे देण्यात येणार असून मॅन ऑफ द मॅच ठरणाऱ्या खेळाडुला चषक देण्यात येणार आहे.
स्पर्धा यशस्वीतेसाठी विजय बाबर, राजेंद्र शिंदे, संतोष सावंत, संतोष शिंदे, संजय बाबर,अक्षय शेगर, ज्ञानेश्वर शिंदे, गणेश सावंत, सागर शिंदे, अक्षय सावंत हे उत्कृष्ट नियोजन करत आहे.

# नेवासा येथील असंख्य कार्यकर्त्यांचा शिंदे गटात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** येथील उध्दव ठाकरे गटाचे समर्थक जेष्ठ शिवसैनिक विधी तज्ञ अँड के एच वाखुरे व भाऊसाहेब वाघ यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शुक्रवारी दि.२२ मार्च रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार सदाशिव लोखंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात मुंबई येथे प्रवेश केला. प्रवेश केलेल्या मध्ये जुन्या शिवसैनिकांचा समावेश आहे. मुंबई येथे शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणाऱ्यामध्ये मराठा आंदोलनात नेवासा तालुक्यात नेतृत्व करणारे अ‍ॅड. कारभारी वाखुरे, जेष्ठ शिवसैनिक भाऊसाहेब वाघ, प्रकाश निपुंगे, संतोष माळवे, संजय शिंदे, अ‍ॅड. बाळासाहेब कावळे, अ‍ॅड. हर्षल गोरे,अ‍ॅड. एम के वाखूरे, संदीप जाधव, वासुदेव जाधव, प्रकाश गरुटे, अमोल मोरे, सुनील शिरसाठ, सुनील काळे, गणेश चौगुले, नितीन मिरपगार,नेवासा बुद्रुकचे युवा उद्योजक अजय डौले, विठ्ठल नेहे, निलेश डौले, सुरेश वाकचौरे, राजेंद्र तांबे, किशोर गादे, रोहिदास सुरशे, चांगदेव माने यांचा समावेश आहे.

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी कुणबी दाखले व मराठा आरक्षण तसेच समाजाच्या इतर प्रश्नांबाबत जी संवेदनशीलता आणि सकारात्मकता दाखवली आणि आतापर्यंतच्या मुख्यमंत्र्यांमध्ये सर्वोत्तम प्रयत्न केले त्याचबरोबर सर्वच समाज घटकांना न्याय देण्याचे काम ते करीत आहेत.यामुळेच आम्ही एकनाथजी शिंदे यांना साथ देण्यासाठी शिवसेनेत प्रवेश करीत आहोत अशी भूमिका या सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रवेश करताना मांडली.

या सर्वांचं स्वागत मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते बुके व भगवा ध्वज देऊन करण्यात आले. शिवसेनेत आल्याबद्दल मुख्यमंत्री यांनी सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून स्वागत व करत त्यांना पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी या सर्व शिवसैनिकांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी खासदार सदाशिवराव लोखंडे,शिवसेनेचे प्रवक्ते संजीव भोर पाटील,शिवसेना महिला आघाडीच्या तालुका अध्यक्ष मीराताई गुंजाळ व इतर पदाधिकारी उपस्थित होते.





# हॉटेल चालकाच्या खुनाचा उलगडा करण्यात नेवासा पोलिसांना यश

## पन्नास पैशाच्या पोस्ट कार्डमुळे लागला तपास

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** पोलीस ठाण्याच्या हद्दीत नेवासा-श्रीरामपूर तालुक्याच्या सीमेवरील कारवाडी गावच्या हद्दीतील ओम साई हॉटेल चालक बाळासाहेब तुवर यांच्या खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्यात नेवासा पोलीसांना यश आले असून खुनाच्या गुन्हयातील तपासात श्वानाची मोठी मदत झाली असल्याचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी सांगितले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की कारवाडी गावच्या हद्दीत ओम साई या हॉटेलचे चालक बाळासाहेब सखाहरी तुवर वय ६० वर्षे रा. पाचेगाव यांच्यावर मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने डोक्यावर कोणत्या तरी टणक वस्तूने प्रहार करून खून केल्याचा प्रकार दिनांक १३ मार्च २०२४ रोजी उघडकीस आला होता. याबाबत पोलीस ठाणे नेवासा येथे गु.र नं. २५१/२०२४ भा.द.वि. क.३०२ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास पोलिस ठाणे नेवासा प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक धनंजय जाधव हे करीत होते.
गुन्ह्याच्या तपासकामी पोलिसांनी आव्हान स्वीकारून स्थानिक पोलीस स्टेशनकडील पाच पथके व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील एक पथक असे एकूण सहा पथके मागील नऊ दिवस-रात्र तपास करीत होते.
तपासाच्या दरम्यान पोलिसांना मिळालेल्या वेगवेगळ्या ३४ प्रकारच्या इन्फॉर्मेशनवर मागील नऊ दिवस पोलीस तपास पडताळणी करीत होते. गुन्ह्याच्या संबंधाने जवळपास १२० लोकांकडे तपासणी करण्यात आली होती.घटनास्थळापासून साधारण ३०० मीटर अंतरावर असलेल्या पेट्रोल पंपावरील रात्रीच्या वेळचे अस्पष्ट आणि अंधुक सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी करताना घटनेच्या दिवशी मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास एका व्यक्तीची आणि श्वानाची हालचाल पोलिसांना दिसून आली होती. पोलिसांनी तपासा दरम्यान सदर अंदाजे ३० वर्षे वय असलेली व्यक्ती आणि श्वान हाच केंद्रबिंदू निश्चित करून मागील नऊ दिवस त्यावरच तपास केला होता.

**श्वान बनला तपासाचा धागा दुवा :** पोलिसांनी आज पोपट सुदाम सूर्यवंशी या व्यक्तीस सिताफिने ताब्यात घेऊन पॉलिसी भाषेत विचारपूस केली असता सुरुवातीस त्याने असे काही केले असल्याबाबत नकार दिला . परंतु पोलिसांच्या चाणाक्ष बुद्धीने त्यास विचारपूस केली असता पोपट हा पोपटासारखा बोलू लागला . आरोपी पोपट सुदाम सूर्यवंशी रा . कारवाडी याने सदर खून केल्याबाबतची कबुली दिली व जागा दाखवली . काही दिवसापूर्वी मृतक हा चिकन घेऊन दुसऱ्या घरी बनवण्यास घेऊन जात असताना मृतक याची आरोपी बरोबर भेट झाली होती . त्यादरम्यान त्यावेळी तू दुसऱ्याच्या घरी चिकन बनवायला का घेऊन जातो यावरून आरोपी आणि मृत्यूकचा वादविवाद झाला होता त्यावेळी मृतकने आरोपीस मारहाण केली होती . याचा राग मनात धरून आरोपीने त्याचा काटा काढायचे ठरवले होते . मंगळवारी 13/3/2024 रोजी घटनेच्या दिवशी आरोपी हा मृतक यांच्या हॉटेलवर गेला तेथे त्याने मृतकच्या डोक्यामध्ये दगडाने घाव केले आणि तेथून तो पळून गेला अशी कबुली त्याने दिली आहे .

तपासामध्ये अशी वय वर्ष 30 असलेली कोणती व्यक्ती आहे की मृतकचा सदर व्यक्तीशी वाद भांडण वितृष्ट होते आणि सदर व्यक्तीकडे श्वान ( कुत्रा ) आहे याच्यावर लक्ष केंद्रित केले होते.सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपी काही व्यक्तींना नक्की माहिती असणार आहे हे तपाशी अधिकारी धनंजय जाधव पोलीस निरीक्षक जाणून होते. परंतु सदर व्यक्ती समोर येण्यास भीत घाबरत असल्याने पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी पोस्टातून ५० पैशाचे १०० कार्ड विकत घेऊन त्या कार्डावर स्वतःचे नाव आणि पत्ता स्वतःच लिहून सदरचे कार्ड कारवाडी आणि पाचेगाव शिवारामध्ये वाटप करून आपल्याला आरोपी माहीत असल्यास या कार्डवर फक्त आरोपीचे नाव लिहून सदरचे कार्ड आपण कोणत्याही पोस्ट पेटीत टाकावे असे आवाहन केले होते. या आवाहनाला नागरिकांनी प्रतिसाद देऊन कार्डद्वारे सदरचा खून पोपट सुदाम सूर्यवंशी या व्यक्तीने वैयक्तिक भांडणातून केला असल्याबाबत माहिती दिली होती.

# बारा लाखांचा प्रतिबंधित गुटखा पकडला; फर्दापूर पोलिसांची सर्वात मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** फर्दापूर येथे दि.२२/३/२४ रोजी मध्यरात्री सुमारास प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक केली जात असल्याचे गुप्त माहिती मिळाल्यानंतर अपर पोलीस अधीक्षक पथकाने सापळा रचून तब्बल १२,६०,४६०/-रुपयाचा सुंगधीत गुटखा व वाहन जप्त करण्यात आले.सुदाम धर्मराज शिरसाट वय 35 वर्ष व्यवसाय नौकरी सहायक पोलीस निरीक्षक, विशेष पथक, जिल्हा नियंत्रण कक्ष, संभाजीनगर ग्रामीण, सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, आम्ही सध्या मा. पोलीस अधिक्षक साहेब यांचे विशेष पथक मध्ये काम करतो.आम्ही सोबत पोहेकों/613 एल.मी. कोल्हे, पोना/573 एस. एस. सोनवणे, असे जिल्हा नियंत्रण कक्ष छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथून नोंद नंबर-17 वेळ 18.10 वाजता प्रमाणे छाती संभाजीनगर ग्रामीण जिल्हयामध्ये अवैध धंद्याची माहीती काढून केरोल करणेकामी रवाना झालो होतो, आम्ही फर्दापूर पोलीस ठाणे हद्यीमध्ये असतांना आम्हास गुप्त बातमीदारांमार्फत माहीती मिळाली की, सिल्लोड से जळगाव रोडने जळगाव कडून एक ग्रेरंगाची इनोव्हा गाडी चारचाकी वाहन क्रमांक एमएच-13-एसी-5052 हि मध्ये अवैध रित्या गुटखा व तत्सम पदार्थ घेवुन छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने येत आहे. अशी खात्रीलायक माहीती मिळाल्याने आम्ही पंचनाम्यातील नमुद दोन पंचाना बोलावुन त्यांना मिळालेली माहीती सांगुन कारवाई करतांना सोबत पंच म्हणून हजर राहण्याची विनंती केली असता दोन्ही पंचानी पंच म्हणून हजर राहण्याची संमती दर्शविली. तसेच फर्दापूर पोलीस ठाण्याचे सपोनि प्रफुल्ल साबळे, उपनिरीक्षक सुग्रीव चाठे व पोलीस अंमलदार पोकों विनोद कोळी व प्रकाश कोळी यांना मदतनीस बोलावुन आम्ही सर्वांनी पोलीस स्टाफ व दोन्ही पंचानी निळुन जळगाव ते अजिंठा रोडवर हॉटेल राजस्थानी ढाब्याजवळ लेणीचे समोर थांबलो. मिळालेल्या माहीती मधील चारचाकी वाहन बारा वाजता भरधाव वेगाने येतांना दिसले, आम्ही सदर वाहन चालकास हातातील लाठीने व बॅटरीचे उजेडाने थांबवण्याचा इशारा केला असता त्याने त्याचे वाहन थांबविले. आम्ही सदर वाहन चालकास आमचे पोलीस ओळखपत्र दाखवुन परिचय करून देवुन त्यास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव चालकाने त्याचे नाव अनिल भाऊसाहेब भोजने, वय 32 वर्ष रा. जामखेड ता. अंबड जि. जालना,असे असल्याचे सांगीतले. आम्ही सदर वाहनामध्ये सोबतच्या पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामधो खालील वर्णनाचा व किंमतीचा माल मिळुन आला त्याचे वर्णन व किंमत खालीलप्रमाणे, 1) 2,30,400-00 रुपये- 04 मोठे पोते, प्रत्येक पोत्यात 12 पिशव्या, प्रत्येक पिशवीत 25 पुडे, असे एकूण 1200 पुढे, त्यावर राजनिवास असे लिहिलेले,प्रत्येकी पुडा विक्री किंमत 192/-रुपये प्रमाण एकुण 2,30,400- रुपये,2) 1,64,160-00 रुपये हिख्या रंगाचे रजनीगंधा पान मसाला असे लिहीलेले 80 बॉक्स प्रत्येक एका बॉक्सची किंमत 2052 रुपये प्रमाणे एकुण 1,64,160/-रुपये.3) 58,800-00 रुपये- हिरव्या रंगाचे रजनीगंधा पान मसाला असे लिहीलेले 40 बॉक्स (लहान) एका बॉक्सची किंमत 1470/-रुपये प्रमाणे एकुण 58,800/-रुपये. अशा तोटल १२,६०,४६०/००रुपयाचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला आहे.पुढील तपास सपोनि प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. यात वाहनासह १२ लाख साठ हजार ४६० मुद्देमाल जप्त करण्यात आला या कारवाईमुळे अवैध गुटखा माफीयांचे धाबे दणाणले आहे.



# ५०० रुपयांसाठी केली हत्या; जन्मठेपेची शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** अवघ्या ५०० रुपयांसाठी तरुणाची हत्या करणाऱ्या आरोपीला नागपूर सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. सत्र न्यायालयाचे न्यायाधीश राहुल भोसले यांनी हा निर्णय दिला. प्रभाकर सूर्यभान मेश्राम ( वय ५४) असे आरोपीचे नाव असून तो सिद्धार्थनगर, टेका येथील रहिवासी आहे. सदर घटना पाचपावली येथील आहे. मृताचे नाव विक्की ऊर्फ विठ्ठल सिद्धार्थ बागडे होते. तो सिद्धार्थनगरातच राहत होता. आरोपीने विक्कीला ५०० रुपये उधार दिले होते. विक्कीने ते पैसे परत केले नाहीत.१७ मे २०२० रोजी रात्री नऊच्या सुमारास आरोपीने नेहमीप्रमाणे विक्कीला पैसे परत मागितले. विक्कीने त्याला सध्या पैसे नसल्याचे उत्तर दिले. त्यामुळे आरोपीने चिडून विक्कीवर चाकूने हल्ला केला.

# भूसंपादन प्रकरणी उपोषण करण्याचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** जायकवाडी प्रकल्प अंतर्गत भूसंपादन प्रकरणी कोर्टाच्या वाढीव पेमेंटच्या निकालाचा आदेश होऊन १३ वर्षे झाली तरी व्याजासह पैसे न दिल्याच्या निषेधार्थ व कोर्टाचा आवमान केला म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयासमोर दि.२७ मार्च रोजी आमरण उपोषणासाठी आपल्या कुटुंबासह बसत असल्याचा ईशारा नेवासा तालुक्यातील खेडलेकाजळी येथील शेतकरी रामदास कोरडे यांनी दिलेल्या निवेदनात दिला आहे. कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग संभाजीनगर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की जायकवाडी प्रकल्प अंतर्गत भूसंपादन प्रकरण क्र. LAOSR NO ०२/८५ भूसंदर्भ क- ०४/२०११ ते ०८/२०११ LOR प्रकरण मौजे खेडले काजळी ता. नेवासा जि-अहमदनगर कोर्टाच्या वाढीव पेमेंटच्या निकालाचा आदेश होऊन १३ वर्षे झाली तरी व्याजासह पैसे न दिल्या बददल आपण कोर्टाचा आवमान केला आहे. म्हणून आम्ही आपल्या कार्यालयासमोर दि. २७/०३/२०२४ रोजी उपोषनासाठी बसत असल्याचे म्हटले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की संबंधीत जमीनीचे आमचे पेमेंट होत नाही तोपर्यंत दरमहा लाखो रु. पगार घेणाऱ्या संबंधीत आधिकाऱ्यांचे पगाराचे पेमेंट बंद करण्यात यावे. अधिकाऱ्याने कोर्टाच्या आदेशाचे पालन केले नाही. गेल्या १३ वर्षापासून आम्ही संबंधीत कार्यालयाला, अधिकाऱ्यांना, अर्ज देऊन समक्ष भेटी घेतल्या. परंतु ते एकमेकांच्या कार्यालयाचे नाव दाखवतात व धरणग्रस्त जेष्ठ नागरिकांचा छळ करीत आहे. आमचे उदरनिर्वाहाचे साधन प्रकल्पात्त गेल्यामुळे आमचे आतोनात हाल होत, आहेत. संबंधीत कर्यालयातून पैसे दिल्याशिवाय काम होणार नाही असे आप-सात म्हणतात व टाळाटाळीची उत्तरे देतात. जोपर्यंत आमचे १५% प्याजासह आणि ३०% टक्के रक्कम सह पेमेंट होईपर्यंत या प्रकरणाशी संबंधीत आधिकाऱ्याच्या पगाराचे पेमेंट बंद करण्यात यावे अशी मागणी केली आहे.उपोषण आंदोलनमुळे आमचे काही बरे-वाईट झाल्यास सर्व संबंधीत अधिकारी त्यास जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी, यापुर्वी मी संबधीत खात्याला शेकडो पत्र दिलेले आहे. व त्या संदर्भात पेमेंट १ महिन्यात आम्ही करतो असे उत्तरही आलेले आहे. तरी अदयापपर्यंत कार्यवाही केलेली नाही व पेमेंटही केलेले नाही. त्यामुळे आमची उपासमार होत आहे.

# वसुली जोमात; पण वर्षभरापासून गावात वायरमनचा पत्ताच नाही

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील विद्युत महावितरण कंपनीचे वायरमन नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे वडोद बाजार येथे जवळपास 5000 लोकसंख्येचे गाव असलेले त्यामध्ये जवळपास एक वर्षापासून या गावाला वायरमन नसून एवढी मोठी लोकसंख्याच गाव आऊटसौर  गजानन लहाने यांच्या भरोशावर चालत असून त्यामध्ये विद्युत महावितरण कंपनीची लाईन रामभरोसे चालत असून विद्दित महावितरण कंपनीचा पुरवठा खंडित होत असून तर मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान सुरू असून कधी कधी लाईन गुल होऊन जाते मात्र बिल वसुली सक्तीची चालू असून त्यामध्ये वडोद बाजार येथील जवळपासझाले एक वर्षापासून विद्युत महावितरण कंपनीचा पर्मनंट वायरमन नसून विद्युत महावितरण कंपनी वायरमन का देत नाही सर्वकाही आऊटसौर यांच्या भरोश्यावर  वर्षाभर  का चालत असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे तरी विद्युत महावितरण कंपनीचे वरिष्ठ अधिकारी यांनी दखल घेऊन सनी वडोद बाजार येतील एवढे मोठे लोकसंख्येचे गाव असून वायरमन देण्याची मागणी नागरिकांमध्ये होत आहे.

# अरीबा पठाण, मताशा पठाणचा पहिला रोजा

आधुनिक केसरी न्यूज





**पैठण :** शहरातील दारुस्सलाम भागातील मुफीद पठान यांची मुलगी अरिबा फातिमा वय ८ वर्षे तसेच मताशा हिफजुर रहेमान पठान यांची मुलगी मताशा वय ८ वर्षे यांनी दोघीनीही शुक्रवार दि. २२ रोजी इस्लाम धर्मातील पवित्र रमजान महिन्यातील रोजा (उपवास) पूर्ण केला आहे. अरीबा पठाण ही पत्रकार मुफीद पठाण यांची मुलगी व मताशा पठाण ही पुतणी असून दोघींनी ही  जीवनातील पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल अरिबा व मताशाचे आई-वडील, काका- काकी आजी, मामा-मामी, आत्या-काका आदींनी तिला शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.

# मनोज जरांगे पाटील यांची संवाद बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** मराठा आरक्षणाच्या प्रबोधनासाठी व लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर वांबोरी (जि.अहमदगनर) येथे मनोज जरांगे पाटील यांची संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी हे शेवगाव येथून जात असतांना त्यांनी सकल मराठा समाज समिती पदाधिकारी व नागरीकांची भेट घेतली. यावेळी जरांगे पाटील यांचे शहरामध्ये ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले.  मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी समाजामध्ये  प्रबोधन करण्यासाठी व लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर अनेक ठिकाणी दौरा आयोजीत केला आहे. जरांगे यांचे वांबोरी व पारनेर येथे आज शनिवार ता.२३ रोजी संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी जरांगे हे शेवगाव - मिरी मार्गे वांबोरीकडे निघाला होते.
त्यांचे शेवगाव शहरात आगमन होताच आंबेडकर चौकात सकल मराठा समाजाच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी जरांगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी सकल मराठा समाजाचे पदाधिकारी बापुसाहेब गवळी, विजय देशमुख, संजय फडके, विष्णू  घनवट, निलेश बोरुडे, शरद जोशी, सर्जेराव तानवडे, माऊली खबाले, किशोर कापरे, गोटू घनवट, सामनगावचे सरपंच आदिनाथ कापरे, कृष्णा सातपुते यांनी त्यांचे स्वागत केले. तर आबासाहेब काकडे विदयालयासमोर चंद्रकांत लबडे,  सिध्दार्थ काटे , अमोल भवार, दादा रसाळ,कल्याणे घोणे, सनी शिंदे, साम साळुंके, रोहीत पायघन, शंकर मुळे, सुरेश कोरडे, देविदास लबडे, दादा शितोळे, मंगेश म्हस्के आदींनी त्यांचे स्वागत केले.  जरांगे हे मिरी मार्जे जात असतांना ग्रामिण भागामध्ये त्यांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.






# नांदेड जिल्हा शिवसेना उपप्रमुखपदी बिल्लेवाड

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :**  येथील पंचायत समितीचे माजी उपसभापती सूरेशभाऊ बिल्लेवाड यांनी मागील काही दिवसांपूर्वी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन शिवसेना (शिंदे गटात) प्रवेश केला होता. गूरूवारी (ता.२१) मुंबई येथे पक्षाचे सचिव संजय मोरे यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार नांदेड जिल्हा शिवसेना उपजिल्हाप्रमुख म्हणून श्री.बील्लेवाड यांची निवड केली आहे.
मागील अनेक वर्षांपासून सुरेश बील्लेवाड हे सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत.पुर्वी काही काळ त्यांनी शिवसेनेत काम केल आहे. पंचायत समितीच्या निवडणुकीत ते अपक्ष म्हणून विजयी झाले.कॉग्रेस पक्षानी त्यांचा पाठिंबा घेऊन पंचायत समितीवर झेंडा फडकावला आणि श्री.बील्लेवाड यांची उपसभापती म्हणून वर्णी लागली.काँग्रेस पक्षानी  त्यांना विश्वासात घेतले नसल्याने मागील काही दिवसांपूर्वी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन शिवसेना (शिंदे गटात) प्रवेश केला. वरीष्ठानी लगेच त्यांना नांदेड जिल्हास्तरावर काम करण्याची संधी दिली. गुरूवारी (ता.२१) मूंबई येथे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार  व संजय मोरे (शिवसेना सचिव ), माजी खासदार शिवसेना उपनेते हेमंत पाटील.
आनंद जाधव( मराठवडा संपर्क प्रमुख नांदेड.हिंगोली),
सिद्धार्थ दूधवानकर (सह संपर्क प्रमुख नांदेड),जिल्हा प्रमुख आनंद बोंडारकर यांच्या मार्गदर्शनाखाली  सुरेश बिल्लेवाड रायखोडकर यांची नांदेड उपजिल्हा शिवसेना प्रमुख पदी निवड करण्यात आल्याचे पत्र देण्यात आले आहे. यावेळी जिल्हा प्रमुख उमेश मुंडे ,संतोष कपाटे (तालुका प्रमुख अर्धापूर).शिवराज बोंडारे (महानगर संगठक नांदेड),विकास देशमुख (युवा सेना उप जिल्हा प्रमुख नांदेड).प्रकाश कोणारे उद्योजक मुंबई यांची उपस्थिती होती.निवडीचे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कारासाठी ग्रंथ पाठवण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज



**अहमदनगर :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार यांच्या वतीने दरवर्षी करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार २०२३ साठी पुस्तके ,ग्रंथ मागविण्यात येत आहेत अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष श्री. रामचंद्र दरे साहेब  तसेच संस्थेचे सचिव व भांडाराचे सभापती जी.डी .खानदेशे साहेब यांनी दिली . या राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारासाठी लेखक, प्रकाशक यांनी आपले ऐतिहासिक ग्रंथ, कथा संग्रह ,कविता संग्रह, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, ललित, वैचारिक ,कृषी, बालसाहित्य ,प्रवास वर्णन, निबंध, समीक्षा, अनुवादित, संपादित, शैक्षणिक संशोधन, आदी सर्व प्रकारच्या साहित्यकृती पात्र राहतील सदर पुस्तक हे १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या दरम्यान प्रकाशित झालेले असावे. लेखक प्रकाशकांनी पुस्तकाच्या तीन प्रती अल्पपरिचय ,पासपोर्ट साईज आकाराचे फोटो, सह  पुस्तके ३० जून २०२४ पर्यंत पुस्तके पाठवावेत तसेच प्रकाशकांसाठी सुद्धा उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार देण्यात येणार आहे प्रकाशकांनी आपल्या उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कारासाठी पाठवाव्यात. **पुस्तके  ग्रंथ पाठविण्याचा पत्ता :** कार्यकारी समन्वयक , प्रा. गणेश भगत . छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार समिती, श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार लिमिटेड अहमदनगर कार्यालय. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज कार्यालया शेजारी लालटाकी रोड अहमदनगर ४१४००१ * या पत्त्यावर पुस्तके कुरियर अथवा स्पीड पोस्टाने तातडीने पाठवावीत, असे आवाहन भांडाराचे चेअरमन प्रा.  दत्ता पाटील नारळे व व्हा चेअरमन विजय जाधव  व सर्व संचालक मंडळ तसेच कार्यकारी समन्वयक प्रा. गणेश भगत यांनी केली आहे .अधिक माहितीसाठी 90 49 40 98 86 या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# तैयबा मजहर शेख हिने ठेवला पहिला रोजा!



आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातिल पिशोर येथील झोपडपट्टी भागातील निवासी शेख मजहर यांची कन्या तैयबा वय 5 वर्ष हिने मगंलवार रोजी आपल्या जीवनातला सर्व प्रथम रोजा पकडला, तैयबाने सकाळी पाहाटे उठून नियमा प्रमाणे सहेरी  केली. दिवसाची पूर्ण वेळची नमाज अदा केली आणि संध्याकाळी उपवास रोजा सोडला, त्या बद्दल तिचे आई-वडील, काका-काकू, आजी आजोबा, मामा, आत्या, काका अज्जू भांजा, सर्वांनी तिचे कौतुक करून अभिनंदन केले.

# बेवारस मनोरुग्णास पोलीसांनी माणुसकी समूहाकडे केले पुनर्वसनासाठी दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**करमाड :** पोलीस स्टेशन हद्दीमध्ये सदर ४५ वर्षीय इसम बेवारस अवस्थेमध्ये दिनांक २१ मार्च रोजी दुपारी १२:०० वाजेच्या सुमारास भोजवानी फुड अँड डीएमआयसी परिसरात फिरत असल्याने स्थानिक नागरिकांनी करमाड पोलीसांना माहिती दिली की एक इसम जोरजोरात ओरडत आहे. रोडवरील येणाऱ्या जाणाऱ्यांच्या अंगावर धावून जात आहे.मळकटलेले कपडे वाढलेले केस दाढी, सदर व्यक्ती हिंसक वागत असून त्यापासून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. करमाड पोलीस स्टेशनचे प्रताब नवघरे साय्यक पोलीस निरीक्षक यांनी प्रत्यक्ष जाऊन बघितले असता त्यांनी विचारपूस केली असता तो बंगाली भाषा बोलत होता तो महाराष्ट्र राज्यातील नसल्याने त्यांची भाषा ओळखने  कठीण होते पोलीसांनी त्यास ताब्यात घेवून करमाड पोलीस स्टेशन येथे आनले व मनोरुग्णांसाठी मदतकार्य करणाऱ्या माणुसकी समुहाचे सुमित पंडित यांना प्रताब नवघरे साहेब साय्यक पोलीस निरीक्षक करमाड,यांनी सदर इसमाची माहिती फोनद्वारे दिली असता समाजसेवक सुमित पंडित यांनी सदर व्यक्तीस १०८ अंबुलन्स ने प्रथमोपचार करिता शासकीय रुग्णालयात दाखल केले व सदर व्यक्ती चे प्रथमोपचार करुन मानसोपचारतज्ज्ञ यांचे ओपिनियन घेऊन, माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडित यांनी सदर व्यक्ती ची दाढी कटिंग करुन स्वच्छ आंघोळ घातली व त्यास माणसात आणले सदर इसमास पोलिसांच्या मदतीने कागदोपत्री पुर्तता करुन तात्पुरती अन्न वस्त्र निवारा याकरिता आपले माणुसकी वृद्ध सेवालय येथे निवाऱ्यासाठी दाखल केले. बेवारस अवस्थेमध्ये फिरणाऱ्या ४५ वर्षीय मनोरुग्ण इसमास करमाड पोलीसांनी व माणुसकी समूहाने  मायेचा निवारा दिला, या सामाजिक कार्यात प्रताब नवघरे साहेब साय्यक पोलीस निरीक्षक करमाड, राजेंद्र बनकर पोलीस उप निरीक्षक, शिवाजी मदेवाड पो.हे.कॉ.अमोल मारकवाड पो.कॉ, दादाराव पवार पो.हे.कॉ,व



माणुसकी समुहाचे सुमित पंडित, देविदास पंडित, आकाश ढवळे, जा पंडित, आदींनी मदतकार्य केले.

# कृष्ण अवतार झाला म्हणून गोकुळात काल्याची निर्मिती

## अगस्ती ऋषि मंदिरातील त्रिदिनात्मक सोहळयाची स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराजांच्या कीर्तनाने सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** बुद्रुक व जायगुडे आखाडाच्या मध्यावर प्रवरा नदीच्या तीरावर असलेल्या अगस्ती ऋषि मंदिराच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजित त्रिदिनात्मक धार्मिक सोहळयाची शुक्रवारी दि.२२ मार्च रोजी देवगड संस्थानचे उत्तराधिकारी भागवताचार्य स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराजांच्या काल्याच्या किर्तनाने दहीहंडी फोडून भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. कृष्ण अवतार झाला म्हणूनच गोकुळात काल्याची निर्मिती झाली असल्याचे स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलताना केले. ब्रम्हलिन महंत श्री जनार्धन स्वामी महाराज व श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा यांच्या कृपा आशिर्वादाने झालेल्या त्रिदिनात्मक सोहळयाच्या सांगता प्रसंगी अंकाई आश्रमाचे महंत श्री ज्ञानगिरीजी महाराज,महंत गंगागिरीजी महाराज,अगस्ती मंदिराचे सेवेकरी हभप भानुदास महाराज भिसे,कोंडीराम महाराज पेचे, मच्छिंद्र भारती महाराज,विजय महाराज पवार,बाळकृष्ण महाराज कानडे, चंद्रकांत महाराज पटारे, ज्ञानेश्वर माऊली शिंदे, हभप नवले महाराज, मृदुंगाचार्य किरण महाराज डीवरे, गायनाचार्य शंकर महाराज तनपूरे, संतोष महाराज, नेवासा तालुक्याचे युवा नेते उदयनदादा गडाख किर्तन सोहळयातील व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज म्हणाले की देव हा भाव आणि भक्तीचा भुकेला असून त्याला दुसरे काहीही लागत नाही, भाव आणि भक्तीने देवाजवळ जाण्याचा प्रयत्न करा, परमार्थ खूप करण्यापेक्षा साधू व संताला आवडेल असा परमार्थ जीवनात करा, मोबाईलमुळे मुलांची अकार्यक्षमता कमी होत चालली असून भावी पिढीने मैदानी खेळाकडे वळावे कारण ही माती संतांच्या पदस्पर्शाने पवित्र झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाललीलांचे वर्णन केले.राम अवतारातच झाला असता मात्र श्रीकृष्ण अवतारात काला झाला म्हणून गोकुळात काला झाला,गोपाळ होऊन या म्हणजे मी कृष्ण होऊन येईन असा संदेश भगवान परमात्म्याने रामअवतार कार्यात दिला असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. यावेळी काल्याची दहीहंडी फोडून अगस्ती ऋषिमुनी यांच्या मंदिर प्रांगणात चाललेल्या त्रिदिनात्मक धार्मिक सोहळयाची सांगता करण्यात आली.यावेळी सोहळयात अन्नदान व योगदान देणाऱ्यांचा श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.सोहळा यशस्वीतेसाठी
या भागातील तरुण मंडळाचे कार्यकर्त्यांनी तसेच अगस्ती आश्रम भक्त मंडळ सेवेकरी यांनी विशेष प्रयत्न केले.






# महावितरणच्या नाट्यस्पर्धेस सुरुवात, प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या प्रादेशिक स्तरावरील आंतरपरिमंडलीय नाट्य स्पर्धेस शुक्रवारी (22 मार्च) तापडिया नाट्यमंदिरात थाटात सुरुवात झाली. पहिल्या दिवशी सादर झालेल्या 'उत्तरदायित्व' नाटकास प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता होते. लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे व नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता अनिल डोये हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी गुप्ता म्हणाले की, महावितरण कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ही स्पर्धा होत आहे. मनोरंजनाबरोबरच सामाजिक संदेश देण्याचाही प्रयत्न हे कलावंत करत आहेत, ही कौतूकास्पद बाब आहे. डॉ.केळे म्हणाले की, महावितरण ही कलावंताची खाण आहे. या कर्मचाऱ्यांनी कामगार नाट्य स्पर्धा, औद्योगिक नाट्य स्पर्धा व राज्य हौशी नाट्य स्पर्धांतही यश मिळवलेले आहे. लटपटे व डोये यांनीही याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. अधीक्षक अभियंता शांतीलाल चौधरी, संजय सरग, प्रेमसिंग राजपूत यांनी स्वागत केले. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांनी प्रास्ताविक केले. जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी सूत्रसंचालन केले. विधी अधिकारी सुनील पावडे यांनी आभार मानले. उद्घाटन सोहळ्यानंतर छत्रपती संभाजीनगर परिमंडलातर्फे डॉ.गणेश शिंदे लिखित व श्रावण कोळनूरकर दिग्दर्शित 'उत्तरदायित्व' हा नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. दुष्काळ, नापिकी व कर्जाच्या विळख्यात अडकलेला शेतकरी आणि शहरात नोकरी करणारा पण घराशी व गावाशी नाळ तुटलेला प्राध्यापक भाऊ यांच्यातील नाते, परिस्थितीला कंटाळून आत्महत्या करणारा शेतकरी आणि त्याच्या पश्चात खंबीरपणे कुटुंबाचा भार उचलणारी पत्नी यांची कथा उत्कटपणे या नाटकातून उलगडण्यात आली. श्रावण कोळनूरकर, सुनील बनसोड, रमेश शिंदे, पल्लवी गायकवाड, सपना भोसले, अभय एरंडे, नितीन सूर्यवंशी, भानुदास शेवाळे, अशोक गवई, सदानंद जाधव, अनिल राजपूत, बालकलाकार राजेश्री शिंदे व अथर्व चौधरी यांनी या नाटकात भूमिका साकारल्या. या नाट्यप्रयोगास प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. रसिकांनी तापडिया नाट्यमंदिर खचाखच भरले होते.



# निविदेला बगल देऊन केला सिमेंट रस्ता..!

## भोकर-म्हैसा रस्त्यावरील प्रकार - अधिकारी व कंत्राटदार चिडीचूप

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालूक्यातील रस्ते विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला.बरीच कामे प्रगतीपथावर आहेत. भोकर ते म्हैसा रस्त्यावर डांबरीकरण केल्यावर नव्याने सिमेंट रस्त्यासाठी सुमारे शंभर कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. कंत्राटदारांनी निविदास बगल देऊन हलक्या प्रतीचे काम करीत असल्याने कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी त्या परिसरातील ग्रामस्थांची मागणी आहे.
भोकर विधानसभा मतदारसंघ हा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा असल्याने विविध लोकाभिमुख विकास कामांना प्राधान्य देण्यात आले आहे.विशेषता ते सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना रस्तेविकसाला चालना मिळाली आहे. प्रमुख राज्य मार्ग, राष्ट्रीय महामार्ग रस्ते चकचकीत झाले आहेत.बरीच कामे प्रगतीपथावर आहेत. अंतर्गत रस्त्यांची दूरावस्था झाली आहे.काही ठिकाणी नाममात्र खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे.मार्चेएन्ड असल्याने आलेला निधी खर्च करण्यासाठी अधिकारी धडपडत असल्याचे दिसून येत आहे.घाईगडबडीत ऊरकलेली कामे हलक्या प्रतीचे असल्याने भविष्यात ते चिरकाल टीकतील की नाही याची शाश्वती नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन कामात सूधारणा करावी अशी मागणी जोर धरते आहे.



**शंभर कोटीचा सीसीरस्ता :** रहाटी ( ता .भोकर ) गाव महाराष्ट्र व तेलगंणा सिमेलगत आहे .राष्ट्रीय महामार्ग विभागाने भोकर ते रहाटी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी निखील कन्स्ट्रक्शन कंपनीस जबाबदारी दिली आहे . ती त्यांनी पूर्ण केली दरम्यान सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून अशोक चव्हाण यांना संधी मिळाली त्याच वेळी सदरील रस्त्यावर होणारी वाहतूक लक्षात घेऊन रस्ता मजबूत व्हावा म्हणून सिमेंट रस्त्यासाठी शंभरकोटी रूपयाची तरतूद करण्यात आली .त्याचे काम सध्या कासवगतीने सूरू आहे .

**निविदास दिली बगल :** सदरील सिंमेट रस्त्याचे काम कासवगतीने सूरू असुन कामाच्या निविदास डावलून कामे केली जात आहेत .झालेल्या कामावर मुबलक प्रमाणात पाणी वापरले जात नाही .वाहनाची गैरसोय टाळण्यासाठी सुचना फलक लावले नाहीत .रस्त्याची जाडी कमीअधिक आहे .यंत्राच्यासाह्याने कामे होत असल्याने मालाचे प्रमाण कमीअधिक होत आहे .यासह विविध बाबीचा अभाव असल्याने हलक्या दर्जाचे साहित्य वापरून थातूरमातूर कामे केली जात आहेत . याची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे .

# कठोर परिश्रम हीच यशाची गुरुकिल्ली : कारभारी नजन

आधुनिक केसरी न्यूज

**शहरटाकळी :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी निश्चित ध्येय ठेवून ते प्राप्त करण्यासाठी अथक व कठोर परिश्रम करून ध्येय प्राप्त करून आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे. अपयश आले तरी खचून न जाता संयमाने जिद्दीने प्रयत्न केले तर यश नक्कीच प्राप्त होते. स्पर्धेत टिकण्यासाठी अहोरात्र कष्ट करणे खूप महत्त्वाचे आहे कारण यशाला कुठल्याही प्रकारचा शॉर्टकट नसतो. कठोर परिश्रम हीच यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन यांनी केले. शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळा कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन बोलत होते. यावेळी विद्यालयाचे माजी विद्यार्थी राणी कचरू लिंबोरे, पूजा भास्कर काळे, सचिन हरिभाऊ घनवट, अमोल पांडुरंग आर्दड या शासकीय पदावर रुजू या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला , यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सुनिल शिंदे,उपप्राचार्य आप्पासाहेब म्हस्के, पर्यवेक्षक सुरेश शेरे विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांच्या उपस्थितीत होते. संस्थेतून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले असून ते उच्च पदावर अधिकारी,डॉक्टर्स, इंजिनियर, शिक्षक यासारख्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. स्वर्गीय मारुतराव घुले पाटील साहेबांनी पाहिलेले हे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार झाल्याचा आनंद यावेळी व्यक्त केला , यशस्वी माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाने व विद्यालयातील शिक्षकांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळेच आम्ही हे यश संपादन केले असे मत व्यक्त केले.यावेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद



व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा.आमदार डॉ.नरेंद्र घुले पाटील, सचिव मा.आमदार चंद्रशेखर घुले पाटील,जिल्हा परिषदेच्या मा.अध्यक्षा नामदार सौ.राजश्रीताई घुले पाटील, पंचायत समिती शेवगावचे मा.सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील यांनीही अभिनंदन केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब मोहिटे यांनी केले तर आभार संतोष अडकित्ते यांनी मानले.




# 'भारत तोडो'ची भाषा करणाऱ्या गुन्हेगाराला काँग्रेसची उमेदवारी : आ. प्रवीण दरेकर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दंगल घडविणे, घातक शस्त्रांचा वापर करणे, शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे असे अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या साजिद खान पठाण याला काँग्रेसने अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात उमेदवारी देऊन "काँग्रेस का हाथ, दंगाईयों के साथ ' हेच सिद्ध झाले असल्याची घणाघाती टीका भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेतील गटनेते आ.प्रवीण दरेकर यांनी शनिवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आ.दरेकर बोलत होते. भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान हे यावेळी उपस्थित होते. गाजावाजा करत भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून न तुटलेला भारत जोडण्याचे नाटक करणाऱ्या काँग्रेसने भारत तोडो ची भाषा करणाऱ्या साजिद खानला उमेदवारी देऊन आपला दुटप्पी चेहरा दाखवला असल्याचेही आ.दरेकर यांनी सांगितले.आ.दरेकर यांनी यावेळी साजिद खान पठाण याच्याविरुद्ध अकोला शहरातील रामदास पेठ, कोतवाली आणि खदान या तीन पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या 16 गुन्ह्यांची यादीच वाचून दाखवली. नफरत तोडो नव्हे तर नफरत पसरवणे हाच काँग्रेसचा असली चेहरा आहे अशा शब्दात श्री. दरेकर यांनी काँग्रेसवर शरसंधान साधले. तब्बल 16 गुन्हे दाखल असलेल्या साजिद खान पठाण याला उमेदवारी देऊन काँग्रेसने 'गुन्हेगार टिकवा आणि गुन्हेगारी वाढवा' असे धोरण अवलंबले आहे. अकोल्यात झालेल्या दंगलीतील साजिद खान पठाण हा मुख्य आरोपी असून अशा गुन्हेगाराला दिलेल्या उमेदवारीचा भारतीय जनता पार्टी कडवा विरोध करत आहे. गुन्हेगारांना पाठीशी घालत काँग्रेस गुन्हेगारांचे उदात्तीकरण करत आहे अशी टीकाही त्यांनी केली. काँग्रेस या दंगेखोराची उमेदवारी मागे घेणार का असा सवालही आ.दरेकर यांनी उपस्थित केला. आ.दरेकर म्हणाले की अशा अट्टल गुन्हेगाराला उमेदवार म्हणून माथी मारत सर्वसामान्य जनतेवर काँग्रेस घोर अन्याय करत आहे. अशा अट्टल गुन्हेगारांना सूज्ञ मतदार त्यांची खरी जागा आगामी विधानसभा पोटनिवडणुकीत दाखवून देतील असा विश्वास दरेकर यांनी व्यक्त केला.

# होळी करा लहान, पोळी करा दान : अंनिस

## दहा हजारांहून अधिक संकल्पपत्र संकलित

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** वर्षाअखेरीस ' द दारूचा नव्हे द दुधाचा ' या उपक्रमानंतर होळी करा लहान, पोळी करा दान हा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती उपक्रम राबवत आहे.

हवामानाच्या वाढत्या प्रदूषणामुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचे संतुलन मोठ्या प्रमाणात ढासळत आहे. त्याचा एकूणच जीवसृष्टीवर अत्यंत भयानक दुष्परिणाम होत आहे. म्हणून प्रत्येक धर्मातील प्रत्येक सण - उत्सव - समारंभ हा पर्यावरण स्नेही, नैसर्गिक पद्धतीने साजरा करणे ही काळाची नितांत गरज झालेली आहे. याचा विचार करून महाराष्ट्र अंनिसच्या वतीने जिल्ह्यातील अनेक शाळा - महाविद्यालयातून या विषयावर व्याख्याने देऊन, पर्यावरण स्नेही अशी होळी व रंगपंचमी साजरी करण्याकरीता जवळपास दहा हजारांहून अधिक संकल्प पत्रं भरून घेतलेली आहेत. पाणी न वापरता कोरड्या वनस्पती रंगांची रंगपंचमी खेळावी, झाडे, लाकडे, गोवऱ्या, प्लॅस्टिक, टायर यांची होळी करण्यापेक्षा स्वतःमधील दुर्गुणाची होळी करावी, होळीच्या ठिकाणी अपशब्द वापरू नयेत असे आवाहन संकल्प पत्रात विद्यार्थ्यांना करण्यात आले आहे. त्याला फारच मोठा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने मागील पंचवीस वर्षांपासून प्रतिकात्मक होळी करा, होळी करा लहान, पोळी करा दान हा उपक्रम राबविण्यात येतो. होळीमध्ये कोणतेही खाद्यपदार्थ न टाकता ते भुकेलेल्यांच्या पोटातील आग विझवण्यासाठी उपयोगात आणावेत. त्यासाठी महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते ठिकठिकाणी होळी जवळील पोळ्या दान मिळवून त्या गरजूंना, भुकेलेल्यांना वाटप करतात. त्यांच्याबरोबर स्वतः ही सेवन करतात. नाशिक मध्ये उद्या होळीच्या दिवशी सायंकाळी सहा ते आठ या वेळात महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते, होळी करा लहान, पोळी करा दान, हा उपक्रम राबवणार आहेत. इच्छुकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन अंनिसच्या वतीने करण्यात आले आहे.

# जरंडी येथे महिलांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील जरंडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात दि.२२/३/२४ शुक्रवारी रोजी रात्री उशिरापर्यंत ४६ महिलांवर बिन टाक्याच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या. यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बाळकृष्ण लांजेवार व सावळदबारा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ राहूल चव्हाण हे उपस्थित होते. शिबिरात २९ गावांतील ४६ महिला रुग्णांवर सर्जन डॉ. अशोक बेलखोडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गितेश चावडा यांनी या शस्त्रक्रिया केल्या. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश जाधव,



डॉ. पूजा वारंगणे, हिरामण दुधे, सागर घायवट, अनिल महाजन, डॉ राहूल चव्हाण, विकास लहाने वानखेडे आदीनी परिश्रम घेतले. अशी माहिती के.एल. गोरे यांनी बोलताना दिली.

# धुळे जिल्हा कारागृहातील तुरूंग अधिकारी सचिन झिंजुर्डेसह शिपायांना सन्मानचिन्ह

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्र शासन कारागृह विभागातील पोलीस पोलीस कर्मचाऱ्यांचा उत्कृष्ट व प्रशंसनीय सेवेबद्दल त्यांना २०२३ -२०२४ करीता अपर पोलीस महासंचालक प्रशंसनीय सेवेबद्दल सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करत प्रदान करण्याचे घोषित केले आहे. त्यात धुळे जिल्हा कारागृह मधील तुरुंग अधिकारी श्रेणी एक सचिन माधुराव झिंजुर्डे व कारागृह शिपाई निलेश परशराम जाधव , कारागृह शिपाई श्री. धनराज इंदास चव्हाण यांची अपर पोलीस महासंचालक यांच्यातर्फे उत्कृष्ट कामगिरी व प्रशंसनीय सेवेबद्दल सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र महाराष्ट्र दिनचे औचित्य साधून लवकरच प्रदान करण्यात येणार आहे.



यावेळी धुळे जिल्हा कारागृह सोबत खान्देशातील पाच जणांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र जाहिर झाले आहेत. यामध्ये धुळे जिल्हा कारागृह तुरूंग अधिकारी सचिन माधुराव झिंजुर्डे, नंदुरबार जिल्हा कारागृह अधीक्षक राजू रामचंद्र देशमुख, धुळे जिल्हा कारागृह शिपाई निलेश परशराम जाधव, धुळे जिल्हा कारागृह शिपाई धनराज इंदास चव्हाण, जळगाव जिल्हा कारागृह हवालदार सुरेश सुखदेव नेवारे यांचा समावेश आहे.

# परिस्थितीवर मात करत सागर बनला तलाठी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील सागर त्रिभुवन यांनी आपल्या गरीब



परिस्थिती वर मात करत तलाठी परीक्षेत यश संपादन करत यश मिळवले आहे. सविस्तर माहिती अशी की, शहरातील आंबेडकर नगर येथील रहिवाशी सागर ताराचंद त्रिभुवन यांनी घरच्या गरीब परिस्थिती वर मात करत जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर वर्ष 2023 झालेल्या तलाठी भरती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून सध्या सागर त्रिभुवन यांची बुलढाणा जिल्ह्यात तलाठी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सागरचे वडील ताराचंद आसाराम त्रिभुवन हे बिगारी काम करत असून सात वर्षांपूर्वी आईचे निधन झालेले होते. अश्या परिस्थितीत सोशल मीडिया पासून स्वतःला दूर ठेवत अभ्यासात गुंतवून घेतले. वडिलांना त्यांच्या कामात मदत करत परिस्थिती ची जाणीव ठेवून जिद्द व चिकाटीच्या जोरावर तलाठी भरती परीक्षेत यश संपादन केले असून या यशाबद्दल वैजापूर नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक डॉ दिनेश परदेशीं तथा पदाधिकारी मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले आहे व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# ग्रामपंचायतींनी वार्षिक आराखड्यात वृत्तपत्र खरेदीसाठी १० हजारांची तरतूद करावी

## राज्य अधिवेशनात प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मांडलेले ठराव सर्वानुमते मंजुर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** चिंचवड- पुणे येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या राज्यव्यापी अधिवेशनात प्रत्येक ग्रामपंचायतीनी वार्षिक आराखड्यात वृत्तपत्र खरेदीसाठी १० हजार रूपयांची तरतूद करावी, आणि पारदर्शक कारभारासाठी जिल्हा व तालुका विविध शासकीय समित्यांमध्ये पत्रकारांना सदस्य नियुक्ती द्यावी.यासह अनेक महत्त्वपूर्ण ठराव प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मांडले, ते ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य पातळीवरील अधिवेशन चिंचवड- पुणे येथे मोठ्या थाटात पार पडले. या अधिवेशनात पत्रकारांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यावेळी अधिवेशनाच्या खुल्या सत्रात प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मांडलेले महत्वपूर्ण ठराव टाळ्यांच्या गजरात हात उंच करून उपस्थित 2000 पत्रकारांनी मंजूर केले. यात महाराष्ट्र सरकारने बाळशास्त्री जांभेकर सन्मान ( पेन्शन ) योजनेत महिना अकरा हजारहून २० हजार रुपयांची तरतूद केल्याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन करणारा ठराव मांडल पहील्यांदाच मंजूर करण्यात आणि वाढती महागाई लक्षात घेऊन ज्येष्ठ पत्रकारांसाठी आजची तरतूद करण्याचा सरकारने विचार करावा अशी मागणी करण्यात आली.तर ग्रामपंचायतींनी वार्षिक आराखड्यात गाव तिथे ग्रंथालय या धोरणानुसार वृत्तपत्र खरेदीसाठी वार्षिक१० हजार रुपयांची तरतूद करावी यासाठी सरकारने आदेश करावा, ज्यामुळे राज्यातील ३०००० ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वृत्तपत्रांना आर्थिक पाठबळ मिळेल. असा अत्यंत महत्त्वपूर्ण ठराव प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मांडल्यानंतर पत्रकाराने उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवून हात उचलून या ठरावाला समर्थन दिले.तर वेगवेगळ्या खाजगी विमा कंपन्यांना केंद्र सरकार पॉलिसी घेतल्यानंतर उत्पन्न घरात सवलत देते. त्यास धोरणानुसार वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या वाचकांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपयाची सूट द्यावी यासाठी केंद्र सरकारला राज्य सरकारने प्रस्ताव पाठवावा. वाढती महागाई इतर वस्तुंचे वाढलेले दर आणि जीएसटीचा अतिरिक्त बोजा लक्षात घेऊन सरकारने जाहिरातींच्या दरात वाढ करावी. विभाग, जिल्हा आणि गाव पातळीवरील छोटी वृत्तपत्र हे सर्वसामान्य माणसांचा आवाज असल्याने सरकारने या वर्तमानपत्रांना जाहिरातींचा कोटा वाढवून द्यावा. वृत्तपत्रांनी उत्पादन खर्चावर आधारित विक्री किमती वाढवाव्यात.यासाठी पत्रकारांनी व्यापक जनजागृती मोहिम हाती घ्यावी.अधीस्विकृती मिळवण्यासाठीच्या जाचक अटी शिथिल कराव्यात. विभागीय ,जिल्हास्तरावरील दैनिकांच्या तालुका पातळीवरील पत्रकारांना अधिस्वीकृती देण्यात यावी. जिल्हा आणि तालुकास्तरावर म्हाडा अंतर्गत पत्रकारांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण योजना सुरू करावी. पत्रकारांच्या मुलांना शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमाच्या आणि उच्च शिक्षणासाठी परदेशात कोटा आरक्षित करावा. राज्य आणि जिल्हास्तरीय शासकीय समित्यांवर सदस्य म्हणून आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून पत्रकारांना प्राधान्य देत संधी द्यावी.विधान परिषद सदस्यपदी पत्रकार संघटनेमधून प्रतिनिधित्व द्यावे. असे विविध महत्त्वपूर्ण ठराव प्रदेशाध्यक्ष या नात्याने वसंत मुंडे यांनी मांडले, त्यास सर्व पत्रकार, तालुका, जिल्हा आणि राज्य कार्यकारिणीने मंजुरी दिली.



**पत्रकार पेन्शन योजना निधीत वाढ :** केल्याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या अधिवेशनात सरकारने बाळशास्त्री जांभेकर सन्मान (पेन्शन) योजनेत महिना अकरा हजारहून २० हजार रुपयांची तरतूद केल्याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन करण्यात आले. सरकारने हा महत्वपूर्ण निर्णय घेतला असून त्याचे स्वागतच केले पाहिजे, अशी प्रतिक्रिया प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दिली.

# शिर्डी गोळीबार प्रकरणी दोघा संशयितांना पोलीसांनी घेतले ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शहरात गुरुवार दिनांक २१ मार्च रोजी सकाळी दहाच्या सुमारास भरवस्तीत साईलक्ष्मी पार्किंग मध्ये गोळीबाराची घटना घडली होती शिर्डीमध्ये गुन्हेगारांनी पुन्हा डोके वर काढले आहे काही दिवसांपूर्वी शिर्डी ग्रामस्थांनी अवैध धंदे व गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीसांनी कारवाई करावी अशी मागणी केली होती त्यामुळे हे प्रकरण पोलीसांनी गंभीरपणे घेतले होते परंतू काही दिवसांनी जैसे थी परिस्तिथी आहे.
फिर्यादी साईनाथ रवींद्र पवार, वय २२रा. शिंगवे, ता. राहता यांने दिलेल्या फिर्यादीत मी व माझा भाऊ सचिन पवार व दत्तात्रय पवार चार चाकी वाहन पार्कींग मध्ये लावत चहाच्या दुकानात चहा पिऊन चर्चा करत असताना संपत शंकर वाडेकर व त्याचा अज्ञात साथिदार गावठी कट्टा काढून साईनाथ पवार यास म्हणाला तुला एकदाचा सपुन टाकतो असे म्हणत जीवे मारण्यासाठी गोळीबार केला एक गोळी चुकवली व दुसरी फायर झाली नाही अशी फिर्याद शिर्डी पोलीसात दिल्यामुळे शिर्डी पोलीसांनी आरोपी संपत शंकर वायकर व अज्ञात साथीदार याच्या विरोधात गुन्हा रजिस्टर नंबर १९०/२०२४भादवी कलम ३०७,३४भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५मुबई पोलीस कायदा कलम ३७(१) (३) १३५सह कायदा १९३२ चे कलम ७प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे घटनास्थळी उपविभागीय अधिकारी शिवपुजे पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांनी भेट दिली आधिक तपास सपोनि सागर काळे हे करीत आहे पोलीसांनी काडतुस व लाकडी दाडके जप्त केले आहे हया गुन्ह्यातील आरोपी यांनी राहाता पोलीस स्टेशनला परस्पर टोळीतील विरोधात फिर्याद दिली आहे दोन संशयितांना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.





# माजी विद्यार्थ्यांकडून जिजामाता नर्सिंग शिष्यवृत्ती

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**
**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज माजी विद्यार्थ्यांनी नुकत्याच स्थापन केलेल्या मविप्र माजी विद्यार्थी संघटनेने 'जिजामाता नर्सिंग शिष्यवृत्ती' जाहीर केली आहे. पहिल्या टप्प्यात १५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु १०,००० देण्यात येणार आहेत. याच शिष्यवृत्तीचे प्रमाणपत्र वितरण सोहळा मराठा विद्या प्रसारक समाजाचे नर्सिंग विद्यालयात पार पडला. यावेळी मविप्रचे सरचिटणीस अँड. नितीनजी ठाकरे सर, मविप्र माजी विद्यार्थी संघटनेचे संचालक विवेकजी भामरे, मविप्र उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, वैद्यकीय महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीचे डॉ रायते, शिक्षण अधिकारी डॉ ज्ञानेश्वरजी लोखंडे, मविप्र नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या पौर्णिमा नाईक व इतर मान्यवर उपस्थित होते. जिजामाता नर्सिंग शिष्यवृत्ती मविप्र माजी विद्यार्थी संघटनेतर्फे देण्यात येत आहे. आर्थिक स्थिती, शैक्षणिक निकष व मुलाखत ह्या आधारावर ह्या मुला-मुलींची निवड करण्यात येते. नर्सिंग हा वैद्यकीय सेवांचा आत्मा आहे. येत्या काळात ह्या व्यवसायाला मागणी वाढत जाणार आहे. रोजगाराच्या संधी इतरत्र कमी होत असल्या तरी ह्या क्षेत्रात मात्र त्या वाढतच आहे. त्यामुळे अधिकाधिक गुणवत्ताधारक मुला-मुलींना नर्सिंगकडे आकर्षित करणे हा जिजामाता शिष्यवृत्तीचा हेतू आहे. पहिल्या टप्प्यात पंधरा विद्यार्थ्यांना रू. १०,००० प्रदान करण्यात येत आहेत. काहींना ही मदत वाढवून रू. २०,००० करण्यात येणार आहे. माजी विद्यार्थी संघटनेच्या योजनांनविषयी माहिती देतांना संस्थेचे संचालक विवेकजी भामरे यांनी सांगितले कि, "सध्या बारावी सायन्समध्ये अभ्यास करणाऱ्या मुला-मुलींनाही पुढे नर्सिंगच्या अभ्यासासाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येईल. पुढे इतरही अनेक विशिष्ट क्षेत्रात टप्प्याटप्प्याने गरजू विद्यार्थांना मदत करण्याचा संघटनेचा हेतू आहे. ह्यात क्रीडा क्षेत्रात विशेष प्रावीण्य दाखवणाऱ्या मुला-मुलींनाही मदत होईल. त्याच बरोबर जगभरातील माजी विद्यार्थ्यांना एकत्र करून प्रोफेशनल चॅप्टर्स, मेंटॉरशिप प्रोग्राम सुरु करण्यात येणार आहे." यावेळी त्यांनी जास्तीत जास्त माजी विद्यार्थ्यांनी MVPALUMNI.COM या संकेत स्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे व या चळवळीला बळ देण्यासाठी हातभार लावण्यास सांगितले आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर